

# जपानी परीकथा-३

## येइ ओझाकी

### वसंत बागुल

# जपानी परिकथा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# जपानी परिकथा-३

संपादिका: येई थिओदोरा ओझाकी

अनुवादक: वसंत बागुल

# जपानी परिकथा-३

संपादिकाः येई थिओदोरा ओझाकी
अनुवादकः वसंत बागुल
३०२, न्यु शिवम अपार्टमेंट
स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे
फोन: 0251-2587832, 8149068977
vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com
प्रकाशन : २८ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची- लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जपानी परिकथा

संपादिका:  येई थिओदोरा ओझाकी

अनुवादक: वसंत बागुल

माझ्या अतिशय गोड व सुशील नातीः

लिना,

हर्षिता,

तनिशा,

जान्हवी,

लक्ष्मी,

सिद्धी,

तेजल

आणि एशा

ह्यांना अकृत्रिम आनंद देणाऱ्या सातासमुद्रापलिकडील अनुपम सुंदर जपानी परिकथांची अनमोल भेट.

- भाऊ

**येई थिओदोरा ओझाकी** ही विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या जपानी लघुकथा आणि परिकथांची अनुवादिका होती. तिचे अनुवाद प्रामाणिकपणे अभिजात आणि लोकप्रिय असून तिच्या मृत्यूनंतर बऱ्याचदा पुनर्मुद्रित झालेले आहेत. ती बॅरन ओझाकीची कन्या होती जे पाश्चिमात्य देशात जाऊन शिक्षण घेणारे पहिले जपानी गृहस्थ होते आणि विल्यम मॉरिसनची कन्या बाथिया कॅथेराईन मॉरिसन या त्यांच्या शिक्षकांपैकी एक होत्या. तिचे आईवडिल पाच वर्षांनी विभक्त झालेले होते आणि तिच्या आईवर त्या तिन्ही मुलींची, त्या एकोणवीस वर्षांच्या होईपर्यंत, संगोपन करण्याची जबाबदारी पडली होती. त्याच वेळी, येईला तिच्या वडिलांबरोबर जपानला पाठविण्यात आले जेथे तिने मौजेत दिवस घालविले. त्यानंतर तिने नियोजित विवाहाला नकार दिला, वडिलांचे घर सोडले आणि अर्थार्जनासाठी शिक्षिका व सचिव बनली. सारी वर्षे तिने युरोप आणि जपानचा इकडून तिकडे व तिकडून इकडे प्रवास केला तो तिच्या कौटुंबिक कर्तव्यासाठी. इटलीसारख्या विविध देशात प्रवास केला आणि बुद्धिस्ट मंदिरांच्या सर्वात वरच्या माळयावर झोंबणाऱ्या गार वाऱ्यात वास्तव्य केले. ह्या सर्व काळात तिची पत्रे चुकीने वारंवार काहीही संबंध नसलेल्या जपानी राजकारणी युकिओ ओझाकी कडे पोहचवली गेली आणि तिची त्याच्याकडे. १९०४ मध्ये शेवटी ते भेटले आणि लवकरच विवाहबद्ध झाले. तिच्या कलाकृतींमध्येः जपानी परिकथा, प्राचीन जपानचे योद्धे आणि इतर गोष्टी, प्राचीन जपानच्या अद्भुतरम्य प्रेमकथा आणि बुद्धाचे स्फटिक आणि इतर परिकथा यांचा समावेश आहे.

# मनोगत

लहान बाळ जेव्हा बोलायला शिकते तेव्हा पहिल्यांदा ते काय म्हणते? “मला गोष्ट सांगा.”

लहान मुलांना गोष्टी फार आवडतात. आणि त्याचं कारण म्हणजे त्यात असलेले चमत्कार आणि कल्पनारम्यता.

जंगलात जसे मोठे सर्प, वाघ, सिंह आणि हत्ती ह्या सारखे हिंस्त्र प्राणी असतात; तसेच हरिण, ससे आणि कासव ह्यासारखे निष्पाप, निरूपद्रवी प्राणीही असतात. ह्या सर्वांच्या स्वभावात फारसा फरक नसतो. वरून वाघ, सिंहासारखी भयंकर वाटणारी माणसे आतून अतिशय प्रेमळ व दयाळू अंतःकरणाची असतात.

पशुपक्ष्यांना, किड्या-मकोड्यांना बोलता येत नाही, पण परिकथांमध्ये त्यांना बोलके करून मानवासारखे आचरण करताना दाखविलेले असते. राक्षस, भुते, हडळी आणि चेटकिणी ह्यांना आपण कधीही पाहिलेले नसते; पण ते जसे वाईट तसे चांगलेही असतात, असे परिकथांमध्ये आपण वाचतो. जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरने म्हटल्याप्रमाणे –

“काही माणसे भुतांची कामे करतात तर काही भुते माणसांची कामे करतात.”

देव आणि दानव, सत् आणि असत् ह्यांचा झगडा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. आधुनिक मानवाच्या राहण्या-वागण्यात आणि बुद्धीमत्तेत खूपच प्रगती झालेली आहे. पण लक्षावधी वर्षांपासून त्याच्या स्वभावातील षड्रिपु (काम, क्रोध,

लोभ, मोह, मद व मत्सर) जसे होते तसेच आहेत, किंबहुना ते अधिकाधिक वृद्धिंगत होत आहेत.

परोपकार, संकटमोचन, योग्य मार्गदर्शन, त्याग व दुसऱ्याच्या दुःखाबद्दल वाटणारी अनुकंपा आणि त्या मोबदल्यात मिळणारे औदार्य, कृतज्ञता आणि मौल्यवान पारितोषिके हा निसर्गाचा नियमच आहे.

सत्य, शिव आणि सुंदर ह्यांच्या बाजूने लढून असत्य, अमंगल आणि विकृत ह्या विरूद्ध विजय मिळविण्यातच मानवाच्या जीवनाचे कल्याण आहे.

--परिकथा हेच सांगतात.

# प्रस्तावना

हा जपानी परिकथांचा संग्रह म्हणजे श्री.अँड्रयू लँग ह्यांच्याकडून माझ्या मित्राद्वारे केलेल्या अप्रत्यक्ष सूचनांचे फलित होय. सादानामी सान् जिन ह्यांनी लिहिलेल्या आधुनिक पाठभेदातून त्या भाषांतरीत केल्या गेलेल्या आहेत. या कथा शब्दशः भाषांतरीत नाहीत, आणि त्या जरी जपानी परिकथा असल्या तरी जुन्या पद्धतीची जपानी अभिव्यक्ती यथातथ्यपणे ठेवली आहे, त्यांचे कथन विद्यार्थ्यांपेक्षा तरूण पाश्चात्त्य वाचकांच्या जिज्ञासापूर्तीचा उद्देश राखून केलेले आहे.

ज्यांनी भाषांतरात मला मदत केली त्या श्री. वाय्. यासुओका, कु. फुसा ओकामोतो, माझे बंधू नोबुमोरी ओझाकी, डॉ.योशिहिरो ताकाकी आणि कु. कामेको यामावो यांच्याकडे कृतज्ञतेच्या ऋणनिर्देशाचे श्रेय जाते. एक गोष्ट जिचे नाव मी "एका माणसाची गोष्ट ज्याला मरायची इच्छा नसते" शिन् सुइ तामेनागाने शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका छोट्या पुस्तकातून घेतली आहे. तिचे नाव चोसेइ फुरो किंवा "दीर्घायुष्य." "बांबूतोड्या आणि शशांकपुत्र" हे "ताकेतारी मोनोगातारी" ह्या अभिजात ग्रंथातून घेतलेले आहे आणि ते खरोखर अभिजात वाङ्मय असले तरी त्याची गणना जपानी लोकांनी आपल्या परिकथात अभिजात म्हणून केलेली नाही.

चित्रे श्री. काकूझो फुझियामा ह्या टोकियोच्या कलाकाराने काढलेली होती. जे मला आवश्यक वाटले व ज्यामुळे मला संतोष मिळाला अशा स्थानिक सूक्ष्म तपशीलाचा किंवा निवेदनाचा समावेश मी ह्या गोष्टींचे कथाकथन इंग्रजीत करताना केलेला आहे आणि एक किंवा दोन घटनांमधून मी ते प्रसंग दुसऱ्या पाठभेदातून वेचलेले आहेत. जपानच्या सुंदर दंतकथा आणि परिकथा सदासर्वदा ऐकणारे उभयतः तरूण आणि म्हातारे, इंग्लिश किंवा अमेरिकन उत्सुक श्रोते मला आढळून आले आणि त्या कथन करताना मला असेही आढळून आले की अतिशय मोठ्या प्रमाणावर ते त्याविषयी अनभिज्ञ आहेत आणि ह्या गोष्टीनेच मला पाश्चात्त्य मुलांसाठी लिहिण्याचे प्रोत्साहन दिले.

वाय. टी. ओ.--- टोकियो, १९०८

# अनुक्रमणिका

१६ माकड आणि खेकडा यांचे भांडण

१७ पांढरा ससा आणि सुसरी

१८ राजकुमार यामातो ताकेची गोष्ट

१९ मोमोतारो किंवा सत्पाळूच्या पुत्राची गोष्ट

२० राशोमॉनचा नरभक्षक दुष्ट राक्षस

२१ म्हाताऱ्याचे गलंड कसे नाहीसे झाले

२२ पाच रंगांची रत्ने आणि सम्राज्ञी जोकवा

# माकड आणि खेकडा यांचे भांडण



फार फार वर्षांपूर्वी जपानमध्ये शरद्ऋतूतील निर्मळ प्रभातकाळी, असे घडले की तांबूस रंगाचा चेहरा असलेले एक माकड आणि एक पिवळा खेकडा नदीकाठी एकत्र खेळत होते. जेव्हा ते इकडे तिकडे पळत होते तेव्हा खेकड्याला भाताचा गोळा आणि माकडाला पेरसिमॉन फळाचे बी सापडले.

खेकड्याने भाताचा गोळा वर उचलून माकडाला दाखवित म्हटले,

“बघ, किती छान वस्तू मला सापडली ते!”

नंतर माकडाने पेरसिमॉनच्या फळाचे बी उंच धरत म्हटले,

“मला सुद्धा काहीतरी छान सापडले आहे! बघ!”

आता माकडाला पेरसिमॉनची फळे आवडत असली तरी नुकतेच सापडलेले बी मात्र त्याच्या काहीही उपयोगाचे नव्हते. पेरसिमॉनचे बी दगडासारखे कठीण आणि न खाण्याजोगे होते. म्हणून तो त्याच्या हावरट स्वभावामुळे खेकड्याच्या भाताच्या छान गोळ्याचा मत्सर करू लागला आणि त्याने अदलाबदलीचा प्रस्ताव मांडला. अर्थातच खेकड्याला ते दगडासारखे बी बदल्यात घेणे आवडले नाही आणि त्याने माकडाच्या त्या प्रस्तावाला संमती दिली नाही.

नंतर त्या माकडाने खेकड्याचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत म्हटले,

“किती अजाण आहेस तू, भविष्याचा विचारच करीत नाहीस! तुझा भाताचा गोळा आत्ताच खाल्ला जाईल, आणि तो निश्चितच माझ्या बी पेक्षा मोठा आहे, पण जर तू हे बी जमिनीत लावले तर लवकरच काही वर्षात त्याचे मोठे झाड होईल आणि त्याला विपुल छान पिकलेली पेरसिमॉनची फळे येतील. फक्त मीच ती फांद्यांना लगडलेली पिवळी फले तुला दाखवू शकेन! अर्थात जर तू माझ्यावर विश्वास ठेवत नसशील तर मी स्वतः ते लावीन. असं असूनही मला खात्री आहे की नंतर माझा सल्ला न ऐकल्याने तुला नक्कीच वाईट वाटणार.”

भोळ्या स्वभावाचा खेकडा माकडाच्या चलाख प्रस्तावाला विरोध करू शकला नाही. शेवटी तो त्याला वश झाला आणि माकडाच्या प्रस्तावाला त्याने संमती दिली आणि अदलाबदली केली गेली. त्या हावरट माकडाने तो भाताचा गोळा चटकन बकाबका खाऊन टाकला आणि मोठ्या नाखुषीने पेरसिमॉनचे बी खेकड्याला देऊन

टाकले. त्याला तेसुद्धा त्याच्याजवळ ठेवायचे होते पण त्यामुळे खेकड्याला राग येईल आणि तो त्याच्या तीक्ष्ण कातरीसारख्या आकडीने त्याचा चावा घेईल म्हणून तो घाबरला होता. नंतर ते विभक्त झाले, माकड जंगलातील झाडात असलेल्या त्याच्या घरी गेला आणि खेकडा नदीकिनारी असलेल्या दगडांमध्ये. जेव्हा तो खेकडा त्याच्या घरी पोहोचला तेव्हा माकडाने सांगितल्याप्रमाणे त्याने पेरसिमॉनचे बी जमिनीत पुरले.

पुढल्या वर्षी वसंत ऋतूत त्या छोट्याशा झाडाचे जमिनीतून फुटून वर आलेले अंकुर पाहून खेकड्याला खूपच आनंद झाला. प्रत्येक वर्षी ते मोठे मोठे होत गेले, शेवटी एका वसंत ऋतूत त्याला बहर आला आणि पुढल्या शरद् ऋतूत त्याला छान छान मोठे पेरसिमॉन आले. रूंद मऊसूत पानांच्यामध्ये ती सोन्याच्या गोळ्यासारखी फळे लगडलेली होती, आणि जशी ती परिपक्व होऊ लागली तसा त्यांचा रंग गर्द केशरी होऊ लागला. गोगलगाय जशी शिंगे वर काढते तसे डोळे वर करून सूर्यप्रकाशात पूर्णपणे परिपक्व होत जाणाऱ्या फळांकडे रोज बाहेर येऊन लांब डोळ्यांनी बघत राहण्यात त्याला खूप आनंद वाटत असे.

“ती मधुर रसाळ फळे खाताना किती छान वाटेल!” तो स्वतःशीच म्हणाला.

शेवटी एके दिवशी त्याला कळले की पेरसिमॉन्स् नक्कीच पिकलेत, आणि त्याला एकाची चव घेऊन बघण्याची इच्छा झाली. त्याने झाडावर चढायची अनेकदा खटपट केली पण त्याच्यावर लटकणाऱ्या सुंदर पेरसिमॉनकडे पोहोचण्याची त्याची आशा निष्फळ झाली आणि प्रत्येक वेळी तो अयशस्वी झाला, कारण खेकड्याचे पाय झाडावर चढण्यासाठी बनविलेले नसतात तर फक्त जमिनीवर आणि दगडांमधून पळण्यासाठी बनविलेले असतात जे तो अगदी कुशलतेने करू शकत होता. ह्या त्याच्या द्विधा मनःस्थितीत तो त्याच्या जुन्या सवंगड्याबद्दल, माकडाबद्दल विचार करू लागला. जो त्याला ठाऊक होता की त्याच्याइतके जगात उत्कृष्टपणे झाडावर

कोणीही चढू शकत नव्हते. त्याने ठरविले की माकडाला मदतीसाठी बोलवावे, आणि तो त्याला शोधायला निघाला.

खेकड्याच्या पद्धतीने नदीच्या दगडी किनाऱ्यावरून, पाऊलवाटेवरून तो अंधारलेल्या जंगलात शिरला. खेकड्याला शेवटी माकड त्याच्या आवडत्या सुचीपर्णी वृक्षांमध्ये दुपारी डुलकी घेताना दिसला. स्वप्न बघताना झाडावरून पडून जाऊ नये म्हणून झाडाच्या फांदीला त्याने त्याच्या शेपटीचे वेटोळे करून घट्ट बांधून ठेवले होते. तथापि जेव्हा त्याला हाक ऐकू आली तेव्हा तो पूर्णपणे जागा झाला आणि खेकडा काय म्हणतो ते उत्सुकतेने ऐकू लागला. फार पूर्वी त्याने भाताच्या गोळयाच्या बदल्यात दिलेल्या त्या बीचे झाड वाढले आणि त्याला छान छान फळे लागली आहेत हे त्याने ऐकले तेव्हा त्याला खूप आनंद झाला, कारण त्याने त्याचवेळी त्या खेकड्याला फसविण्याची योजना केली जेणेकरून त्याला सर्व पेरसिमॉन हडप करता येतील.

त्याने त्या खेकड्याबरोबर येऊन त्याच्यासाठी फळे तोडून देण्यास अनुमती दिली. जेव्हा ते त्या ठिकाणी पोहोचले तेव्हा त्या बी पासून एवढे मोठे झाड वाढून त्याला पेरसिमॉनची फळे त्या फांद्यांवर लगडलेली पाहून त्याला खूप मोठे आश्चर्य वाटले.

तो पटकन झाडावर चढला आणि एकामागून एक पेरसिमॉन तोडून जितके पटापटा खाता येतील तितके जलद खायला त्याने सुरुवात केली. जेवढं छानसं पिकलेलं फळ निवडता येईल तेवढे निवडून काहीही शिल्लक न उरेपर्यंत तो खातच गेला. खाली वाट पाहत असलेल्या गरीब बिचाऱ्या भुकेल्या खेकड्याला त्याने एकही फळ दिले नाही आणि जेव्हा त्याने संपविले तेव्हा फक्त एक छोटसं टणक, न पिकलेलं फळ शिल्लक राहिलेले होते.

सहनशीलतेने वाट पाहणाऱ्या त्या गरीब बिचाऱ्या खेकड्याच्या भावनांची तुम्ही कल्पना करू शकाल कारण फार काळापासून झाडाला वाढू देणे, त्यावरची फळे पिकु देणे ह्याची त्याने सहनशीलतेने वाट पाहिली होती आणि ती छान

पेरसिमॉनची फळे त्या माकडाला तो अधाशीपणे खाऊन टाकताना बघत होता. तो इतका निराश झाला होता की तो त्या झाडाभोवती फेऱ्या मारीत त्या माकडाला हाका मारून त्याच्या अभिवचनाची आठवण करून देत होता. माकडाने सुरुवातीला त्याच्या तक्रारीकडे लक्ष दिले नाही, पण मग शेवटी त्याने ते हिरवे कच्चे अतिशय टणक पेरसिमॉन तोडले आणि खेकड्याच्या डोक्यावर नेम धरला. पेरसिमॉन फळ पिकलेले नसते तेव्हा दगडासारखे टणक असते. माकडाने फेकलेल्या वस्तूने बरोबर लक्ष्य साधले आणि खेकड्याला त्याचा जोरदार फटका बसून त्याला दुखापत झाली. जितके टणक पेरसिमॉन तोडता येतील तेवढे तोडून एकामागून एक त्याने त्या हतबल खेकड्यावर तो मरून पडेपर्यंत त्याच्यावर फेकले, त्याचे सबंध शरीर जखमांनी भरून गेले. त्याने स्वतःच लावलेल्या झाडाच्या पायथ्याशी तो मरणोन्मुख होऊन पडल्याचे दृश्य दिसत होते.

त्या खेकड्याला त्या दुष्ट माकडाने मारून टाकले असे जेव्हा त्या माकडाने बघितले तेव्हा तो भीतीने भेकडासारखा थरथर कापत जेवढे जलद पळता येईल तेवढे जलद पळून गेला.

आता त्या खेकड्याला एक मुलगा होता. हे सगळे घडले त्या जागेपासून जवळच त्याच्या मित्रासोबत खेळत होता. घराकडे जाताना त्याला त्याचे वडील भयंकर अवस्थेत मरून पडलेले दिसले, त्याच्या डोक्याच्या ठिकऱ्या उडालेल्या होत्या. त्याचे कवच अनेक ठिकाणी मोडले गेले होते आणि त्याच्याभोवती कच्ची पेरसिमॉनची फळे पडलेली होती, ज्यांच्यामुळे ही प्राणघातक गोष्ट घडलेली होती. ते भयानक दृश्य पाहून ते खेकड्याचे पिल्लू खाली बसून रडले.

पण काही वेळ रडल्यावर तो स्वतःशीच म्हणाला की रडल्याने काहीही चांगले होणार नाही. त्याच्या वडिलांचा खून करणाऱ्याचा बदला घेणे हे त्याचे कर्तव्य होते आणि तेच करायचे त्याने ठरविले. त्याने खुन्याला शोधण्यासाठी काही सुगावा लागतो का हे पाहिले. झाडाकडे पाहिल्यावर त्याला दिसून आले की झाडावरची सर्वोत्कृष्ट फळे नाहीशी झालेली होती आणि अवतीभवती कच्च्या पेरसिमॉन सोबत

सालपटांचे असंख्य तुकडे इतःस्ततः विखुरलेले होते जे त्याच्या वडिलांवर फेकले गेले होते. नंतर त्याला कळून चुकले की माकडच त्याच्या वडिलांचा खुनी आहे कारण आता त्याच्या वडिलांनी एकदा त्याला भाताचा गोळा आणि पेरसिमॉनच्या बी ची गोष्ट सांगितली होती, हे त्याला आठवले. खेकड्याच्या पिल्लाला माहित होते की माकडाला इतर फळांपेक्षा पेरसिमॉनची फळे अधिक आवडतात आणि आता त्याची खात्री पटली होती की त्याच्या हावरटपणामुळे खेकड्याच्याच मालकीची फळे त्याच्या मृत्यूला कारणीभूत झाली होती.

सुरुवातीला त्याने विचार केला की माकडावर एकदम हल्ला करावा, इतका तो संतापाने जळफळत होता. दुसरा विचार त्याच्या मनात आला की हे व्यर्थ आहे, कारण माकड इतका धूर्त प्राणी आहे की त्याच्यावर मात करणं कठीण होतं. धूर्ताची धूर्ताशीच गाठ घालायला हवी आणि त्याने त्याच्या मित्रांपैकी एकाकडे मदत मागितली कारण त्याला ठाऊक होते की तो एकटा त्याला ठार मारण्याइतका शक्तीशाली नव्हता.

खेकड्याचे पिल्लू लगेचच मॉर्टरला, त्याच्या वडिलांच्या जुन्या मित्राला बोलविण्यासाठी बाहेर पडले आणि जे काही घडले ते सर्व त्याला सांगितले. त्याने त्याच्या वडिलांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी मॉर्टरची डोळयात पाणी आणून मनधरणी केली. ती दुःखदायक गोष्ट ऐकून मॉर्टरला खूप वाईट वाटले आणि त्याने माकडाला ठार मारण्याची शिक्षा करण्याचे वचन दिले. त्याने त्याला सावधानतेचा इशारा दिला की त्याने तो काय करतोय ह्याची खूप काळजी घ्यायला हवी, कारण ते माकड म्हणजे शक्तीशाली आणि धूर्त शत्रू होता. मॉर्टरने आता मधमाशी आणि टणक बीजास (खेकड्याचे जुने मित्र) ह्यांना त्या गोष्टींबाबत सल्लामसलत करण्यासाठी बोलाविले. थोड्याच वेळात मधमाशी आणि टणक बीज येऊन पोहोचले. जेव्हा त्यांना म्हाताऱ्या खेकड्याच्या मृत्यूबद्दल आणि माकडाबद्दल सविस्तर सांगितले गेले तेव्हा त्यांनी खेकड्याच्या पिल्लास, माकडाला मारून त्याचा सूड घेण्याच्या कामात मदत करण्यास संमती दिली.

साधने आणि मार्ग ह्यावर खूप वेळ बोलून त्यांनी त्यांच्या योजनेबद्दल सल्लामसलत केली आणि श्री. मॉर्टर खेकड्याच्या मुलाबरोबर त्याच्या गरीब बिचाऱ्या वडिलांना दफन करण्यासाठी मुलाला मदत करण्याकरीता त्याच्या घरी गेला.

जेव्हा हे सर्व घडत होते तेव्हा माकड, आपण हे सर्व खूपच छान केले असे म्हणून स्वतःलाच धन्य समजत होते. (शासन होण्यापूर्वी दुष्ट जसे करतात तसे) आणि त्याने हे चातुर्याने केले असे त्याला वाटत होते. त्याने त्याच्या मित्राचे पिकलेले पेरसिमॉन लुटले आणि नंतर त्याला ठार मारले हे त्याने पूर्णपणे उत्तम केले असे त्याला वाटले. त्याने केलेल्या वाईट कृत्याबद्दल त्याला कोणत्या परिणामांना सामोरे जावे लागेल ह्या भीतीच्या विचारांना त्याने थारा दिला नाही आणि अद्यापही त्याला जेवढे निष्ठूरपणे स्मित करता येईल तेवढे तो करीत होता. जर त्याच्या लक्षात आले असते (त्याने स्वतःलाच सांगितले असते की त्याला तेथून निसटून पळून जाताना कुणीही पाहू शकले नाही) खेकड्याचे कुटुंब नक्कीच त्याचा द्वेष सहन करणार नाही आणि ते त्याचा सूड घेतील. म्हणून तो बाहेर पडला नाही आणि अनेक दिवस घरातच लपून बसला. त्याला आढळून आले की अशा प्रकारचे जीवन तथापि अतिशय कंटाळवाणे आहे. जंगलातील मुक्त जीवनाची सवय असलेला तो शेवटी म्हणाला,

“कोणालाच माहित नाही की मीच त्या खेकड्याला मारले! मला खात्री आहे की मी तेथून निघण्यापूर्वीच त्या खेकड्याने शेवटचा श्वास घेतला असणार. मेलेल्या खेकड्यांना तोंडे नसतात. असा कोण आहे की जो सांगेल की मीच त्याचा खून केला म्हणून? जर हे कोणाला ठाऊक नाही तर मी स्वतःला कोंडून घेऊन अशा गोष्टींबद्दल कशाला कुढत बसू? जो संपलेला आहे तो परत येऊच शकत नाही!”

ह्या बरोबर तो बाहेर पडून खेकड्याच्या वस्तीत शिरला आणि दबकत दबकत जाऊन शक्य होईल तेवढे गुपचुपपणे खेकड्याच्या घराजवळ आडवळणाने जाऊन शेजाऱ्याच्या गप्पा ऐकण्याचा प्रयत्न करू लागला. त्याला हे माहित करायचे

होते की खेकड्याच्या प्रमुखाच्या मृत्यूसाठी त्यांनी काय राखून ठेवले आहे. कारण तो म्हातारा खेकडा त्या जमातीचा प्रमुख होता. पण त्याला काहीच ऐकू आले नाही आणि तो स्वतःशीच म्हणाला,

"ते किती मूर्ख आहेत की त्यांना हे ठाऊक नाही की त्यांच्या प्रमुखाचा खून झालेला आहे आणि त्यांना त्याची काळजी पण नाही!"

थोडंही त्याला ठाऊक नव्हते त्याचे तथाकथित "माकडाचे शहाणपण." ज्याचा लहान खेकड्याच्या योजनेशी काही संबंध नव्हता. त्याच्या पित्याला कोणी मारले ह्या बाबतीत त्याने हेतूपुरस्सर ढोंग केले आणि विश्वास ठेवला की त्याच्या मोठ्या चुकीमुळे तो मेला. ह्या अर्थाने त्याने माकडाचा सूड कोणीही घेऊ शकणार नाही हे चिंतन तो करीत होता.

म्हणून माकड त्याच्या घरी पूर्ण समाधानाने परतले. त्याने स्वतःचीच समजूत घातली की त्याला आता भीती वाटायचे काहीच कारण नाही.

एका छानशा दिवशी जेव्हा माकड त्याच्या घरी बसलेले होते तेव्हा त्याला छोट्या खेकड्याकडून आलेल्या दूताला पाहून आश्चर्य वाटले. तेव्हा ह्याचा अर्थ काय असू शकेल असा विस्मय करीत असतानाच तो दूत त्याच्यापुढे नतमस्तक होऊन म्हणाला,

"मला माझ्या मालकाने तुमच्याकडे असे कळविण्यासाठी पाठविले आहे की त्याचे वडील पेरसिमॉनच्या झाडावर फळे तोडण्यासाठी चढण्याचा प्रयत्न करीत असताना खाली पडून त्यांचा मृत्यू झाला. हा सातवा दिवस आहे. त्यांच्या मृत्यूनंतर ही त्यांची पहिली पुण्यतिथी आहे आणि माझ्या मालकाने त्यांच्या सन्मानार्थ एक छोटा उत्सव साजरा करायचे ठरविले आहे. तुम्ही त्यांच्या उत्तम मित्रांपैकी एक आहात म्हणून तुम्हाला त्यात सहभागी होण्याचे आमंत्रण दिले आहे. माझ्या

मालकाची इच्छा आहे की तुम्ही त्यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या घराला शोभा आणावी.”

हे शब्द ऐकल्याबरोबर माकडाला मनातल्या मनात खूप आनंद झाला कारण त्याची सर्व भीती जाऊन तो आता निश्चिंत झाला होता. त्याच्या विरोधात आता कपटकारस्थानाला सुरुवात झाल्याचा तो अंदाज करू शकला नाही. खेकड्याच्या मृत्यूबद्दल त्याला खूप आश्चर्य वाटल्याचे ढोंग करून तो म्हणाला,

“तुमच्या प्रमुखाच्या मृत्यूबद्दल ऐकून मला दुःख होत आहे. आम्ही जिवलग मित्र होतो हे तुम्हाला ठाऊक आहेच. मला आठवते की एकदा पेरसिमॉनच्या बी च्या बदल्यात आम्ही भाताचा गोळा अदलाबदली केला होता. शेवटी ते बी च त्याच्या मृत्यूला कारणीभूत व्हावे ह्या गोष्टीचा विचार करता मला दुःख होत आहे. तुमचे अनेक मनःपूर्वक आभार मानून मी तुमच्या विनंतीचा स्वीकार करतो. मला माझ्या जुन्या मित्राचा सन्मान करण्यात आनंदच होईल!” आणि त्याने त्याच्या डोळ्यातून खोटे अश्रू ढाळले.

तो दूत मनातल्या मनात हसला आणि त्याने विचार केला, “हा दुष्ट माकड आता खोटे अश्रू ढाळत आहे पण थोड्याच अवधीत तो खरे अश्रू ढाळेल,” पण त्याने मोठ्याने नम्रतेने माकडाचे आभार मानले आणि तो घरी गेला.

जेव्हा तो निघून गेला तेव्हा तो दुष्ट माकड त्या लहान खेकड्याच्या निरागसतेवर मोठ्याने हसला आणि थोडीही काही सहानुभूती न दाखविता जेथे त्याला आमंत्रित केले होते त्या खेकड्याच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या मेजवानीची प्रतिक्षा करू लागला. त्याने कपडे बदलले आणि गंभीरपणे तो त्या लहान खेकड्याकडे गेला.

त्याला दिसून आले की खेकड्याचे कुटुंब आणि नातेवाईक त्याचे स्वागत आणि पाहुणा म्हणून आदरातिथ्य करण्यासाठी त्याची वाट पाहत होते. भेटीच्या नमस्कारानंतर त्याला दिवाणखान्यात नेण्यात आले. तेथे शोक करणाऱ्या तरूणाने त्याचे स्वागत केले. त्यांच्यात सांत्वनाचे बोलणे झाले आणि आभारांची देवाण घेवाण झाली. ते सर्वजण शाही मेजवानीस बसले आणि पाहुण्यांसारखी त्यांनी माकडाची करमणूक केली.

मेजवानी संपली, त्याला चहापानाच्या गृहात एक कप चहा पिण्यासाठी आमंत्रित केले गेले. जेव्हा लहान खेकड्याने चहापानाच्या गृहात त्याला नेले तेव्हा त्याला तेथेच सोडून तो निघून गेला. खूप वेळ झाला तरी तो परतला नाही. शेवटी माकड अधीर झाले. तो स्वतःशीच म्हणालाः

“हा चहापानाचा विधी नेहमी फारच रटाळ असतो. इतका वेळ वाट पाहून मी थकलो जेवणाच्या वेळेला खूप साके प्यायल्यामुळे मला खूप तहान लागली आहे!”

तो नंतर लाकडी कोळशाच्या शेगडीजवळ गेला आणि किटलीमधून उकळते पाणी ओतू लागला. त्यावेळी कशाचा तरी राखेतून जोरदार स्फोट झाला आणि काहीतरी उडून माकडाच्या मानेच्या उजव्या बाजूला त्याचा जोराचा तडाखा बसला. ते कठीण कवचाचे फळ होते, खेकड्याच्या मित्रांपैकी एकाने ते त्या शेगडीत लपवून ठेवले होते. माकडाला खूप मोठा धक्का बसला. त्याने मागच्या बाजूस उडी मारली आणि नंतर तो त्या गृहामधून बाहेर पळू लागला.

पडद्याच्या बाहेर लपलेल्या मधमाश्या उडाल्या आणि त्यांनी माकडाच्या गालाचा चावा घेतला. माकडाला खूप वेदना होत होत्या, त्या कठीण कवचाच्या फळामुळे त्याच्या मानेला आग होत होती आणि मधमाश्यांनी चावा घेतल्यामुळे त्याचा चेहरा अतिशय ठणकत होता, पण तो संतापून किंचाळत आणि चीची करीत पळत होता.

आता खेकड्याच्या प्रवेशद्वाराजवळ दगडी उखळ अनेक दगडांसह लपलेले होते आणि जसे माकड त्याच्या खाली पळत आले तसे उखळ आणि सर्व दगड माकडाच्या डोक्यावर आदळले. प्रवेशद्वाराच्या टोकावरून खाली पडणाऱ्या उखळीचे वजन माकड सहन करू शकेल का? तो त्याखाली मोठ्याने वेदना होत चेंगरला गेला. उठायची त्याला शक्तीच राहिली नाही. जसा तो असह्य अवस्थेत पडला तसा लहान खेकडा आला आणि कातरीसारखे त्याचे मोठे पंजे माकडावर धरत तो म्हणाला, “आता तुला आठवते का की तू माझ्या बापाचा खून केला होता ते?”

“तर-मग-तू-आहेस माझा शत्रू— नाहीस का?” धापा टाकीत माकड हताश झालेले होते.

“अर्थातच,” लहान खेकडा म्हणाला.


“ती- तुझ्या-वडिलांची- चूक होती माझी नव्हे!” धापा टाकीत पश्चात्ताप न झालेले माकडे म्हणाले.

“अजूनही तू खोटे बोलू शकतोस? मी तुला लवकरच संपवून टाकतो!” आणि त्याच्या काळयाकुट्ट नखांनी त्याने माकडाचे डोके उडवून टाकले. अशा रितीने त्या दुष्ट माकडाला त्याच्या योग्यतेप्रमाणे शिक्षा मिळाली, आणि छोट्या खेकड्याने बापाचा सूड घेतला.

माकड, खेकडा आणि पेरसिमॉनच्या बी चा हा असा शेवट झाला.

* * * * *

# पांढरा ससा आणि सुसरी



फार फार वर्षांपूर्वी जेव्हा प्राणी बोलू शकत होते तेव्हा जपानमधील इनाबाच्या प्रांतात एक छोटासा पांढरा ससा रहात होता. समुद्राच्या एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्यापर्यंत पसरलेल्या इनाबाच्या मुख्य प्रदेशातील ओकीच्या बेटावर त्याचे घर होते.

आता सशाला समुद्र ओलांडून पलिकडे इनाबाकडे जाण्याची मोठी इच्छा होती. दिवसानुदिवस तो बाहेर जायचा, किनाऱ्यावर बसायचा आणि मोठ्या अभिलाषेने पाण्यावरून इनाबाच्या दिशेकडे बघत बसायचा. दिवसानुदिवस तो तेथे जाण्याच्या मार्गाचा शोध लागेल अशी आशा करायचा.

एके दिवशी नेहमीप्रमाणे तो ससा पलिकडे असलेल्या मुख्य प्रदेशाकडे बघत समुद्र किनाऱ्यावर उभा होता. त्याच वेळी त्याला एक मोठी सुसर बेटाजवळ पोहताना दिसली.

“मोठा योगायोगच आहे हा!” सशाने विचार केला. “आता मी माझी इच्छा पुरी करू शकेन. मी त्या सुसरीला समुद्राच्या त्या किनाऱ्यावर मला घेऊन जायला सांगेन!”

पण त्याला अशी शंका होती की त्याची इच्छा ती सुसर मान्य करेल की नाही. म्हणून त्याने विचार केला की तिला मदतीसाठी विनविण्याऐवजी त्याला जे हवे होते ते मिळविण्यासाठी युक्ती योजण्याचा प्रयत्न करावा.

म्हणून त्याने मोठ्या आवाजात सुसरीला हाक मारली, आणि म्हणाला,

“ओ, सुसर महाशय, किती सुंदर दिवस आहे आज नाही?”

तो सुसर आल्हाददायक उन्हाची मौज लुटण्यासाठी स्वतः एकटाच बाहेर आलेला होता. त्याला थोडेसे एकटे एकटे वाटत होते. तोच उल्हसित स्वागताने त्याची शांती भंग पावली. सुसर किनाऱ्याजवळ पोहत आला. त्याच्याशी कोणीतरी बोलत आहे हे ऐकून त्याला खूप आनंद झाला होता.

“मला आश्चर्य वाटले की आत्ताच माझ्याशी कोणीतरी बोलले! ते तुम्हीच होता का श्री. ससे महाराज? तुम्हाला स्वतःला खूपच एकटे एकटे वाटत असणार!”

“अहो नाही, मी सर्वथा एकटा नाही.” ससा म्हणाला. “पण हा दिवस फारच सुरेख असल्याने मी स्वतः मजा लुटण्यासाठी बाहेर आलो आहे. तुम्ही थांबून माझ्याबरोबर थोडावेळ खेळणार नाही का?”

सुसर समुद्राच्या बाहेर आला आणि किनाऱ्यावर बसला आणि ते दोघे काही वेळ एकत्रित खेळले. मग ससा म्हणाला,

“श्री सुसर महाशय, तुम्ही समुद्रात राहता आणि मी बेटावर राहतो. आणि आपण वारंवार भेटत नाही. म्हणून मला तुमच्याबद्दल फारच थोडं ठाऊक आहे. मग मला सांगा तुमचा समूह आमच्या समूहापेक्षा अधिक मोठा आहे का?”

“खचितच, सशांपेक्षा सुसरी अधिक आहेत,” सुसरीने उत्तर दिले. “तुम्ही स्वतः पाहू शकत नाही का? तुम्ही ह्या छोट्याशा बेटावर राहता तेव्हा मी समुद्रात राहतो. ते जगाच्या सर्व भागात विखुरलेले आहेत. म्हणून तर मी समुद्रात राहणाऱ्या सुसरींना एकत्रित बोलावले तर तुम्ही आमच्याशी तुलनाच करू शकणार नाही!” सुसर खूपच घमेंडखोर होता.

ज्याला सुसरीला फसविण्यासाठी युक्ती करायची होती, तो ससा म्हणाला,

“तुम्हाला असं वाटतं का की तुम्ही हव्या तेवढ्या सुसरींना बोलावून त्यांना समुद्राच्या ह्या किनाऱ्यावरून त्या किनाऱ्यावरच्या इनाबापर्यंत रांगेत उभे करू शकता?”

सुसरीने क्षणभर विचार केला आणि मग तो उत्तरला,

“अर्थात, हे शक्य आहे.”

“मग कर प्रयत्न,” कावेबाज ससा म्हणाला, “आणि मी येथपासूनच त्यांना मोजायला सुरुवात करीन!”

सुसर खूप सरळ, साध्या मनाचा होता. ससा त्याला फसविण्याची युक्ती योजित होता ह्याची त्याला मुळीच कल्पना नव्हती. आणि सशाने जे काही सांगितले त्याच्याशी तो सहमत झाला आणि म्हणाला,

“थांबा थोडं, मी मागे समुद्रात जातो आणि माझ्या समूहाला एकत्रित बोलावून आणतो.”

सुसरने समुद्रात मुसंडी मारली आणि काही काळ तो तेथेच राहिला. मधल्या काळात ससा किनाऱ्यावर थांबून सबुरीने वाट बघत होता. शेवटी तो खूप मोठ्या संख्येने इतर सुसरींना घेऊन प्रकट झाला.

“बघा श्री ससे महाराज!” सुसर म्हणाला, “हे ठिकाण ते इनाबापर्यंत रांग बनविणे म्हणजे माझ्या या मित्रांना फारसे विशेष वाटत नाही. इतक्या पुरेशा सुसरी आहेत की येथून तर चीन किंवा भारत देशापर्यंत त्या दूरवर पसरतील. कधी पाहिल्यात का तुम्ही इतक्या साऱ्या सुसरी?”

नंतर सुसरींच्या समग्र समूहाने पाण्यात स्वतः ओकी आणि इनाबाच्या मुख्य प्रदेशापर्यंत पूल तयार करण्याच्या हेतूने रचना केली. जेव्हा सशाने तो सुसरींचा पूल बघितला तेव्हा तो म्हणाला,

“किती भव्य! हे शक्य असेल ह्यावर माझा विश्वासच नव्हता. आता मला तुम्हाला सर्वांना मोजू दे! तथापि हे करण्यासाठी मी तुमची परवानगी घेतो की मला तुमच्या पाठीवरून चालत जावे लागेल तेव्हाच मला दुसऱ्या बाजूला जाता येईल, म्हणून कृपया हालचाल करू नका नाहीतर मी समुद्रात पडून बुडून जाईन!”

म्हणून तो बेटावरून उडी मारून सुसरींच्या विलक्षण पुलावरून उड्या मारीत, मोजत सुसरींच्या पाठीवरून दुसऱ्या बाजूला गेला.

“कृपया शांतता राखा, नाहीतर मला मोजता येणार नाही. एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ---- ”

अशा रितीने तो धूर्त ससा सुसरींच्या पाठीवरून समुद्र ओलांडून चालत बरोब्बर इनाबाच्या मुख्य प्रदेशाकडे गेला. इच्छा पूर्ण झाली तरी त्याला समाधान मिळाले नाही. त्यांचे आभार मानायचे सोडून तो त्यांची टवाळी करू लागला, आणि शेवटच्या सुसरीच्या पाठीवरून उडी मारताना म्हणाला,

“ओ! मूर्ख सुसरींनो, आता मी तुमचा वापर केलेला आहे!”

आणि शक्य तेवढ्या जलद पळून जाता येईल तेवढ्या जलद पळण्याच्या तयारीत तो होता. पण तो एवढ्या सहजासहजी निसटू शकला नाही. कारण त्या सुसरींना लवकरच कळून आले की केवळ समुद्र ओलांडण्यासाठी त्याने युक्ती करून त्यांना फसविले, आणि आता तो ससा त्यांच्या मूर्खपणाबद्दल त्यांना हसत होता, हे पाहून ते रागाने बेफाम झाले. आणि त्यांनी त्याचा सूड घेण्याचे ठरविले. म्हणून त्यांच्यापैकी काही त्याच्या मागे धावले आणि त्यांनी त्याला पकडले. नंतर त्या थकलेल्या छोट्या प्राण्याला त्यांनी घेरले आणि त्याच्या अंगावरची सर्व मऊ लव त्यांनी ओरबाडून काढली. तो मोठ्याने किंचाळला आणि त्याला इजा करू नका म्हणून त्याने त्यांच्या नाकदुऱ्या काढल्या. पण त्याच्या केसांचा प्रत्येक पुंजका ओरबाडून काढताना ते म्हणाले,

“योग्य बक्षिस मिळाले तुला!”

जेव्हा त्या सुसरींनी त्या सशाच्या मऊ लवाचा अखेरचा छोटा पुंजका ओरबाडून काढला तेव्हा त्यांनी त्याला समुद्र किनाऱ्यावरील वाळूत फेकून दिले आणि त्यांनी जे काही केले त्यावर हसत हसत पोहत ते दूर निघून गेले.

ससा खूप दयनीय वाईट अवस्थेत होता, त्याची सर्व पांढरी सुंदर मऊ लव ओरबाडली गेली होती. त्याचे उघडे छोटे शरीर वेदनेने थरथरत होते आणि सर्व बाजूंनी रक्तस्त्राव होत होता. तो हालचाल सुद्धा करू शकत नव्हता. आणि पूर्ण असहायपणे त्याच्यावर कोसळलेल्या दुर्दैवावर रडत होता. असे असले तरी ती दुर्दशा आणि शरीराच्या वेदना इनाबाचा तो पांढरा ससा सोशीत होता. पण कोणीही त्या गरीब बिचाऱ्या प्राण्याला त्याच्या वाईट अवस्थेत पाहून त्याविषयी वाईट वाटून त्याच्या मदतीसाठी धावून येऊ शकले नाही, कारण सुसरींनी त्याच्यावर खूप क्रूरपणे सूड उगवला होता.

याचवेळी राजाच्या मुलांसारखी दिसणारी अनेक मुले त्या बाजूने आली आणि समुद्र किनाऱ्यावर विव्हळत पडलेल्या त्या सशाकडे पाहून ते थांबले आणि काय झाले म्हणून त्यांनी विचारले.

सशाने त्याच्या दोन्ही पंजांमध्ये असलेले त्याचे डोके वर काढले आणि त्यांना उत्तर देत म्हटले,

“माझे काही सुसरींशी भांडण झाले त्यात मी झोडपला गेलो आणि त्यांनी माझी सर्व मऊ लव ओरबाडून काढली आणि वेदनेने तडफडण्यासाठी मला येथे सोडले. म्हणून मी आक्रोश करीत आहे.”

आता त्या तरूणांपैकी एक जण दुष्ट बुद्धीचा होता. पण त्याने दयाळूपणाचा आव आणला आणि तो सशाला म्हणाला, “मला तुझ्याबद्दल खूप वाईट वाटते. मला एक इलाज ठाऊक आहे, जर तू तो अंमलात आणायचा प्रयत्न केलास तर तुझ्या त्वचेची दुखरी जखम बरी होईल. जा आणि स्वतः समुद्रात अंघोळ कर. नंतर

परत येऊन वाऱ्यात बैस. ह्यामुळे तुझी मृदू लव पुन्हा उगवेल आणि तू जसा पूर्वी होतास तसा होशील.”

नंतर सर्व तरूण पुढे गेले. उपाय सापडल्याच्या विचाराने सशाला खूप आनंद झाला. तो गेला आणि त्याने समुद्रात अंघोळ केली आणि नंतर त्याच्या अंगावरून वारा वाहू शकेल अशा ठिकाणी तो बसला.

पण जसे वाऱ्याने वाहून त्याला कोरडे केले, तशी त्याची कातडी ताठर आणि कठीण झाली आणि मीठाने त्याच्या वेदना इतक्या तीव्र झाल्या की तो त्या यातनांनी वाळूवर गडबडा लोळू लागला आणि जोरजोरात आक्रोश करू लागला.

नंतर पाठीवर थैली घेतलेला राजाचा दुसरा मुलगा तेथे आला. त्याने सशाला पाहिले आणि तो थांबला आणि त्याने सशाला विचारले की तो इतक्या मोठ्याने का आक्रोश करीत आहे.

पण तो गरीब बिचारा ससा, तो माणूस आता त्याच्याशी बोलत होता तसाच दिसणाऱ्या दुसऱ्या माणसाकडून तो फसविला गेला होता ही आठवण काढून त्याने त्याला उत्तर दिले नाही पण रडणे चालूच ठेवले.

पण ह्या माणसाचे अंतःकरण दयाळू होते, आणि सशाला अतिशय दया दाखवित तो म्हणाला,

“हे गरीब बिचाऱ्या प्राण्या, मी बघत आहे तुझी सर्व मृदू लव ओरबाडून जाऊन तुझी कातडी उघडी झाली आहे. कोणी तुला अशी क्रूर वागणूक दिली?”

जेव्हा त्याने हे प्रेमळ शब्द ऐकले तेव्हा त्याला त्याबद्दल कृतज्ञता वाटली आणि शांतपणे प्रोत्साहन देण्याच्या त्याच्या पद्धतीवर प्रोत्साहित होऊन त्याच्यावर कोसळलेल्या संपूर्ण आपत्तीबद्दल त्याने त्या माणसाला सांगितले. त्या लहानशा प्राण्याने त्याच्या मित्रापासून काहीही लपविले नाही, तर त्याने सुसरींना युक्तीने कसे

फसविले आणि त्यांनी बनविलेला पूल ओलांडून त्यांना मोजत तो दुसऱ्या बाजूला कसा आला आणि त्यांच्या मूर्खपणाबद्दल त्याने त्यांची कशी टवाळी उडविली आणि नंतर सुसरींनी त्याच्यावर कसा सूड उगविला हे मनमोकळेपणाने सांगितले. नंतर त्याच्यासमोर असलेल्या दयाळू मित्रासारखाच दिसणाऱ्या त्या समूहातील एका माणसाने त्याला कसे फसविले हे सर्व त्या माणसाला सांगितले. सशाने त्याच्यावर कोसळलेल्या अरिष्टांची लांब कथा संपविताना, त्याच्या जखमा बऱ्या होतील आणि त्याची मृदू लव पुन्हा उगवेल असे औषध देण्याची त्याला विनंती केली.

जेव्हा त्या सशाने त्याची कहाणी संपविली, तेव्हा त्या माणसाला त्याची खूपच दया आली आणि तो म्हणाला,

“तुला जे काही सहन करावे लागले त्याबद्दल मला खूप वाईट वाटते, पण लक्षात ठेव तू लबाडी करून सुसरींना युक्तीने फसविले त्याचा हा परिणाम आहे.”

“मला ठाऊक आहे,” तो दुःखी ससा म्हणाला, “पण मला आता ह्याचा पश्चात्ताप झाला आहे, आणि मी असे ठरविले आहे की ह्यापुढे कोणालाही कधीही फसवायचे नाही, म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की जखमांनी ठणकणाऱ्या ह्या माझ्या शरीराला मी कसे बरे करू जेणेकरून माझी मृदू लव परत उगवेल, याबद्दल मला मार्गदर्शन करा.”

“मग मी तुला ह्यावर एक छान उपाय सांगतो,” तो माणूस म्हणाला, “पहिल्यांदा तळयात जाऊन त्यात स्वच्छ अंघोळ कर. आणि तुझ्या अंगावरील सारे मीठ धुऊन काढ. नंतर पाण्याच्या काठाजवळ उगवणारी काही काबा फुले तोड, ती जमिनीवर पसरव आणि त्यावर गडबडा लोळ. जर तू असं केलंस तर त्या पुष्प परागांमुळे तुझ्या अंगावर पुन्हा मृदू लव उगवेल आणि थोड्याच अवधीत तू संपूर्ण बरा होशील.”

काय करायला हवे हे त्याला मोठ्या प्रेमळपणे सांगितले गेल्याने सशाला खूप आनंद झाला. तो सरपटतच त्याला सांगितल्या गेलेल्या तळयाकडे गेला आणि त्यात नीटपणे त्याने अंघोळ केली. नंतर पाण्याजवळ उगवलेली काबा फुले तोडली आणि त्यावर स्वतःला लोळवून घेतले.

आणि काय आश्चर्य, जेव्हा तो ते करीत होता तेव्हा त्याने पाहिले की मृदू लव पुन्हा उगवली, वेदना थांबल्या आणि त्याच्या उद्भवलेल्या दुर्दैवापूर्वी त्याला जसे वाटायचे तसे वाटू लागले.

प्रकृतीत भराभर सुधारणा झाल्यामुळे तो हर्षोत्फुल्ल झाला आणि आनंदाने उड्या मारीत ज्याने त्याला मदत केली होती त्या माणसाकडे गेला आणि त्याच्यापुढे खाली गुडघे टेकून म्हणाला,

“जे काही तुम्ही माझ्यासाठी केले त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही! त्याबदल्यात तुमच्यासाठी काहीतरी करावे अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे. कृपया सांगा मला तुम्ही कोण आहात?”

“जसा तू विचार करतोस तसा मी राजाचा मुलगा नव्हे. पण मी देहधारी परी आहे. आणि माझे नाव ओकूनि-नुशि-नो-मिकोतो आहे,” त्या माणसाने उत्तर दिले, “आणि जे ह्या मार्गाने येथून गेलेले आहेत ते माझे भाऊ आहेत. इनाबाच्या प्रांतात याकामी नावाची सुंदर राजकन्या राहते असे त्यांनी ऐकलेले आहे, तिला शोधण्यासाठी आणि तिला लग्नाची मागणी घालण्यासाठी ते जात आहेत. पण ह्या मोहीमेतील मी त्यांचा नोकर आहे, म्हणून ही भली मोठी पोतडी घेऊन मी त्यांच्या मागे चालत आहे.”

ज्याची त्या भागात देवासारखी पूजा व्हायची त्या स्वतः महान परी ओकुनि-नुशि-नो-मिकोतोपुढे तो ससा विनम्र झाला.

“ओ, मला ठाऊक नव्हते की तुम्ही ओकुनि-नुशि-नो-मिकोतो आहात. किती दया केलीत तुम्ही माझ्यावर! ज्याने मला समुद्रात अंघोळ करायला पाठविले तो तुमच्या भावांपैकी एक होता यावर विश्वास ठेवणे मला अशक्य वाटते. मला पूर्णपणे खात्री आहे की ज्या राजकन्येच्या शोधात तुमचे भाऊ गेले आहेत ती पत्नी होण्यासाठी त्यांना नकार देईल आणि तुमच्या मनाच्या चांगुलपणामुळे तुम्हाला ती पसंत करेल. मला पूर्ण खात्री आहे की काही हेतू न धरता तुम्ही तिचे हृदय जिंकाल आणि ती तुमची पत्नी होण्यासाठी तुम्हाला विचारणार.”

ससा काय म्हणाला इकडे ओकुनि-नुशि-नो-मिकोतोने लक्ष दिले नाही, पण त्या इवल्याशा प्राण्याला निरोप देऊन त्याने झपाझप पावले टाकीत त्याच्या भावांना गाठले. त्याला दिसून आले की नुकतेच ते राजकुमारीच्या प्रवेशद्वारात पोहोचले आहेत.

त्या सशाने जसे म्हटले होते त्याप्रमाणेच त्यापैकी कोणत्याही भावाकडून पत्नी बनविण्यासाठी राजकुमारीचे मन वळविले गेले नाही, पण जेव्हा तिने त्या दयाळू भावाचा चेहरा बघितला तेव्हा ती सरळ त्याच्याकडे गेली आणि म्हणाली,

“मी स्वतःला तुम्हाला देऊ करते,” आणि अशा रितीने त्यांचा विवाह झाला.

असा ह्या गोष्टीचा शेवट आहे. ओकुनि-नुशि-नो-मिकोतो ची जपानच्या काही भागात देवाप्रमाणे पूजा केली जाते. आणि तो ससा “इनाबाचा पांढरा ससा” म्हणून प्रसिद्ध झाला. पण त्या सुसरींचे काय झाले हे कोणालाच ठाऊक नाही.

# राजकुमार यामातो ताकेची गोष्ट




महान जपानी सम्राटाच्या अधिकार चिन्हांनी तीन खजिने बनले होते जे अतिशय पवित्र मानले जात होते व अतिप्राचीन काळापासून अतिशय सतर्कतेने पहारा देऊन आणि अति सावध काळजीने संरक्षित केले गेले होते. ते होते यातानो-नो-कागामी किंवा याताचा आरसा, यासा कामी-नो-मागानामा किंवा यासाकामीचे मणिरत्न, आणि मुराकुमो-नो-त्सुरुगी किंवा मुरा कोमोची तलवार.

सम्राटाच्या या तिन्ही खजिन्यांपैकी मुराकोमोची तलवार कुसानागी-नो-त्सुरुगी किंवा गवत कापण्याची तलवार सर्वात जास्त मौल्यवान आणि सर्वात जास्त सन्मानित झाली, कारण ती ह्या देशाच्या योद्ध्यांच्या सामर्थ्याचे प्रतिक आणि

सम्राटाच्या अवध्यतेचा संरक्षक ताईत होती. कारण तो सम्राट त्यांना त्यांच्या पूर्वजांच्या समाधीतील पूजनीय वस्तू समजत होता.

जवळ जवळ दोन हजार वर्षांपूर्वी ही तलवार इतेच्या समाधीवर म्हणजेच अमातेरासू ह्या अतिशय महान सौंदर्यशाली सूर्य देवतेची पूजा केली जाते त्या मंदिरात ठेवलेली होती, ज्यांचे जपानी सम्राट वंशज मानले जातात.

त्या तलवारीचे नाव मुराकुमो ऐवजी कासानागी म्हणजे गवत स्वच्छ करणारी का पडले ह्या संबंधी शौर्य, धाडस आणि धैर्याचे स्पष्टीकरण करणारी ही गोष्ट आहे.

फार फार वर्षांपूर्वी सम्राट केइको, जपानी राजघराण्याचा संस्थापक महान जिम्मूच्या बाराव्या वंशजाला मुलगा झाला. हा राजकुमार सम्राट केइकोचा दुसरा मुलगा होता आणि त्याचे नाव होते यामातो. त्याच्या बालपणापासून तो किती विलक्षण सामर्थ्यशाली, सूज्ञ आणि धैर्यवान होता हे त्याने सिद्ध करून दाखविले होते, आणि त्याच्या वडिलांना त्याच्या उत्तम भवितव्याबद्दल गर्व होता, आणि तो त्याच्या मोठ्या मुलापेक्षाही त्यावर अधिक प्रेम करीत असे.

आता जेव्हा राजकुमार यामातो एक मर्द माणूस झाला (जपानच्या जुन्या काळातील इतिहासात मुलाने वयाच्या प्रारंभीच्या काळातील सोळा वर्षे पूर्ण केल्यास त्याला प्रौढत्व आले असे मानले जाई.) तेव्हा फरारी लोकांच्या टोळीचे प्रमुख दोन भाऊ कुमासो आणि ताकेरु होते. त्यांच्यापासून राज्यावर संकटे येऊ लागली. हे बंडखोर राजाविरूद्ध बंड करणे, हुकूमत न जुमानणे, कायदेभंग करणे ह्या गोष्टीतच आनंद मानत होते.

शेवटी राजा केइकोने त्याचा लहान मुलगा राजकुमार यामातोला त्या लुटारूंना नमविण्यासाठी आणि शक्य असेल तर त्याच्या प्रदेशाची त्याच्या वाईट वर्तणुकीपासून सुटका करून घेण्यासाठी हुकूम सोडला. राजकुमार यामातोचे वय फक्त सोळा वर्षांचे होते, परंतु कायद्यानुसार तो प्रौढ झाला होता. आणि जरी तो त्याच्या

ह्या तारूण्यात असला तरी त्याची पूर्ण वयाच्या योद्ध्याची निर्भय वृत्ती होती आणि भीती म्हणजे काय हे त्याला ठाऊक नव्हते. धाडस आणि धाडसी कृत्ये करण्यात त्याला कोणीही प्रतिस्पर्धी नव्हता, असे असूनही त्याने त्याच्या वडिलांचा हुकूम आनंदाने स्वीकारला.

त्याने ताबडतोब निघायची तयारी केली आणि जसे त्याचे एकनिष्ठ अनुयायी मोहीमेला जाण्यासाठी एकत्र जमले आणि सर्व चिलखते घासून लख्ख केले जाऊन अंगावर चढविले गेले तेव्हा त्या राजवाड्याच्या पंचक्रोशीत खळबळ माजली. वडिलांचा दरबार सोडण्यापूर्वी तो इतेच्या समाधीजवळ आला. त्याची आत्या राजकुमार यामातोचा निरोप घेण्यासाठी गेली कारण त्याचे अंतःकरण धोक्याला तोंड देण्याच्या विचाराने दुःखी झाले होते. आणि त्याला त्याचे पूर्वज, अमातेरासू सूर्यदेवतेकडून सुरक्षा कवच हवे होते. राजकुमारी आत्या त्याचे आनंदाने स्वागत करण्यासाठी आणि त्याच्या पित्याने, राजाने त्याच्यावर विश्वासाने सोपविलेल्या कामगिरीबद्दल त्याचे अभिनंदन करण्यासाठी बाहेर आली. हे खात्रीने तुझे नशीब उजळवेल आणि तुझ्या धाडसी मोहीमेत मदत करेल असे म्हणत तिने त्याला एक आकर्षक पायघोळ अंगरखा ही आठवण राहील अशी छोटी भेटवस्तू दिली. नंतर तिने, त्याने स्वीकारलेल्या कार्यात त्याला यश आणि गती मिळावी म्हणून सदिच्छा व्यक्त केली आणि त्याचे अभिष्टचिंतन करून त्याला निरोप दिला.

तो तरूण राजकुमार आत्यापुढे वाकला आणि मोठ्या आनंदाने आणि विनम्रतेने त्याने त्या दयापूर्ण भेटवस्तू स्वीकारल्या.

अनेक दिवसांनंतर तो दक्षिणेकडील बेटावर पोहोचला. त्याने हळूहळू आणि खात्रीपूर्वक कुमासो आणि ताकेरूच्या मुख्यालयापर्यंत मार्ग क्रमिला. त्याला आता खूप संकटांना तोंड द्यावे लागले कारण त्याला आढळून आले की तो भूप्रदेश जंगली आणि पराकाष्ठेचा कठीण होता. पर्वत खूप उंच आणि मोठ्या चढणीचे होते. दऱ्या खोल आणि कोळोखलेल्या होत्या. प्रचंड वृक्ष आणि खडकाचे मोठे सुळके यांनी

मार्गात अडथळे येऊन त्याच्या सैन्याच्या मार्गक्रमणाला थोपविले गेले होते. पुढे जाणे सर्वस्वी अशक्य होते.

जरी तो राजकुमार युवक होता तरी त्याच्या जवळ शहाणपण होते, आणि पुढे त्याच्या माणसांना घेऊन जाण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे हे जाणून तो मनाशी म्हणाला,

“माझ्या माणसांना ह्या दुर्गम आणि त्यांच्यासाठी अज्ञात असलेल्या प्रदेशात युद्ध लढायची धडपड करायला लावणे म्हणजे माझेच काम मी अवघड करून घेण्यासारखे आहे. आपण रस्ते साफ करू शकत नाही आणि झुंजही देऊ शकत नाही. डावपेचाचा अवलंब करणे आणि माझ्या शत्रूवर त्यांच्या नकळत चाल करून जाणेच शहाणपणाचे होईल. अशा रितीने फारसे परिश्रम न घेताच मी त्यांना मारून टाकू शकेन.”

म्हणून त्याने त्याच्या सैन्याला त्या मार्गावरच थांबण्याची आज्ञा केली. त्याची पत्नी राजकुमारी ओतोताची बाना त्याच्या सोबतच होती. तिला त्याने इतेच्या धर्मोपदेशिकेने दिलेला पोषाख आणायला सांगून त्याला स्वतःवर स्त्रीसारखा पोषाख चढवायला मदत करायला सांगितले. तिच्या मदतीने त्याने तो पोषाख घातला आणि त्याचे केस त्याने खांद्यावरून रुळू दिले. ओतोताची बानाने तिचा कंगवा आणला, तो त्याने त्याच्या केसांच्या काळया वेणीत खोवला, आणि नंतर त्याने तुम्ही पाहिलेल्या चित्रातल्या प्रमाणे मणीरत्नांच्या माळांनी स्वतःला सजविले. जेव्हा त्याने अपूर्व सौंदर्यप्रसाधनांचा वापर करून केस विंचरले, तेव्हा ओतोताची बानाने त्याला आरसा आणून दिला. स्वतःला निरखून पाहिल्यावर त्याने स्मित केले—वेषांतर अगदी बिनचूक झाले होते.

स्वतःलाच तो ओळखू शकत नव्हता इतका बदल त्यात झाला होता. योद्ध्याच्या सर्व खुणा नाहीशा झाल्या होत्या आणि खरोखर एक तेजस्वी सुंदर तरूणी त्याच्याकडे वळून बघत असल्याचे त्याला दिसले.

अशा रितीने पूर्णपणे वेषांतर करून तो एकटाच शत्रूच्या छावणीकडे निघाला. रेशमी झग्याच्या घड्यांमध्ये त्याने सामर्थ्यशाली हृदयाशेजारी एक तीक्ष्ण धारदार खंजीर लपविलेला होता.

जेव्हा राजकुमार पोहोचला तेव्हा ते दोन मुख्य कुमासो आणि ताकेरू त्यांच्या तंबूत शीतल संध्याकाळी विश्रांती घेत होते. त्यांच्या टोळीचा समूळ नाश करण्याच्या उद्देशाने राजाचा पुत्र त्यांच्या प्रदेशात अफाट सैन्यानिशी शिरला आहे अशी बातमी नुकतीच त्यांच्या कानावर आल्याने ते तीच चर्चा करीत होते. त्या दोघांनी त्या तरूण योद्ध्याची कीर्ती ऐकली होती आणि त्यांच्या दुष्ट आयुष्यात ते पहिल्यांदाच घाबरले होते. त्यांच्या संभाषणात खंड पडून त्यांनी वर पाहिले आणि तंबूच्या दरवाजातून बाहेर पाहिल्यावर त्यांना भव्य मौल्यवान वेषातील एक लावण्यवती स्त्री त्यांच्याकडे येताना दिसली. मंद संधिप्रकाशात अचानक पिशाचासारखी ती लावण्यवती स्त्री प्रगट झाली. त्यांचा भयंकर शत्रू वेष बदलून त्यांच्या पुढ्यात उभा आहे असे अल्पसेही त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते.

“काय अप्रतिम लावण्यवती आहे ही स्त्री! कोठून आलेली आहे ही?” त्या कोमल आगंतुकाला पाहून त्यांचे युद्ध आणि त्यावरील चर्चा सारे काही विसरून विस्मय चकित झालेला कुमासो म्हणाला.

त्याने वेषांतर केलेल्या राजकुमाराला बोटाने खुणावून, त्याला खाली बसायला सांगून मदिरा वाटण्याची आज्ञा केली. यामातो ताकेचे हृदय कमालीच्या आनंदाने उचंबळून आले कारण त्याला कळून चुकले होते की त्याची योजना आता सफल होईल. तथापि त्याने कुशलतेने त्याच्या भावना लपविल्या, आणि गोड लाजण्याच्या मुद्रेचा आव आणून तो मंद पावले टाकीत भेदरलेल्या हरिणीसारखे दृष्टीक्षेप टाकीत तो बंडखोरांच्या प्रमुखाकडे गेला. त्या मुलीच्या मोहक लावण्याने बेभान होऊन तिच्या दर्शनाच्या आनंदाच्या भरात ग्लासावर ग्लास ओतून शेवटी अतिमद्यपानाने तो तर्र झाला.

हाच तो क्षण होता की ज्याची तो शूर राजकुमार वाट बघत होता. मद्याचे पात्र जोरात खाली आपटीत त्याने त्या झिंगलेल्या आणि विस्मयचकित झालेल्या कुमासोला पकडले आणि छातीमध्ये लपविलेला खंजीर काढून त्याला भोसकून ठार मारून टाकले.

ताकेरू, त्या लुटारूचा भाऊ, जेव्हा हे पाहू लागला तेव्हा त्याला भीतीने धक्काच बसला आणि त्याने तेथून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. पण राजकुमार यामातो त्याच्यापेक्षा चपळ होता. तो तंबूच्या जवळ जाण्यापूर्वीच राजकुमार त्याच्या टाचेवर उभा राहिला आणि पोलादी हातांनी त्याने त्याचे कपडे घट्ट पकडले, आणि तो खंजीर क्षणभर त्याच्या डोळयांपुढे चमकला आणि त्याने त्याला भोसकले. तो जमिनीवर मरणोन्मुख होऊन कोसळला पण अजूनही मेलेला नव्हता.

“एक क्षणभर थांबा!” वेदनेने धापा टाकीत तो लुटारू म्हणाला आणि त्याने राजकुमाराचे हात पकडले.

यामातोने पकड थोडी सैल केली आणि म्हणाला, “का थांबावे मी, दुष्ट माणसा तू ?”

तो लुटारू भीतीने उभा राहिला आणि म्हणाला, “सांगा मला कोठून आलात तुम्ही, आणि हे सन्माननीय श्रेय मी कोणाला देऊ? आजपावेतो माझा विश्वास होता का माझा मृत भाऊ आणि मीच ह्या प्रदेशात सर्वात अधिक शक्तीशाली व्यक्ती आहोत, आणि आम्हाला पराभूत करू शकेल असा कोणीही येथे नाही. फक्त तूच आमच्या ह्या बालेकिल्ल्यात येण्याचे धाडस केलेस. तू एकट्यानेच आमच्यावर हल्ला करून आम्हाला ठार मारलेस! नक्कीच तू मर्त्य प्राण्यापेक्षा अधिक काहीतरी आहेस, नाही का?”

नंतर तो तरूण राजकुमार गर्वाने स्मित करीत उत्तरला, “मी राजाचा पुत्र आहे आणि माझे नाव यामातो आहे. आणि तुमच्या वाईट कृत्यांचा सूड घेऊन सर्व बंडखोरांना ठार मारण्यासाठी मला पाठविण्यात आले आहे. यापुढे लुटालूट आणि खून ह्या भीतीचे सावट आमच्या लोकांवर कधीही राहणार नाही. आणि लाल रक्ताने निथळणारा खंजीर त्याने त्या बंडखोराच्या डोक्यावर धरला.

“ओह,” मोठ्या कष्टाने धापा टाकीत तो मरणोन्मुख माणूस म्हणाला, “मी तुझ्याबद्दल अनेकदा ऐकले आहे. तू खरोखरच सहजगत्या आम्हाला हरविणारा बलवान माणूस आहेस. तुला नवे नाव देण्याची मला परवानगी दे. इतःपर तू यामातो ताके म्हणून ओळखला जाशील. यामातो मधील अतिशय धैर्यशाली पुरूष ही आमची पदवी तुला मरताना मी बहाल करतो.”

आणि ह्या उदात्त शब्दांबरोबर ताकेरू मागे कोसळला आणि मृत्यू पावला.

राजकुमाराने अशा रितीने यशस्वीरित्या जगातील त्याच्या पित्याच्या शत्रूंचा शेवट केला आणि राजधानीकडे परतण्यास तयार झाला. त्याच्या परतीच्या मार्गात तो इदूमच्या प्रांतामधून गेला. तेथे त्याला ज्याने त्या प्रदेशात खूप हिंसाचार केला होता हे त्याला ठाऊक होते त्या इद्सूयो ताकेरू ह्या फरार दुष्टाशी गाठ पडली. त्याने पुन्हा डावपेचाचा अवलंब केला आणि काल्पनिक नाव धारण करून त्या बंडखोराशी मैत्रीचे नाटक केले. हे केल्यावर त्याने लाकडाची तलवार बनवली आणि त्याच्या भक्कम तलवारीच्या बाजूला असलेल्या दांड्यात घट्टपणे कोंबून ठेवली. ती त्याने मुद्दामहून त्याच्या बाजूला खोवली आणि जेव्हा जेव्हा त्या तिसऱ्या लुटारूला ताकेरूला भेटण्याची वेळ येई तेव्हा तेव्हा तो ती धारण करत असे.

आता त्याने ताकेरूला हितोकावा नदीच्या तीरावर येण्याचे आमंत्रण दिले आणि उत्साहवर्धक शीतल पाण्यात पोहण्यासाठी उद्युक्त केले.

उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे तो बंडखोर नदीत सूर मारायला अनुत्सुक नव्हता, त्याचा शत्रू अजूनही प्रवाहात खाली पोहत होता हे पाहून राजकुमाराने मागे वळून शक्य तेवढ्या जलदगतीने किनारा गाठला. त्याला कळू न देता ताकेरूच्या धारदार पोलादी तलवारीच्या जागी आपल्याकडची लाकडी तलवार ठेवून शिताफीने अदलाबदली केली.

काहीच ठाऊक नसलेला लुटारू लवकरच किनाऱ्यावर आला, जमिनीवर पोहोचल्याबरोबर त्याने अंगावर कपडे चढविले, राजकुमार पुढे आला आणि त्याने तलवारबाजीतील कौशल्य आजमावण्यासाठी त्याला आव्हान देत म्हटले, “चला आपणा दोघांपैकी कोण उत्तम तलवारबाज आहे हे सिद्ध करू या!”

तो लुटारू मोठ्या आनंदाने राजी झाला, त्याला खात्री होती की त्याचाच विजय होईल कारण त्या प्रांतात तोच सुप्रसिद्ध तलवारबाज होता आणि त्याचा शत्रू कोण होता हे त्याला ठाऊक नव्हते. त्याने ती त्याचीच तलवार आहे म्हणून पटकन उचलली आणि हल्ल्याला तोंड देण्यास आणि स्वतःचे रक्षण करण्यास सज्ज झाला. अरेरे! त्याची तलवार राजकुमाराच्या तलवारींपैकी एक लाकडाची होती आणि व्यर्थपणे तो ती म्यानातून काढण्याचा प्रयत्न करीत होता. ती खूप घट्ट बसली होती, त्याच्या शक्तीचा जोरदार वापर करूनही तो तिला हलवू शकला नाही. जरी त्याच्या प्रयत्नांना यश आले होते तरी त्या तलवारीचा त्याला काहीच उपयोग होऊ शकणार नव्हता कारण ती लाकडाची होती. यामातो ताकेने पाहिले की त्याचा शत्रू सर्व शक्ती एकवटून येतो आहे, तेव्हा त्याने ती तलवार उंचावर धरली जी त्याने ताकेरूपासून घेतली होती, ती त्याने खाली आणली आणि त्याच्या हस्तनैपुण्याने त्याने त्या लुटारूचे डोके उडविले.

अशा रितीने कधी बुद्धिमत्तेचा वापर करून आणि काही वेळा शारीरिक सामर्थ्याचा उपयोग करून आणि इतर वेळा त्या काळात जी सर्वमान्य होती व जी आजच्या काळात निंद्य मानली जाते अशा कपट नीतीचा अवलंब करून राजाच्या

शत्रूंना एकामागोमाग एक जिंकले आणि देशाला आणि लोकांना शांतता आणि सुख प्राप्त करून दिले.

जेव्हा तो राजधानीत परत आला तेव्हा राजाने त्याच्या धाडसी कृत्यांची खूप प्रशंसा केली आणि त्याच्या सन्मानार्थ व तो सुरक्षितरित्या घरी परत आला म्हणून राजाने राजवाड्यात मोठी मेजवानी दिली आणि त्याला अनेक अत्युत्तम भेटवस्तू दिल्या. तेव्हापासून राजा कधी नव्हे तेवढे अधिकाधिक प्रेम करू लागला आणि त्याच्या दृष्टीसमोरून कोठेही जाऊ दिले नाही कारण यामातो ताके, त्याचा मुलगा ह्यास अतिशय मौल्यवान आणि त्याच्या हातांपैकी एक हात मानले.

पण राजकुमाराला इतके मोठे जीवन कंटाळवाणेपणे जगणे आवडत नव्हते, जेव्हा तो जवळ जवळ तीस वर्षांचा झाला तेव्हा, आइनू वंशाचे जपानच्या बेटावरचे आदिवासी जे जपानी लोकांकडून जिंकले जाऊन उत्तरेला ढकलले गेले होते त्यामुळे त्यांना दिलेल्या पूर्वजांच्या प्रांतातील लगतच्या प्रदेशात त्यांनी बंडखोरी माजवली होती. राजाने ठरविले की तेथे सैन्य पाठवून त्यांच्याशी युद्ध करावे आणि त्यांच्यात समझोता घडवून आणावा, पण त्यांचे नेतृत्व कोण करेल?

राजकुमार यामातो ताकेने लगेच त्या नव्याने निर्माण झालेल्या बंडखोरांना हुकमतीखाली आणण्यासाठी मला पाठवावे असा प्रस्ताव मांडला. आता राजाचे राजकुमारावर अतिशय प्रेम होते व त्याच्या नजरेआड झालेला एक दिवसाचा कालावधीसुद्धा तो सहन करीत नसे, म्हणूनच निश्चितच त्या धोकादायक मोहिमेवर त्याला पाठवायला राजा नाखूष होता. पण त्या सर्व सैन्यामध्ये त्याच्या राजकुमारासारखा सामर्थ्यशाली आणि शूर योद्धा कुणीही नव्हता, म्हणून महाराजांना पर्यायच उरला नाही म्हणून मोठ्या नाखुषीने यामातोच्या इच्छेला त्यांनी अनुमती दिली.

जेव्हा राजकुमाराची जाण्याची वेळ झाली तेव्हा राजाने एक होली वृक्षाचा आठ हात लांब असा भाला दिला. (त्याची मूठ बहुधा होली वृक्षाच्या

लाकडापासून बनविलेली असावी.) आता त्याने आइनू नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्वेकडील बंडखोरांना नमविण्याची आज्ञा केली.

जेव्हा सैनिक युद्धासाठी बाहेर पडत तेव्हा राजाकडून त्यांना आठ हात लांब भाला म्हणजे योद्ध्याचे पारितोषिक दिले जाई. आजच्या काळातील निशाण किंवा ध्वज ह्याचे तेच मोल सैन्यदलाकडून दिले जाते.

राजकुमाराने आदराने आणि मोठ्या पूज्य भावाने राजाकडून तो भाला स्वीकारला आणि राजधानी सोडून त्याने सैन्यासह पूर्वेकडे कूच केले. त्याच्या मार्गात त्याने सर्वप्रथम पूजाअर्चा करण्यासाठी इतेच्या सर्व मंदिरांना भेट दिली आणि त्याची आत्या राजकुमारी यामातो आणि श्रेष्ठ धर्मोपदेशिका त्याच्या स्वागतासाठी बाहेर आली. ही तीच होती जिने पूर्वी त्याला तिचा पोषाख दिला होता जो वरदान म्हणून सिद्ध झाला होता आणि त्या पश्चिमेकडील लुटारूंचा शिरच्छेद करण्यात त्याला त्याचे सहाय्य झाले होते.

त्याने त्याच्या बाबतीत जे काही घडले ते सारे काही तिला सांगितले, आणि ह्याच्या आधीच्या त्याच्यावर नेमून दिलेल्या कामगिरीच्या यशस्वितेत तिने दिलेल्या भेटवस्तूंचा खूप मोठा वाटा होता असे सांगून तिचे मनःपूर्वक आभार मानले. जेव्हा तिला कळले की त्याच्या पित्याने त्याला शत्रूंशी युद्ध करण्यासाठी पुन्हा बाहेर पाठवले आहे तेव्हा ती मंदिरात गेली, आणि एक तलवार व एक सुंदर बटवा, जो तिने स्वतः बनविला होता आणि ज्यात ठिणगी पाडण्यासाठी वापरण्यात येणारे गारगोटीचे दगड होते तो घेऊन ती पुन्हा प्रकटली, त्याकाळात अग्नि निर्माण करण्यासाठी आगपेटीऐवजी लोक त्याचा वापर करीत. ह्या सर्व भेटवस्तू तिने त्याला निरोप देताना दिल्या.

ती तलवार म्हणजे मुराकोमोची तलवार होती, तीन खजिन्यांपैकी एक आणि जपानच्या बादशहाच्या निवासस्थानापैकी एक होती. जी तिने तिच्या

भाच्याला दिली, त्या पेक्षा भाग्याचे कुठलेही कवच नसेल आणि त्याचा योग्य निकडीच्या प्रसंगीच त्याचा वापर कर अशी तिने त्याला आज्ञा केली.

यामातो ताकेने आता त्याच्या आत्याचा निरोप घेतला, आणि पुन्हा त्याच्या सैन्याचे प्रमुखत्व स्वीकारून ओवाटीच्या प्रांतातून अतिपूर्वेकडे कूच केले आणि नंतर तो सुरूगाच्या प्रांतात पोहोचला. येथील प्रशासकाने राजकुमाराचे सहृदय स्वागत केले आणि बादशाही मेजवानी देऊन त्याचे मनोरंजन केले. जेव्हा हे सारे संपले तेव्हा प्रशासकाने त्याच्या पाहुण्यास सांगितले की त्याचा देश काळवीटांसाठी खूप प्रसिद्ध आहे आणि राजकुमाराच्या करमणुकीसाठी त्यांनी शिकारीला यावे म्हणून इच्छा व्यक्त केली. राजकुमार यजमानाच्या सौजन्याने पूर्णपणे फसला, जे पूर्णपणे ढोंग होते, आणि त्याने शिकारीत सहभागी होण्याची अनुमती दिली.

नंतर त्या प्रशासकाने राजकुमाराला निबिड अरण्यात आणि विस्तृत मैदानात नेले जेथे विपुल प्रमाणात आणि उंचच उंच गवत वाढलेले होते. त्याच्या मृत्यूचा घाट घालण्याच्या इच्छेने त्याच्यासाठी एक सापळा रचला आहे ह्याची राजकुमाराला काहीही कल्पना नव्हती. राजकुमाराने स्वार होऊन काळविटांची शिकार केली तेव्हा काय आश्चर्य की त्याच्या समोरच्या झुडुपातून त्याने ज्वाला आणि धूर बाहेर येताना पाहिले. धोका जाणून तो मागे वळण्याचा प्रयत्न करू लागला पण तो जाण्यासाठी घोड्याला वळवितो न वळवितो तोच त्याच्या विरूद्ध दिशेला सुद्धा गवताळ प्रदेशाने पेट घेतला होता. त्याचवेळी त्याच्या उजव्या आणि डाव्या बाजूंनी अग्निज्वाला भडकल्या आणि सर्व बाजूंनी अतिशय जलद गतीने त्याच्याकडे येऊ लागल्या. त्याने अवतीभवती सुटकेसाठी संधी शोधली. तेथे कोणीही नव्हते. तो अग्निने वेढला गेला.

“ही काळविटांची शिकार म्हणजे फक्त धूर्त शत्रूची चलाखी होती तर!” तो राजकुमार त्याच्याकडे सर्व बाजूंनी सरकत येणाऱ्या, त्याच्याभोवती तडतडणाऱ्या भडकलेल्या ज्वालांकडे आणि धूराकडे पाहून म्हणाला,

“किती मूर्ख आहे मी. एखाद्या हिंस्त्र प्राण्यासारखा मोहात पडून मी ह्या सापळयात अडकलो!” आणि तो त्या प्रशासकाच्या विश्वासघातकी स्मितहास्याचा विचार करीत संतापाने दातओठ खाऊ लागला.

आता खूप भयंकर परिस्थिती असूनही, राजकुमार मुळीच गोंधळला नाही. ह्या भयानकतेच्या कहरात त्याने जेव्हा त्याच्या आत्याचा निरोप घेतला होता तेव्हा तिने त्याला दिलेल्या भेटवस्तूंची आठवण झाली. त्याला वाटले की तिने भविष्यसूचक दूर दृष्टीने अंदाज करून ह्या वेळेची गरज ओळखली असणार. त्याने शांतपणे त्याच्या आत्याने दिलेल्या चकमकीच्या गारगोट्यांनी भरलेली पिशवी उघडली आणि त्याच्याजवळचे गवत पेटवून दिले. नंतर त्याने म्यानातून मुराकुमोची तलवार बाहेर काढली आणि अतिशय वेगाने त्याच्या बाजूचे गवत कापायला सुरुवात केली. गरज पडल्यावर मरू सुद्धा असे त्याने मनाशी ठरवून घेतले. येणाऱ्या मृत्यूची केवळ वाट पाहत उभे न राहता तो मृत्यूशी झुंज देऊ लागला.

विलक्षण गोष्ट अशी घडली की वाऱ्याने वाहण्याची दिशा बदलून तो विरूद्ध दिशेने वाहू लागला. अद्यापपर्यंत झुडुपांचा जळणारा व त्याला भेडसावणारा अतिशय भयंकर हिस्सा आता वाऱ्याने उडत त्याच्याकडून लगेच वळला आणि राजकुमाराच्या शरीरावर एकही ओरखडा न उमटता व त्याचा एकही केस न जळता त्याची आश्चर्यकारकरित्या सुटका झाली. तेव्हा वाऱ्याने झंझावाताचे रूप घेतले आणि त्याने अनपेक्षितपणे प्रशासकाला घेरले आणि दुसऱ्याला मारणाराच ज्वालेत जळून मृत्यूमुखी पडला.

आता राजकुमाराने त्याच्या सुटकेचे श्रेय मुराकुमोच्या तलवारीच्या गुणवैशिष्ट्यास आणि इतेच्या सूर्यदेवतेने केलेल्या अमातेरासू यांच्या संरक्षणाला आणि त्याने संकटाच्या काळात तिची आराधना केल्याने, तिने वारा आणि सर्व नैसर्गिक शक्तींना नियंत्रणात आणून त्याच्या सुरक्षिततेची हमी घेतली होती, त्यांना दिले. त्याने त्याची मौल्यवान तलवार त्याच्या डोक्यावर आदराचे प्रतीक म्हणून

अनेकदा उंच धरली. आणि त्याचवेळी त्याने तिला कुसानागी-नो-त्सुरुगी किंवा तृणभेदक तलवार म्हणून नवे नाव दिले. जेथे त्याला पेटलेल्या गवताच्या अग्निने घेरले होते आणि त्या गवताळ प्रदेशात तो जळण्यापासून वाचला होता त्या प्रदेशाला त्याने याइदझू हे नाव दिले. ह्या दिवसापर्यंत ते स्थान याइदझू नावाच्या मोठ्या तोकाइदो रेल्वे स्थानकाजवळ आहे, ते स्थान जेथे थरारक प्रसंग घडला होता ते, म्हणून ओळखले जाऊ लागले.

अशारितीने शूर राजकुमार यामातो ताके शत्रूने टाकलेल्या जाळयातून निसटला. तो हिकमती आणि धाडशी होता. शेवटी त्याने शत्रूंवर कुरघोडी करून त्यांना नमविले. याइदझू सोडून तो शेवटी पूर्वेकडे निघाला आणि तेथून त्याला ओलांडून ज्या कादझूसाकडे जायचे होते त्या किनाऱ्याकडे आला.

ही भयंकर आणि साहसपूर्ण कृत्ये करताना त्याची एकनिष्ठ आणि प्रिय पत्नी राजकुमारी ओतोताची बाना त्याच्या मागोमाग येत होती. त्याच्यासाठी तिने त्या दीर्घ कंटाळवाण्या प्रवासाची आणि युद्धाच्या भयानकतेची पर्वा केली नाही. कारण ती तिच्या लढवय्या पतीवर अतिशय प्रेम करीत होती. त्या प्रेमापोटी त्याच्यावर युद्धात सैनिकांनी छापा मारल्यास त्याच्या हाती तलवार द्यावी किंवा तो थकून भागून छावणीत आल्यावर त्याच्या गरजेप्रमाणे त्याची शुश्रुषा करावी असे तिला वाटे.

परंतु राजकुमाराचे हृदय युद्ध आणि विजय ह्यांनी पूर्णपणे व्याप्त झालेले होते, आणि ओतोताची बाना ह्या त्याच्या एकनिष्ठ पत्नीची त्याने फारशी काळजी घेतली नाही. दीर्घ काळच्या प्रवासाने आणि तिच्याविषयीची चिंता आणि खेद व्यक्त करण्यात थंडपणा दाखविल्यामुळे तिचे सौंदर्य फिके पडत गेले आणि तिची हस्तिदंती त्वचा उन्हामुळे भाजून तपकिरी रंगाची झाली आणि राजकुमाराने एके दिवशी तिला सांगितले की तिची जागा त्याच्या सोबत युद्धपथावर नसून राजवाड्यात घरी पडद्यामागे आहे. पण नवऱ्याचा कठोर नकार आणि बेपर्वाई असूनही ओतोताची बानाच्या मनात त्याला सोडून जावे असे येऊच शकले नाही. पण तिने ते केले असते

तर तिच्यासाठी ते उत्तम होते कारण जेव्हा ते ओवारीला येताना इदझूच्या मार्गावर आले तेव्हा तिचे हृदय जवळ जवळ भंग पावले.

देवदार वृक्षांच्या सावलीने झाकून टाकलेल्या राजकुमारी मियादझूचे जेथे वास्तव्य होते त्या भव्य राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ तो पोहोचला. वसंत ऋतूच्या लाजऱ्या पहाटे मोहरलेल्या चेरी सारखी ती लावण्यवती होती, तिची वस्त्रे नाजूक, सुंदर आणि निर्मळ होती, आणि कांती बर्फासारखी शुभ्र होती, कारण कर्तव्याच्या पदपथावरून चालताना थकणं, शिणणं किंवा उन्हाळयात तळपत्या सूर्याच्या उष्णतेत चालणं तिला ठाऊक नव्हतं. दीर्घ प्रवासामुळे मळकटलेल्या कपड्यातल्या त्याच्या पत्नीची त्याला लाज वाटली, आणि त्याने तिला निरोप देऊन मागे ठेऊन तो राजकुमारी मियादझूला भेटायला गेला. दिवसांमागून दिवस आणि तासन् तास तो त्या बागेत आणि राजवाड्यात फक्त त्याच्या मौजमजेचा विचार करीत त्याच्या नव्या मैत्रिणीबरोबर वेळ घालवू लागला, आणि त्याच वेळी तो त्याच्या पत्नीला मागे सोडून आला होता जी बिचारी जीवनात आलेल्या अशा दुःखाने तंबूत रडत बसली होती. तरीही ती एकनिष्ठ पत्नी होती, आणि तिचा स्वभाव इतका सोशिक होता की तिने त्याला दोष देण्यासाठी तिचे ओठ कधीच उघडले नाहीत किंवा कपाळावर आठ्या आणून तिने तिच्या चेहऱ्यावरील गोड खिन्नता कधीही बिघडू दिली नाही, तो परत आल्यावर त्याच्या स्वागतासाठी स्मितहास्य करून नित्य तत्पर असायची आणि तो जेव्हाही बाहेर जायचा तेव्हा ती त्याला कधीही प्रतिबंध करायची नाही.

शेवटी राजकुमार यामातो ताकेला समुद्र ओलांडून इदझूकडे जाण्यासाठी कादझूसाकडे निघायचा दिवस आला तेव्हा त्याने त्याच्या बायकोला लवाजमा आणि सेवकांमागोमाग येण्याची आज्ञा करून तो राजकुमारी मियादझूकडे आदरातिथ्याचा निरोप घेण्यासाठी गेला. ती आकर्षक पोषाख घालून त्याला अभिवादन करण्यासाठी बाहेर आली आणि कधीही दिसली नव्हती इतकी सुंदर ती दिसत होती, आणि जेव्हा यामातो ताकेने तिला बघितले तेव्हा उदास वर्तमानकाळाच्या आनंदाव्यतिरिक्त

त्याच्या पत्नीला आणि कर्तव्याला विसरून गेला आणि त्याने शपथ घेतली की युद्ध संपल्यानंतर ओवारीला परत आल्यावर तो तिच्याशी विवाह करील. हे शब्द उच्चारल्याबरोबर त्याने वर पाहिल्यावर त्याला ओतोताची बानाचे विशाल अबोल बदामी डोळे पराकोटीच्या विषादासह आणि आश्चर्यासह त्याच्यावर अनिमिष दृष्टीने रोखलेले दिसले, आणि त्याला ठाऊक होते की त्याने अपराध केलेला होता, पण त्याने त्याचे हृदय कठोर बनविले आणि त्याच्यामुळे तिला झालेल्या वेदनांची जराही पर्वा न करता तो प्रवासासाठी घोड्यावर स्वार झाला.

जेव्हा तो समुद्र किनाऱ्यावर इदझूकडे पोहोचला तेव्हा त्याच्या माणसांनी सामुद्रधुनी ओलांडून कादझुसाकडे जाण्यासाठी होड्या शोधण्याचा प्रयत्न केला पण इतक्या सर्व सैनिकांना बोटीत बसणे अशक्य होते. नंतर राजकुमार समुद्र किनाऱ्यावर उभा राहिला आणि त्याच्या सामर्थ्याच्या गर्वात तुच्छतेने म्हणाला,

“हा काही समुद्र नव्हे! हा तर एक ओहोळ आहे! कशासाठी तुम्हाला खूप होड्या हव्यात? मी त्यात उडी मारू शकतो.”

शेवटी जेव्हा ते सर्व होड्यांमध्ये बसले आणि निर्वेधपणे सामुद्रधुनी ओलांडण्याच्या मार्गावर आले तेव्हा आकाश अचानक ढगांनी भरून आले आणि मोठे वादळ निर्माण झाले. लाटा पर्वतांसारख्या उंच उसळल्या आणि वाऱ्याचे आकांडतांडव सुरु झाले, विजांचा कडकडाट आणि चमचमाट सुरु झाला. आणि ज्या होडीत ओतोताची बाना आणि राजकुमार व त्याची माणसे होती ती लाटांच्या शिखरावरून भिरकावत गेली, असं वाटायचं की त्यांचा प्रत्येक क्षण शेवटचा होता आणि संतापलेला समुद्र त्यांना गिळंकृत करेल. कारण रिन जिन ह्या सागरच्या ड्रॅगन सम्राटाने यामातो ताकेने केलेली त्याची कुचेष्टा ऐकली होती. त्याचे तुच्छतेचे बोलणे ऐकल्याकारणाने संतापाच्या भरात भयंकर वादळ निर्माण करून समुद्र एखाद्या ओहोळासारखा नसून किती भीषण असतो हे दाखवून दिले. भयभीत झालेल्या नाविकांनी गलबताची शिडे खाली आणली आणि जीव वाचविण्यासाठी सुकाणूचे

रक्षण करण्याचा प्रयत्न केला. पण सर्व काही व्यर्थ होते. वादळ अधिकच हिंस्त्र होत होते आणि सर्वांनी त्यांचा शेवट दुर्दैवावर सोडला.

नंतर एकनिष्ठ ओतोताची बाना हिने नवऱ्याने दिलेले दुःख, आणि त्याने केलेला तिचा अव्हेर विसरून फक्त त्याच्या प्रेमाखातर त्याला वाचविण्याच्या इच्छेने जरूर पडल्यास स्वतःच्या प्राणांची आहुती देण्याचे ठरविले.

जेव्हा जहाजावर लाटा आदळू लागल्या आणि प्रकोपाने वावटळ त्यांच्याभोवती गिरक्या घेऊ लागले तेव्हा ती उभी राहून म्हणाली,

“नक्कीच रिन जिन सागर ईश्वर ह्याची राजकुमाराने थट्टा केल्याने त्याचा राग अनावर झाला आहे. म्हणून जर असे असेल तर, मी ओतोताची बाना जो माझ्या पतीचा जीव घेण्याची इच्छा करतो त्याचा प्रकोप मी शमवीन!”

नंतर सागराला संबोधून ती म्हणाली,

“मी महाराज ऑगस्तनेस, यामातो ताकेची जागा घेईन. त्यांच्या जीवासाठी तुमच्या क्रोधाखातर मी माझा जीव झोकून देईन. म्हणून माझी विनंती ऐका आणि कादझूसाच्या किनाऱ्यावर त्यांना सुरक्षितपणे पोहोचवा.”

ह्या शब्दांबरोबरच तिने खवळलेल्या समुद्रात वेगाने उडी मारली आणि लाटांनी तिला लगेचच घेरून नेले आणि ती अदृश्य झाली. आणि काय आश्चर्य ज्यावर ते बघे लोक बसले होते तो समुद्र एखाद्या चटईसारखा शांत आणि नितळ झाला होता. समुद्राच्या ईश्वराचा राग शमला होता, म्हणून वातावरण स्वच्छ झाले होते आणि सूर्य उन्हाळयाच्या दिवसासारखा लख्ख तळपू लागला होता.

यामातोताके लवकरच पलिकडच्या किनाऱ्यावर पोहोचला आणि सुरक्षितपणे जमिनीवर उतरला. त्यावेळी त्याची पत्नी ओतोताची बानाने प्रार्थना

केलेली होती. युद्धातील त्याचा पराक्रम उत्कृष्ट होता आणि थोड्या काळातच पूर्वेकडील बंडखोर आइनूवर त्याने विजय मिळविला.

पराकाष्ठेच्या संकटाच्या काळात त्याच्या एकनिष्ठ पत्नीने स्वेच्छेने आणि प्रेमाने स्वतः त्याग केला होता. त्यामुळे जमिनीवर सुरक्षित पोहोचल्याचे सर्व श्रेय त्याने त्याच्या पत्नीच्या एकनिष्ठतेला दिले. तिच्या स्मरणाने त्याचे हृदय द्रवले होते, एका क्षणासाठीही तो तिला विसरू शकत नव्हता. तिच्या हृदयाची सुशीलता आणि तिच्या प्रेमाची विशालता यांचा आदर करायला शिकण्यासाठी त्याला फारच उशीर झाला होता.

जसा तो घराकडे जायला निघाला तेव्हा मुसुइ तोगोच्या खिंडीतून जाताना तो तेथे उभा राहिला आणि लांबवर दिसणाऱ्या खालील देखाव्याकडे एकटक पाहू लागला. तो भूप्रदेश, त्या अतिशय उंचीवरून सगळा काही त्याच्या दृष्टीपथात आला होता. ते मैदान, जंगल आणि पर्वताबरोबर भूप्रदेशातून नागमोडी वाहणाऱ्या नद्यांचे चंदेरी पट्टे. नंतर त्याने अतिशय दूर अंतरावरचा समुद्र पाहिला, जो लांब अंतरावर चमचमणाऱ्या विरळ धुक्यासारखा दिसत होता. जेथे ओतोताची बानाने त्याच्यासाठी आपले जीवन समर्पित केले होते. आणि जसा तो त्या बाजूला वळला तसे त्याने त्याचे बाहू पसरले आणि तिच्या प्रेमाला आठवून, त्याने तिच्या एकनिष्ठ प्रेमाचा तिरस्कार केला होता हे आठवून त्याच्या हृदयातील दुःखाचा बांध फुटून त्याला रडू कोसळले होते.

“अझूमा, अझूमा, आह! (ओ! माझी बायको, माझी बायको!)” आणि आजपर्यंत टोकियोतील एक जिल्हा म्हणून अझूमा म्हटला जातो जो राजकुमार यामातो ताकेच्या तोंडून निघालेल्या शब्दांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्याला नाव दिले गेले होते. आणि ती जागाही लक्ष वेधून घेते जेथे त्याच्या एकनिष्ठ पत्नीने त्याला वाचविण्यासाठी समुद्रात उडी घेतली होती, म्हणून जरी राजकुमारी ओतोताची बाना जीवनात दुःखी होती तरी इतिहासाने तिची स्मृती ताजी ठेवली आहे, आणि तिच्या

निःस्वार्थीपणाची कथा आणि तिचे वीरमरण इतिहासाच्या स्मृतीतून कधीही नाहीसे होणार नाही.

यामातो ताकेने आता त्याच्या वडिलांनी केलेल्या सर्व आज्ञा पूर्ण केल्या, त्याने सर्व बंडखोरांना नमविले, लुटारू आणि शत्रूंपासून देशाची सुटका करून शांतता निर्माण केली. त्याची कीर्ती खूप पसरली कारण त्या संपूर्ण प्रदेशात त्याच्या विरूद्ध कुणीही उभे राहू शकत नव्हते. तो युद्धामध्ये अतिशय शक्तिमान आणि सल्ला मसलतीत निष्णात होता.

तो तडक ज्या रस्त्याने आला होता त्या रस्त्यानेच परत जाणार होता पण त्याच्या डोक्यात एक कल्पना आली की जर तो दुसऱ्या रस्त्याने गेला तर त्याला काहीतरी मनोरंजक सापडेल म्हणून तो ओवारीच्या प्रांतातून ओमीच्या प्रांतापर्यंत आला.

जेव्हा राजकुमार ओमीला पोहोचला तेव्हा त्याला असे आढळून आले की तेथील सर्व लोकांमध्ये खूप खळबळ आणि भीती पसरलेली आहे. अनेक घरांमध्ये तो गेला तेव्हा त्याला शोकचिन्हे दिसली आणि मोठ्याने केलेला विलाप ऐकू आला. जेव्हा त्याने त्या कारणाची चौकशी केली तेव्हा त्यांनी पर्वतांमध्ये प्रकट झालेल्या अतिशय भयंकर राक्षसाबद्दल सांगितले जो दररोज तेथून खाली उतरतो व खेड्यांवर हल्ला करतो आणि ज्याला कोणाला पकडतो त्याला गिळंकृत करतो. अनेक घरे निर्जन केली गेली होती आणि शेतावरचे दैनंदिन काम करायला जायला आणि स्त्रिया नदीवर तांदूळ धुवायला जायला बाहेर पडण्यास घाबरत असत.

जेव्हा यामातो ताकेने हे ऐकले तेव्हा तो क्रोधाने पेटला, आणि अतिशय संतापाने तो म्हणालाः

“कियू-शियूच्या पश्चिम सीमेपासून ते येझोच्या पूर्व कोपऱ्यापर्यंत मी राजाच्या सर्व शत्रूंना नमविले आहे-तेथे कुणीही नियमांचे उल्लंघन करून राजाविरूद्ध बंड करण्याचे धाडस करणार नाही. ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे की ह्या जागेवर

राजधानी जवळ एक दुष्ट राक्षस धैर्य करून राहतो काय आणि राजाच्या प्रजेत धास्ती निर्माण करतो काय! त्याला फार काळ या निष्पाप लोकांना गिळंकृत करून आनंद घेऊ देणार नाही. आत्ताच निघतो आणि त्याला ठार करतो." ह्या शब्दांबरोबरच तो इबुकी पर्वताकडे जायला निघाला जेथे तो राक्षस रहायचा असे म्हटले जायचे. जेव्हा तो खूप उंचावर चढून गेला तेव्हा अचानक नागमोडी रस्त्यावर त्याच्यासमोर तो राक्षस भुजंग प्रकट होऊन त्याने त्याचा रस्ता रोखला.

"हाच तो राक्षस असला पाहिजे," तो राजकुमार म्हणाला, "ह्या भुजंगासाठी मला तलवारीची गरज नाही. मी त्याला माझ्या हातांनीच ठार करू शकतो."

त्यानंतर त्याने तात्काळ त्या भुजंगावर उसळी मारली आणि केवळ हातांनीच त्याचा गळा दाबून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्या बेसुमार ताकदीने थोड्याच अवधीत त्याने त्या भुजंगावर प्रभुत्व गाजविले आणि तो भुजंग त्याच्या पायाजवळ मरून पडला. आता अचानक त्या पर्वतावर अंधःकार पसरला आणि पाऊस पडायला सुरूवात झाली, म्हणून त्या अंधारात आणि पावसात राजकुमाराला रस्ता शोधणे कठीण गेले. तथापि थोड्याच वेळात तो रस्त्याने चाचपडत खाली येऊ लागला तेव्हा वातावरण निवळले, आणि आपला शूर नायक पर्वताच्या पायथ्याशी येऊ शकला.


जेव्हा तो परत आला तेव्हा त्याला आजारी झाल्यासारखे वाटले व पायांची आग होऊन वेदना होऊ लागल्या तेव्हा त्याच्या लक्षात आले की भुजंगाने त्याला दंश केला असावा. त्याला इतका त्रास होत होता की तो हालचाल करू शकत नव्हता, की फारसे चालू शकत नव्हता. म्हणून तो पर्वतातील औषधी खनिजे असलेल्या पाण्याच्या झऱ्याकडे गेला जो जमिनीतून वर बुडबुड्यांसह उसळत होता आणि जमिनीखाली असलेल्या ज्वालामुखीच्या अग्निने उकळत होता.

यामातो ताकेने त्या पाण्यात दररोज स्नान केले आणि हळूहळू त्याची शक्ती पुन्हा परत आली असल्याचे त्याला जाणवले. वेदनांपासून तो मुक्त झाला. नंतर तो एकेदिवशी संपूर्णपणे बरा झाल्याचे त्याला आढळून आल्याने त्याला खूप आनंद झाला. तो इतेच्या मंदिरात गेला तेथे तुम्हाला ठाऊकच आहे की दीर्घ मोहिमेवर जाण्याची हमी घेण्यापूर्वी तो तेथे प्रार्थना करण्यासाठी गेला होता. त्याची आत्या, समाधीची धर्मोपदेशिका, जिने त्याला जाते वेळी आशीर्वाद दिला होता ती त्याचे स्वागत करण्यासाठी परत आली. त्याने अचानक गाठी पडलेल्या संकटांबद्दल आणि किती आश्चर्यकारकरित्या त्याचा जीव कसा रक्षिला गेला हे सर्व सांगितले- आणि तिने त्याच्या धाडसाचे आणि त्याने केलेल्या पराक्रमाचे कौतुक केले आणि नंतर तिचा सर्वात उत्कृष्ट पोषाख त्यावर चढवून तिने सूर्यदेवता अमातेरासू ह्या त्यांच्या पूर्वज देवतांचे आभार मानले आणि राजकुमाराच्या झालेल्या आश्चर्यकारक संरक्षणाचे सारे श्रेय त्या दोघींना दिले.

येथे जपानचा राजकुमार यामातो ताकेची गोष्ट संपते.

* * * * *

# मोमोतारो किंवा सत्पाळूच्या पुत्राची गोष्ट



फार, फार वर्षांपूर्वी एक म्हातारा आणि एक म्हातारी राहत होती, ते शेतकरी होते, आणि त्यांना रोजच्या उपजीविकेसाठी खूप काबाडकष्ट करावे लागत. सभोवती असलेल्या शेतकऱ्यांसाठी तो म्हातारा जाऊन गवत कापण्याचे काम करीत असे, आणि जेव्हा तो गेलेला असे, तेव्हा त्याची बायको घरातील कामे आणि त्यांच्या स्वतःच्या छोट्याशा भाताच्या शेतात काम करीत असे.

एके दिवशी म्हातारा नेहमीप्रमाणे गवत कापण्यासाठी टेकडीवर गेला आणि म्हातारीने काही कपडे घेतले व ती ते धुवायला नदीवर गेली.

उन्हाळा जवळ आला होता, ते दोघेही कामासाठी बाहेर पडले तेव्हा नव्या हिरवळीने प्रदेश अतिशय सुंदर दिसत होता. काठावरचे गवत हिरव्या पाचूसारखे मखमली दिसत होते, आणि वाळुंजाची मऊ मऊ फुले त्यांच्या झुबक्यांना बाहेर हलवित होते.

वाऱ्याच्या मंद झुळुका वाहत होत्या आणि पाण्याच्या शांत पृष्ठभागावर झुलत होत्या आणि त्या म्हाताऱ्या दांपत्याच्या गालांना स्पर्श करीत होत्या ज्यामुळे त्यांची सकाळ अवर्णनीय आनंदाची वाटत होती. त्या म्हातारीला अखेरीस नदीच्या किनाऱ्यावर एक छानशी जागा सापडली आणि तिने तिची टोपली खाली ठेवली. नंतर तिने ते कपडे धुण्याच्या कामाला सुरूवात केली, तिने ते एकामागून एक त्या टोपलीतून काढून नदीच्या पाण्यात बुडवून दगडांवर घासून धुतले. पाणी स्फटिकासारखे नितळ होते आणि ती चिमुकल्या माशांना इकडून तिकडे पोहताना आणि तळाशी असलेल्या गारगोट्यांना पाहू शकत होती.

ती कपडे धुण्यात मग्न असतानाच त्या निर्झराखाली एक मोठा सत्पाळू घरंगळत आला. म्हातारीने तिच्या कामातून वर बघितले आणि तिला तो मोठा सत्पाळू दिसला. ती साठ वर्षे वयाची होती, आणि तिने तिच्या सबंध आयुष्यात इतका मोठा सत्पाळू कधीच बघितला नव्हता.

“किती मधुर असावा हा सत्पाळू!” ती स्वतःशीच म्हणाली. “मी निश्चितच तो घेईन आणि घरी तो नेऊन माझ्या म्हाताऱ्याला देईन.”

तिने तिचे हात लांबविले आणि त्याला पकडायचा प्रयत्न केला पण तिचा हात त्याच्यापर्यंत पोहचू शकला नाही. तिने जवळपास एखादी काठी मिळते का ते पाहिले, पण तिथे तिला एकही काठी दिसली नाही, आणि जर ती काठी शोधायला गेली असती तर तो सत्पाळू तिला गमवावा लागला असता.

काही क्षण थांबल्यावर तिने विचार केला की तिने काय करावे, तिला एक जुनी मोहिनी मंत्राची कविता आठवली. आता तिने तो सत्पाळू काहीवेळ झऱ्यातच घरंगळत रहावा म्हणून टाळ्या वाजवायला सुरूवात केली आणि टाळ्या वाजविताना ती हे गाणे गाऊ लागली:

“लांबचं पाणी अति कडू आहे

जवळचं पाणी गोड गोड वाहे

लांबच्या पाण्याला सोडून ये तू

गोड गोड पाण्यात शिरकाव घे तू.”

आणि काय आश्चर्य जसं जसं तिने ते छोटंसं गाणं म्हणायला पुन्हा सुरूवात केली तसा तसा तो सत्पाळू, ती म्हातारी किनाऱ्यावर जेथे उभी होती तिकडे जवळ जवळ सरकू लागला आणि अगदी तिच्या समोर येऊन थांबला आणि ती त्याला हातात घेऊ शकली. त्या म्हातारीला खूप हर्ष झाला. आनंदाने ती इतकी हरखून गेली होती की ती पुढे तिचं काम करूच शकली नाही, म्हणून तिने सर्व कपडे बांबूच्या टोपलीत ठेवले, पाठीवर टोपली आणि हातात सत्पाळू घेऊन ती घराकडे घाईघाईने निघाली.

ती खूप वेळेपासून वाट पाहत होती आणि तिचा नवरा घरी परतायला खूप उशीर झाला असे तिला वाटले. जेव्हा सूर्य अस्ताला जायला निघाला तेव्हा तिचा नवरा घरी परतला, त्याच्या पाठीवरील गवताचा भारा इतका मोठा होता की तो त्याच्या आड झाकला गेल्याने तिला तो दिसूही शकत नव्हता. तो इतका थकलेला होता की त्याने चालताना आधारासाठी काठी ऐवजी कोयता घेतला होता व तो त्यावर वाकून चालत होता.

जेव्हा त्या म्हातारीने त्याला बघितले तेव्हा तिने त्याला हाक मारली.

“ओ फी सान! (म्हातारा) तुम्ही घरी परत यावं म्हणून तुमची मी केव्हाची वाट बघत आहे.”

“काय झालं? तू एवढी उतावीळ का?” तिची विलक्षण उत्सुकता पाहून म्हाताऱ्याने आश्चर्याने विचारले. “मी बाहेर असताना काही घडले का?”

“ओ, नाही!” म्हातारी उत्तरली, “काहीच घडले नाही, फक्त तुमच्यासाठी मला एक भेटवस्तू सापडली!”

“छान झालं,” म्हातारा म्हणाला. नंतर त्याने हौदावर हातपाय धुतले आणि तो पडवीत आला. म्हातारी त्या छोट्याशा खोलीत पळत गेली आणि तिने कपाटातून काढून तो सत्पाळू आणला. पूर्वीपेक्षाही तो जड वाटला. ती तो उंचावून दाखवित त्याला म्हणाली,

“फक्त बघा इकडे! असा इतका मोठा सत्पाळू तुमच्या सबंध आयुष्यात तुम्ही कधी पाहिला होता?”

जेव्हा त्या म्हाताऱ्याने त्या सत्पाळूकडे पाहिले तेव्हा त्याला खूप आश्चर्य वाटले आणि तो म्हणालाः

“खरोखर आजपर्यंत मी कधीही इतका मोठा सत्पाळू पाहिलेला नाही! कोठून विकत आणलास तू?”

“मी तो विकत घेतला नाही,” म्हातारी उत्तरली. “जेथे मी कपडे धुवायला गेली होती तेथे तो मला नदीत सापडला.” आणि तिने त्याला सबंध गोष्ट सांगितली.

“तुला तो सापडला म्हणून मला खूप आनंद झाला आहे. आता खाऊया आपण तो. कारण मला खूप भूक लागली आहे,” ओ फी सान म्हणाला.

त्याने स्वयंपाकघरातली सुरी आणली आणि फळीवर ठेवून तो ते कापणार, तेवढ्यात काय आश्चर्य त्या सत्पाळूचे आपोआप दोन भाग झाले आणि स्पष्ट आवाज म्हणाला,

“थोडं थांब म्हाताऱ्या माणसा!” आणि एका सुंदर लहानशा बालकाने बाहेर पाऊल टाकले.

म्हातारा आणि त्याची बायको ते पाहून थक्क झाले आणि जमिनीवर कोसळले. ते बालक पुन्हा बोलले,

“घाबरू नका, मी कुणी पिशाच्च किंवा परी नाही. मी तुम्हाला सत्य सांगेन. स्वर्गाने तुमच्यावर दया केली आहे. तुम्हाला मूलबाळ नाही म्हणून तुम्ही दिवसरात्र शोक करीत होता. तुमचे रूदन ऐकले गेले आहे आणि तुमच्या वृद्धापकाळात तुमचा पुत्र म्हणून मला येथे पाठविण्यात आले आहे!”

हे ऐकून तो म्हातारा आणि त्याची बायको खूप आनंदित झाले. म्हातारपणीच्या एकलकोंड्या जीवनात त्यांना सहाय्य करायला कुणी मूलबाळ नाही ह्या दुःखाने ते रात्रंदिवस रडत होते आणि आता त्यांच्या प्रार्थनेला उत्तर मिळाले होते. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता इतका की त्यांचे हातपाय कुठे ठेवावे हे त्यांना कळत नव्हते. आधी म्हाताऱ्याने त्या बालकाला त्याच्या हातात घेतले आणि नंतर म्हातारीनेही तसेच केले. त्यांनी त्याचे नाव मोमोतारो किंवा सत्पाळूचा पुत्र असे ठेवले. कारण तो सत्पाळूतून बाहेर आला होता.

वर्षे भराभर निघून गेली आणि ते बालक पंधरा वर्षांचे झाले. त्याच्या वयाच्या मुलांमध्ये दुसऱ्या कोणत्याही मुलांपेक्षा तो सर्वात उंच आणि बलवान होता.

त्याचा चेहरा सुंदर आणि हृदय पूर्णपणे निर्भय होते आणि त्याच्या वयात तो खूप विवेकी होता. जेव्हा ते म्हातारे जोडपे त्याच्याकडे बघायचे तेव्हा त्यांना खूप आनंद व्हायचा. कारण त्यांनी विचार केल्याप्रमाणे तो एखाद्या नायकासारखा शूरवीर होता.

एके दिवशी मोमोतारो त्याच्या प्रतिपालकाकडे आला आणि गंभीरपणे म्हणाला,

“पिताजी, एका विलक्षण योगायोगाने आपण पिता-पुत्र बनलो. तुमची माझ्यावरील कृपा पर्वतांवरील गवतापेक्षाही उत्तुंग आहे, जे कापण्याचे तुमचे दैनंदिन काम होते आणि जेथे आई कपडे धुते त्या नदीपेक्षाही अथांग आहे. मला हे कळत नाही की तुमचे किती आभार मानावेत.”

“का,” म्हाताऱ्याने उत्तर दिले, “पित्याने पुत्राचे पालनपोषण करणे हे निसर्ग नियमानुसारच आहे. जेव्हा तू मोठा होशील तेव्हा आमची काळजी घेण्याची तुझी पाळी राहील म्हणून काही झाले तरी तेथे काही आपल्यामध्ये लाभ किंवा हानी नाही, सारे काही समसमानच राहील. खरोखर, मला किंचित आश्चर्य वाटते की तू अशा रितीने माझे आभार मानावेत!” आणि म्हातारा त्रस्त झालेला दिसला.

“मला आशा आहे की तुम्ही मला क्षमा कराल,” मोमोतारो म्हणाला, “पण तुम्ही दाखविलेल्या प्रेमाची मला परतफेड करायची आहे आणि ह्या सर्व गोष्टींउप्पर तुम्ही मला अनुमती द्यावी.”

“तुझी जशी इच्छा असेल तसे मी तुला करू देईन. कारण तू इतर मुलांपेक्षा पूर्णपणे वेगळा आहेस.”

“मग मला लगेचच जाऊ द्या!”

“काय म्हणालास? तू तुझ्या म्हाताऱ्या आईवडिलांना आणि जुन्या घराला सोडून जाणार?”

“आत्ता तुम्ही मला जाऊ दिलेत तर मी खात्रीने नक्कीच परत येईन!”

“कोठे जातो आहेस तू?”

“मला जायचे आहे त्यामुळे तुम्हाला हे विचित्र वाटणारच,” मोमोतारो म्हणाला, “कारण मी तुम्हाला माझा हेतू सांगितलेला नाही. येथून खूप लांब जपानच्या ईशान्येला तेथे समुद्रात एक बेट आहे. हे बेट म्हणजे सैतानांच्या टोळीचा बालेकिल्ला आहे. हा प्रदेश त्यांनी कसा पादाक्रांत केला, लोकांना लुटून कसे ठार केले, आणि त्यांना जे काही सापडले ते कसे घेऊन गेले ह्याबाबत मी अनेकदा ऐकले आहे. ते फक्त दुष्टच नाहीत तर आपल्या सम्राटाशी बेईमान असून त्यांच्या कायद्याचा आज्ञाभंगही करतात. ते नरभक्षकही आहेत कारण जे गरीब लोक दुर्दैवाने त्यांच्या हाती लागतात त्यांना ते ठार मारून खाऊन टाकतात. हे सैतान म्हणजे घृणास्पद प्राणी आहेत. मला तेथे जाऊन त्यांना जिंकायलाच हवे आणि त्यांनी ह्या प्रदेशाची लुटलेली मालमत्ता परत आणायला हवी. थोड्या कालावधीसाठी मला येथून जाण्याचा हाच हेतू आहे!”

वयाच्या फक्त पंधरा वर्षांच्या मुलाच्या तोंडून असे ऐकल्याने म्हाताऱ्याला खूप आश्चर्य वाटले. त्या मुलाला जाऊ देणे योग्य आहे असे त्याला वाटले. तो बलवान आणि निर्भीड होता आणि ह्या व्यतिरिक्त तो सर्वसामान्य बालक नव्हता हे म्हाताऱ्याला ठाऊक होते, कारण स्वर्गातून आलेली एक भेटवस्तू म्हणून तो होता, आणि त्याला पूर्ण खात्री होती की सैतान त्याला इजा करण्यात दुर्बल ठरतील.

“तू जे काही सांगितलेस ते खूपच चित्तरंजक आहे, मोमोतारो,” तो म्हातारा म्हणाला. “तुझ्या निश्चयाला मी प्रतिबंध घालणार नाही. तुझी इच्छा असेल तर तू जाऊ शकतोस. त्याबरोबर तुला वाटेल तसं लवकरात लवकर जा आणि त्या राक्षसांचा विध्वंस करून त्या देशात शांतता आण.”

“तुमच्या सर्व दयाळूपणाबद्दल मी तुमचा आभारी आहे,” मोमोतारो म्हणाला ज्याने त्याच दिवशी जायची तयारी सुरू केली. तो पूर्णपणे धाडसी होता आणि भीती म्हणजे काय त्याला ठाऊक नव्हते.

म्हातारा आणि म्हातारी लगेच स्वयंपाकघरातील उखळीत तांदूळ कुटून त्याच्या वड्या बनविण्याच्या कामाला लागले कारण मोमोतारो त्याच्या बरोबर ते प्रवासात घेऊन जाणार होता.

शेवटी वड्या तयार झाल्या आणि मोमोतारो त्याच्या दीर्घ प्रवासाला निघाला.

निरोप देणे हे नेहमीच दुःखाचे असते. तसे आता होते. त्या दोन्ही म्हाताऱ्यांचे डोळे भरून आले आणि थरथरत्या आवाजात ते म्हणालेः

“जा समस्त काळजीने आणि त्वरेने. तू विजयी होऊन परत येणार अशी आम्ही अपेक्षा करतो!”

मोमोतारोला त्याच्या आईवडिलांना सोडून जाताना खूप दुःख झाले. (जरी त्याला ठाऊक होते की तो लवकरच परत येऊ शकेल) कारण तो गेल्यानंतर ते एकाकी कसे राहू शकतील याचा तो विचार करीत होता. पण तो पूर्णपणे निर्भयतेने म्हणाला, “येतो मी! मी जातोय आता. मी गेल्यावर स्वतःची उत्तम काळजी घ्या.

बरंय येतो मी!” आणि त्याने झटकन घराबाहेर पाऊल टाकले. निशब्दतेत मोमोतारो आणि त्याच्या मातापित्यांची अखेरच्या निरोपात त्यांची दृष्टादृष्ट झाली.

माध्यान्ह झाली होती, तरीही मोमोतारो घाईघाईने मार्गाला लागला. त्याला भूक लागलीसे वाटून त्याने त्याची पिशवी उघडली आणि तांदळाची एक वडी काढून रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडाखाली खायला बसला. जेव्हा तो जेवायला बसला तेव्हा एक शिंगरूएवढा (लहान घोडा) कुत्रा उंच वाढलेल्या गवतामधून धावत आला. तो सरळ मोमोतारोकडे आला आणि त्याने दात दाखवित क्रोधाने म्हटले,

“तू उद्धट माणूस आहेस, माझ्या शेतातून जाताना तू माझी परवानगी घेतली नाहीस. जर तुझ्या पिशवीतील सर्व वड्या तू मला दिल्यास तर तू जाऊ शकतोस; अन्यथा ठार मारेपर्यंत मी तुझा चावा घेईन!”

मोमोतारो फक्त तिरस्काराने हसला,

“काय म्हणतोस तू ते? तुला ठाऊक आहे का मी कोण आहे ते? मी मोमोतारो आहे, आणि मी सैतानांना नमविण्यासाठी जपानच्या ईशान्येला असलेल्या त्यांच्या बेटावरील बालेकिल्ल्याकडे जात आहे. जर तू माझ्या मार्गात येऊन मला थांबविण्याचा प्रयत्न केला तर मी धडापासून तुझे शीर कापून टाकीन!”

त्या कुत्र्याचे वागणे अचानक बदलले. त्याची शेपटी त्याच्या पायांमध्ये लोळू लागली. आणि त्याने त्याचे कपाळ जमिनीवर टेकले.

“काय ऐकतो आहे मी हे? मोमोतारोचे नाव? तुम्ही खरोखर मोमोतारो आहात? मी तुमच्या सामर्थ्याबद्दल अनेकदा ऐकले आहे. तुम्ही कोण आहात हे न जाणल्यामुळे मी तुमच्याशी मूर्खपणाने वागलो. माझ्या मूर्खपणाबद्दल मला क्षमा कराल का? तुम्ही खरोखर त्या सैतानांच्या बेटावर हल्ला करण्यासाठी जात आहात

का? जर तुम्ही ह्या उद्धटाला तुमच्या सहचरांपैकी एक म्हणून तुमच्या बरोबर घेतले तर मी तुमचा खूप कृतज्ञ राहीन.”

“मला वाटतं तुझी इच्छा असेल तर तुला मी सोबत घ्यावं.” मोमोतारो म्हणाला.

“मी तुझा आभारी आहे!” कुत्रा म्हणाला. “दुसरं असं की मला खूप भूक लागली आहे. तुमच्या जवळ असलेल्या वड्यांपैकी एक मला देता का?”

“ही जपानमधील सर्वात उत्कृष्ट वडी आहे,” मोमोतारो म्हणाला. “मी तुला ही संपूर्ण देऊ शकत नाही, मी तुला फक्त अर्धी देईन.”

“खूप खूप आभारी आहे तुमचा,” त्याच्याकडे फेकलेला तुकडा घेत कुत्रा म्हणाला.

नंतर मोमोतारो उठला आणि कुत्रा त्याच्या मागोमाग चालू लागला. खूप वेळेपर्यंत ते टेकड्या आणि दऱ्याखोऱ्यातून चालत होते. ते जात असताना एका झाडावरून एक प्राणी उतरून त्यांच्यापुढे थोड्या अंतरावर आला. तो प्राणी लगेचच मोमोतारोकडे आला आणि म्हणाला,

“शुभ प्रभात, मोमोतारो! ह्या प्रदेशाच्या भागामध्ये आल्याबद्दल तुझे स्वागत असो. तुझ्याबरोबर येण्याची तू मला परवानगी देतोस का?”

“मोमोतारोला सोबत म्हणून एक कुत्रा आहे. तुझ्यासारख्या माकडाचे युद्धामध्ये काय काम? आम्ही त्या सैतानांशी युद्ध करायला जात आहोत! चल बाजूला हो!”

कुत्रा आणि माकडाने आपआपसात भांडायला आणि एकमेकांना चावायला सुरुवात केली, कारण हे दोन प्राणी नेहमीच एकमेकांचा द्वेष करतात.

“आता भांडू नका!” त्यांच्यात मध्यस्थी करीत मोमोतारो म्हणाला, “एक क्षणभर थांब कुत्रा!”

“जो तुमच्या मागे येत आहे तो काही सर्वथा योग्यतापूर्ण प्राणी नाही!” कुत्रा म्हणाला.

“काय ठाऊक आहे तुला त्याच्याबाबतीत?” मोमोतारोने विचारले, आणि कुत्र्याला बाजूला सारीत त्याने माकडाला विचारले, “कोण आहेस तू?”

“मी ह्या टेकड्यांमध्ये राहणारा एक माकड आहे,” माकडाने उत्तर दिले. “सैतानांच्या बेटावरील तुमच्या मोहीमेबद्दल मी ऐकले आहे आणि तुमच्याबरोबर येण्यासाठी मी आलो आहे. तुमच्या सोबत येण्याव्यतिरिक्त मला कशातही आनंद वाटणार नाही!”

“तुला खरोखर त्या सैतानाच्या बेटावर येऊन माझ्याबरोबर त्यांच्याशी लढाई करण्याची इच्छा आहे का?”

“होय, महाराज,” माकडाने उत्तर दिले.

“तुझ्या धैर्याचे मी कौतुक करतो,” मोमोतारो म्हणाला.  “हा घे माझ्या गोड तांदळाच्या वडीमधला एक तुकडा. चल बरोबर!”

म्हणून माकड मोमोतारो बरोबर सहभागी झाला. कुत्रा आणि माकडाचे आपसात पटायचे नाही. ते एकमेकांवर खेकसायचे आणि भांडण करायची इच्छा

करायचे. त्यामुळे मोमोतारोला चीड यायची. आणि शेवटी त्याने कुत्र्याला ध्वज घेऊन पुढे पाठविले आणि माकडाला तलवारीसह मागे ठेवले आणि पोलादी युद्ध पंख्यासह तो मध्यभागी राहिला.

काही काळानंतर ते एका विस्तिर्ण कुरणावर आले. येथे एक पक्षी त्या छोट्या पथकासमोर हळूच खाली जमिनीवर उतरला. इतका सुंदर पक्षी मोमोतारोने आजपर्यंत कधीच पाहिला नव्हता. त्याच्या शरीरावर निरनिराळया पाच पिसाऱ्यांचे पोषाख होते. आणि त्याच्या डोक्यावर लाल जर्द रंगाचा शिरपेच होता.

कुत्रा ताबडतोब त्याच्याकडे धावत गेला आणि त्याला पकडून ठार मारण्याचा प्रयत्न करू लागला. पण पक्षाने त्याला नखांनी ओरबाडले आणि कुत्र्याच्या शेपटीकडे उडाला. आणि दोघांमध्ये दारूण युद्ध चालले.

मोमोतारोला हे बघून पक्षाचे कौतुक केल्यावाचून राहवले गेले नाही, त्याने युद्धात खूप तडफ दाखविली होती. तो निश्चितच चांगला योद्धा असावा असे त्याला वाटले.

मोमोतारो त्या दोन्ही योद्ध्यांकडे गेला आणि कुत्र्यास मागे आवरत तो पक्षाला म्हणाला,

“बदमाश! तू माझ्या प्रवासात अडथळा आणतो आहेस. ताबडतोब शरण ये, आणि मी तुला माझ्यासोबत नेईन. जर तू ऐकले नाहीस तर तुझ्या डोक्याचा चावा घेण्यासाठी मी ह्या कुत्र्याला तुझ्यावर सोडीन!”

नंतर पक्षी त्याला ताबडतोब शरण आला आणि मोमोतारोच्या परिवारात सहभागी होण्यासाठी त्याने विनंती केली.

“तुमच्या सेवक कुत्र्याशी भांडल्याबद्दल मी तुमची कशी माफी मागू हेच मला कळत नाही, पण मी तुम्हाला पाहिले नव्हते. मी एक दुःखी पक्षी आहे. ज्याला

तीतर पक्षी म्हणतात. जर तुम्ही माझ्या उद्धटपणाबद्दल मला क्षमा केली आणि तुमच्याबरोबर मला येऊ दिले तर मी हे तुमचे औदार्यच समजेन. कृपया तुम्ही कुत्र्याच्या आणि माकडाच्या मागे मला येऊ द्या!"

"तुझ्या लवकरच शरण येण्याबद्दल मी तुझे अभिनंदन करतो," मोमोतारो स्मित करीत म्हणाला. "ये आणि सैतानावर चढाई करण्यासाठी आम्हाला येऊन मिळ."

"तुम्ही त्या पक्ष्याला सुद्धा तुमच्याबरोबर घेणार आहात?" कुत्र्याने मध्येच व्यत्यय आणून म्हटले.

"असा अनावश्यक प्रश्न तू का विचारतोस? मी काय बोललो हे तू ऐकले नाहीस का? मला ह्या पक्षाला सोबत न्यायचे आहे, कारण माझी तशी इच्छा आहे!"

"हूं!" कुत्रा म्हणाला.

मग मोमोतारो उभा राहिला आणि त्याने ही आज्ञा दिली,

"आता तुम्ही सर्वांनी माझे ऐकले पाहिजे. सैन्यात असताना पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे एकोपा. एक सूज्ञ वचन आहे की पृथ्वीवरील लाभ हा स्वर्गातील लाभापेक्षाही उत्तम असतो. आपल्यातील युती ही ऐहिक लाभापेक्षा उत्तम असते. जेव्हा आपल्यामध्ये शांतता नसते तेव्हा शत्रूला नमविणे सोपे नसते. ह्यापुढे तुम्ही तिघांनी कुत्रा, माकड आणि तीतर पक्षी यांनी एकमताने मैत्री केली पाहिजे. जो पहिल्यांदा भांडण सुरू करेल त्याला तात्काळ बाहेर काढून टाकण्यात येईल!"

त्या तिघांनी न भांडण्याचे वचन दिले. तीतर पक्ष्याला मोमोतारोच्या संचातील सभासद केले गेले आणि त्याला अर्धी वडी मिळाली.

मोमोतारोचा प्रभाव एवढा मोठा होता की ते तिघे चांगले मित्र बनले आणि लवकरच पुढे तो त्यांचा नेता बनला. घाईघाईने जाताना दिवसामागून दिवस निघून गेल्यावर शेवटी ते ईशान्येच्या समुद्रकिनाऱ्यावर आले. पण तेथे एका क्षितिजाशिवाय काहीच दृष्टोत्पत्तीस येत नव्हते. बेटाचा मागमूसही नव्हता. काय जे सर्वकाही होते ते फक्त शांततेचा भंग करणाऱ्या किनाऱ्यावरील लाटा होत्या.

आता कुत्रा, माकड आणि तीतर पक्षी मोठ्या धाडसाने दऱ्याखोऱ्यातून, टेकड्यांवरून चालत आले होते. पण त्यांनी पूर्वी कधीही समुद्र पाहिलेला नव्हता. तो पहिल्यांदा पाहिल्याने त्यांचा गोंधळ उडालेला होता. त्यामुळे ते शांतपणे एकमेकांकडे रोखून बघत होते. कसे ते पाणी ओलांडणार आणि सैतानाच्या बेटावर पोहोचणार?

मोमोतारोने पाहिले की समुद्राचे दृश्य पाहून ते घाबरले आहेत म्हणून त्यांची परीक्षा पाहत खवळून तो मोठ्याने म्हणाला,

“का तुम्ही काचकूच करताहात? तुम्ही समुद्राला भिता काय? ओह, किती भित्रे आहात तुम्ही? सैतानांशी लढण्यासाठी तुमच्यासारखे भित्रे प्राणी घेऊन जाणे अशक्य आहे. त्यापेक्षा मी एकट्याने जाणे अति उत्तम. मी तुम्हाला आत्ताच्या आत्ता काढून टाकतो!”

हा कठोर ठपका ऐकून त्या तिन्ही प्राण्यांना धक्काच बसला. त्यांनी मोमोतारोची बाही पकडली आणि त्यांना परत न पाठविण्याची विनंती केली.

“कृपा करा, मोमोतारो!” कुत्रा म्हणाला.

“आम्ही असे खूप लांब आलो आहोत!” माकड म्हणाले.

“आम्हाला येथे सोडून देण्याचे माणुसकीहीन होईल!” तीतर पक्षी म्हणाला.

“आम्ही काही सर्वस्वी समुद्राला भीत नाही.” माकड पुन्हा म्हणाले.

“कृपया आम्हाला तुमच्याबरोबर न्या,” तीतर पक्षी म्हणाला.

“कृपा करा,” कुत्रा म्हणाला.

त्यांना आता थोडे धाडस आले होते, म्हणून मोमोतारो म्हणाला,

“ठीक आहे तर, मी तुम्हाला माझ्यासोबत नेतो, पण सावध रहा!”

मोमोतारोला आता एक छोटे जहाज मिळाले आणि ते सर्व जहाजावर चढले.

वारा आणि वातावरण कोरडे आणि छान होते, आणि जहाज समुद्रावरून एखाद्या बाणासारखे पुढे गेले. पाण्यामधून प्रवास करण्याची ही त्यांची पहिली वेळ होती आणि म्हणून कुत्रा, माकड आणि तीतर पक्षी त्या मोठ्या लाटांना आणि जहाजाच्या हेलकाव्यांना सुरूवातीला खूप घाबरले, पण हळूहळू त्यांना पाण्याची सवय झाली आणि ते पुन्हा खूप आनंदित झाले. ते दररोज त्यांच्या छोट्याशा जहाजाच्या नौतलावर येरझारा घालीत सैतानांच्या बेटाकडे उत्सुकतेने बघत होते.

जेव्हा त्यांना ह्याचा कंटाळा यायचा तेव्हा ज्यांचा त्यांना अभिमान वाटायचा अशा त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी ते एकमेकांना सांगायचे, नंतर एकत्रित काही खेळ खेळायचे आणि मोमोतारोची त्या तिन्ही प्राण्यांच्या ह्या माकडचेष्टा बघताना करमणूक व्हायची. अशा रितीने ते त्यांचे लांब कंटाळवाणे पर्यटन काहीही न करता विसरून जायचे. ज्या सैतानांनी त्या देशात खूप नुकसान केले होते त्यांना ठार मारण्याची त्यांना प्रबळ इच्छा झाली होती.

जेव्हा त्यांच्या मर्जीनुसार वारा वाहू लागला, आणि त्यांच्या मार्गात वादळ आले नाही, त्या जहाजाने द्रुतगतीने प्रवास केला आणि एकेदिवशी जेव्हा सूर्य

तेजस्वीरित्या प्रकाशत होता तेव्हा जहाजाच्या पुढच्या भागावरील चार बघ्यांना त्या प्रदेशाचे दर्शन घडले.

मोमोतारोला लगेच कळले की तो सैतानांचा बालेकिल्ला होता. किनाऱ्याच्या धोकादायक उताराच्या टोकावर समुद्राकडे टेहळणी करणारा एक मोठा किल्ला होता. त्याचं अद्भूत कार्य हाताच्या अंतरावर होते, दोन्ही हातांमध्ये तो त्याचे डोके धरून विचार करीत होता की हल्ल्याला सुरुवात कशी करावी. त्याचे तिन्ही अनुयायी त्याच्याकडे बघून त्याच्या आज्ञेची वाट बघत होते. शेवटी त्याने तीतर पक्षाला हाक मारली.

“तू आमच्याजवळ आहेस ही मोठी संधी आहे,” मोमोतारो त्या पक्ष्याला म्हणाला. “कारण तुला छान पंख आहेत. ताबडतोब किल्ल्याकडे उडत जा आणि सैतानांना युद्धात गुंतव. आम्ही तुझ्या मागे येतो.”

तीतर पक्षाने ताबडतोब आज्ञा पाळली. तो आनंदाने पंख फडफडवित जहाजावरून उडाला. तो पक्षी लवकरच त्या बेटावर पोहोचला आणि किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या छपरावर त्याने पवित्रा घेतला, मोठ्याने ओरडत तो म्हणाला,

“समस्त सैतानांनो माझं ऐका! जपानचा श्रेष्ठ सेनापती मोमोतारो तुमच्याशी युद्ध करून तुमचा बालेकिल्ला तुमच्याकडून ताब्यात घेण्यासाठी आला आहे. जर तुम्हाला तुमचा जीव वाचवायचा असेल तर  ताबडतोब शरण या, आणि शरणागतीचे चिन्ह म्हणून तुम्हाला तुमच्या कपाळावर उगवलेली शिंगे मोडून द्यावी लागतील. जर तुम्ही ताबडतोब शरण आला नाहीत, परंतु युद्ध करायचे ठरविलेत तर आम्ही, तीतर पक्षी, कुत्रा आणि माकड सारे तुमचा चावा घेऊ आणि फाडून तुम्हाला ठार मारून टाकू!”

शिंग असलेले सैतान तीतर पक्षाकडे पाहून फक्त हसले आणि म्हणाले,

“रानटी तीतर पक्षी, खरोखर! तुझ्यासारख्या यःकश्चित पक्षाकडून हे शब्द ऐकणे म्हणजे हास्यास्पद आहे. आमच्या पोलादी सळयांपैकी एकीचा फटका बसेपर्यंत थांब!”

ते सैतान खरोखर खूपच संतापलेले होते. त्यांनी त्यांची शिंगे आणि लालखरबरीत केसांच्या जटा उग्रपणे हलविल्या आणि घाईघाईने व्याघ्रांबर नेसून त्यांनी स्वतःला अधिक भयंकर बनविले. त्यांनी नंतर पोलादी सळया आणल्या आणि जेथे तीतर पक्षी त्यांच्या डोक्यावर घिरट्या घालीत होता तेथे जाऊन त्याला त्यांनी खाली पाडायचा प्रयत्न केला. तीतर पक्षी वर एका बाजूला उडाला आणि त्यांच्या फटक्यांपासून वाचायचा प्रयत्न करू लागला, नंतर त्याने एकाच्या डोक्यावर हल्ला केला आणि नंतर दुसऱ्या सैतानाच्या. नंतर तो त्यांच्या अवतीभोवती उडून इतक्या भयंकर रितीने पंख फडफडवू लागला की ते सैतान आश्चर्यचकित होऊन असा विचार करू लागले की ते एका पक्षाशी युद्ध करताहेत की अनेक पक्षांशी.

त्या दरम्यान, मोमोतारोने जहाज जमिनीवर आणले होते. जसे ते पोहोचले तसे त्याने पाहिले की तो किनारा एक उभा कडा होता आणि तो किल्ला मोठ्या उंच भिंतींनी आणि मोठ्या लोखंडी प्रवेशद्वारांनी घेरलेला होता. आणि तटबंदी बांधून मजबूत केलेला होता.

मोमोतारो जमिनीवर उतरला आणि शिखरावर जाण्यासाठी कोठे प्रवेश मिळतो का ह्या आशेने वर चालत होता. त्याच्या मागे माकड आणि कुत्रा जात होते. लवकरच ते कुमारिका जेथे कपडे धूत होत्या तेथे ओढ्यावर आले. मोमोतारोने पाहिले की ते कपडे रक्ताच्या डागांनी माखलेले होते आणि ते कपडे धुताना त्या दोघी तरूणींच्या गालावरून अश्रू झरझर ओघळत होते. तो थांबला आणि त्यांच्याशी बोलू लागला,

“कोण आहात तुम्ही आणि का रडताहात?”

“आम्ही सैतानराजाचे कैदी आहोत. आम्हाला आमच्या घरापासून ह्या बेटावर आणले गेले होते. जरी आम्ही दाईमिओसच्या(सरदाराच्या) मुली असलो तरी आम्हाला त्याच्या नोकरांप्रमाणे वागावे लागते आणि एक दिवस तो आम्हालाही ठार मारेल” आणि त्या तरूणींनी रक्ताच्या डागांनी माखलेले कपडे त्याला दाखविले-- “आणि तो आम्हाला खाऊनही टाकेल आणि आम्हाला कोणीही मदत करणारासुद्धा नाही.”

आणि ह्या भयंकर विचाराने त्यांना रडू फुटून त्यांच्या डोळयातून अश्रू वाहू लागले.

“मी तुमची सुटका करीन,” मोमोतारो म्हणाला. “आता ह्यापुढे अधिक रडू नका. फक्त ह्या किल्ल्यात कसे शिरायचे ते मला सांगा.”

नंतर त्या दोन्ही स्त्रियांनी त्या किल्ल्याच्या भिंतीच्या खालच्या बाजूस थोडे मागे असलेले छोटेसे द्वार मोमोतारोला दाखविले. ते इतके छोटे होते की मोमोतारोला मोठ्या कष्टाने सरपटत आत जावे लागले. तो तीतर पक्षी, जो आत्तापर्यंत सर्व वेळ लढत होता, त्याने मोमोतारोला आणि त्याच्या मागून जोरात येत असलेल्या त्याच्या टोळीला बघितले.

मोमोतारोचे आक्रमण इतके भीषण होते की सैतान त्याच्या विरोधात उभे राहू शकले नाहीत. सुरुवातीला त्यांचा शत्रू म्हणजे एकटा तीतर पक्षी होता. पण आता मोमोतारो, कुत्रा आणि माकड येऊन पोहोचल्यामुळे ते गोंधळून गेले होते. कारण त्यांचे ते चार शत्रू शंभराइतके खूप शक्तीशाली होते. काही सैतान किल्ल्याच्या कमीत कमी उंचीच्या संरक्षक भिंतीवरून खाली कोसळले आणि खाली खडकावर आदळून त्यांचे तुकडे तुकडे झाले. इतर समुद्रात पडून बुडून गेले, अनेक तर तीन प्राण्यांकडून ठार मारले गेले. त्या सैतानांचा प्रमुखच फक्त शेवटी उरला. त्याने

शरणागती पत्करायचे ठरविले, कारण त्याला ठाऊक होते की त्याचा शत्रू मर्त्य प्राण्यांपेक्षा प्रबळ होता.

तो नम्रपणे मोमोतारोकडे आला. त्याने त्याची पोलादी सळई फेकून दिली आणि जेत्यापुढे गुडघे टेकले. शरणागतीचे चिन्ह म्हणून डोक्यावरची शिंगे मोडून टाकली, कारण तीच त्यांच्या शक्ती आणि सामर्थ्याचे प्रतीक होती.

"मी तुम्हाला घाबरलो आहे," तो लीनतेने म्हणाला. "मी तुमच्या विरूद्ध उभा राहू शकत नाही. जर तुम्ही मला जीवदान दिलेत तर किल्ल्यात लपविलेला सर्व खजिना मी तुमच्या स्वाधीन करीन."

मोमोतारो हसला.

"तुझ्यासारख्या, मोठ्या सैतानाला अशी दयेची भीक मागणं शोभत नाही, नाही का? तुझ्यासारख्या पाप्याला मी जीवदान देऊ शकणार नाही. तू कितीही आर्जव केले तरीही. कारण तू अनेक लोकांना हालहाल करून ठार मारले आहेस आणि फार वर्षांपासून तू आमच्या देशाला लुटले आहेस."

मोमोतारोने सैतानाच्या प्रमुखाला बांधून टाकले व माकडाच्या ताब्यात त्याला दिले. हे केल्यानंतर किल्ल्याच्या प्रत्येक खोलीत तो गेला आणि त्याने कैद्यांना मुक्त केले आणि त्याला जेवढा खजिना त्याला सापडला तेवढा त्याने गोळा केला.

कुत्रा आणि तीतर पक्षाने लुटीचा माल घरापर्यंत वाहून आणला आणि अशा रितीने मोमोतारो विजयी होऊन, सैतानाच्या प्रमुखाला कैदी बनवून त्याच्या घरी परतला.

आणि त्या दोन गरीब बिचाऱ्या युवतींना, दाइमिओच्या मुलींना, आणि ज्यांना त्या दुष्ट सैतानाने पकडून आणून गुलाम बनविले होते त्या इतर स्त्रियांनाही सुरक्षितपणे त्यांच्या घरी पोहोचवून त्यांच्या आईवडिलांच्या स्वाधीन केले.

संपूर्ण देशाने मोमोतारोला त्याच्या विजयी परतीच्या वेळी शूरवीर म्हणून घोषित केले. ज्या लुटारू सैतानांपासून बऱ्याच काळापर्यंत त्यांच्या देशात भीती निर्माण झाली होती त्या सैतानांपासून मुक्त झाल्याने सारे आनंद साजरा करीत होते.

त्या म्हाताऱ्या जोडप्याचा आनंद सर्वात मोठा होता, आणि मोमोतारोने आणलेला खजिना त्यांना त्यांचे संपूर्ण आयुष्य सुखी आणि शांततेने घालविताना आयुष्यभर अखेरपर्यंत पुरला.

* * * * *



# राशोमॉनचा नरभक्षक दुष्ट राक्षस



फार फार वर्षांपूर्वी क्योतो ह्या शहरातील लोक एका भयंकर नरभक्षक राक्षसामुळे खूप घाबरले होते, ज्याच्याबद्दल असे म्हटले जात होते की राशोमॉनचे प्रवेशद्वार संधीप्रकाशाचे वेळी झपाटले जायचे आणि जो कोणी त्यातून जायचा त्याला जबरदस्तीने पकडले जायचे. हरवलेला बळी पुन्हा कधीच दिसायचा नाही, म्हणून असे कुजबुजले जायचे की तो भयंकर राक्षस नरमांसभक्षक होता, जो फक्त त्या दुःखी बळींना केवळ ठारच मारीत नसे तर त्यांना खाऊनही टाकीत असे. आता त्या शहरातील आणि सानिध्यातील सर्व लोकांना खूप भीती वाटत होती आणि कोणीही सूर्यास्तानंतर राशोमॉनच्या प्रवेशद्वाराजवळ जाऊन धोका पत्करण्याचे धाडस करीत नव्हता.

आता ह्या काळात क्योतोमध्ये राइको नावाचा सेनापती राहत होता ज्याने स्वतःला त्याच्या शौर्यकृत्यांमुळे कीर्तीमान बनविलेले होते. काही काळापूर्वी त्याने त्याच्या नावाभोवती त्या प्रदेशात वलय निर्माण केले होते, कारण जेथे नरमांस भक्षक टोळी जी मद्याऐवजी मनुष्यप्राण्याचे रक्त प्राशन करायची, त्यांच्या

प्रमुखाबरोबर रहायची त्या ओयेयामावर त्याने हल्ला केला होता. त्याने त्यांचा पूर्ण पराभव केला होता आणि सैतानाच्या प्रमुखाचे डोके उडविले होते.

ह्या शूर योद्ध्यामागे नेहमी एकनिष्ठ सरदारांची टोळी असायची. ह्या टोळीत पाच महापराक्रमी सरदार होते. एके दिवशी सायंकाळी जेव्हा ते पाच सरदार भाताच्या वाटीत साके पिण्याच्या मेजवानीसाठी बसले होते आणि सोबत कच्चे व शिजवलेले आणि भाजलेले मांस खात होते आणि त्यांच्या आरोग्यासाठी, पराक्रमासाठी पेले उंच धरीत होते, तेव्हा होजो इतरांना म्हणाला,

“राशोमॉनच्या प्रवेशद्वाराजवळ सूर्यास्तानंतर प्रत्येक सायंकाळी एक नरभक्षक राक्षस येतो आणि त्यातून जाणाऱ्या प्रत्येकाला तो जबरीने पकडून नेतो अशी अफवा तुम्ही सर्वांनी ऐकली आहे ना?”

दुसरा सरदार वातानाबेने त्याला उत्तर देत म्हटले.

“असं काही निरर्थक बोलू नका! आमचे ओयेयामाकडचे प्रमुख राइको यांचेकडून सर्व नरभक्षक राक्षस मारले गेले होते! हे खरंच असू शकत नाही. कारण कोणीही नरभक्षक राक्षस ह्या मोठ्या हत्येमधून वाचले असतील तर ह्या शहरामध्ये येण्याचे धाडस ते करू शकणार नाहीत, कारण त्यांना ठाऊक आहे की आमच्या शूर मालकाला हे कळले की त्यांच्यापैकी कोणी अद्याप जिवंत आहेत तर त्यांच्यावर ते तात्काळ हल्ला करतील!”

“मग तुम्ही मी काय म्हणतो ह्यावर अविश्वास दाखविणार का? आणि तुम्ही विचार कराल की मी तुम्हाला काहीतरी खोटं सांगतो आहे म्हणून?”

“नाही, तुम्ही खोटं बोलत आहात असं आम्हाला वाटत नाही,” वातानाबे म्हणाला, “पण तुम्ही त्या म्हातारीची गोष्ट ऐकली असेल जी विश्वसनीय नाही.”

“मग मी जे काही म्हणतो ते सिद्ध करण्यासाठी आपण एक योजना आखू, तुम्ही स्वतः तेथे जाऊन तुम्हीच ते खरं की खोटं हे शोधा.” होजो म्हणाला.

वातानाबे, दुसरा सरदार आपल्या सोबत्याने त्यावर विश्वास ठेवावा हे सहन न झाल्याने त्याने ताबडतोब उत्तर दिले,

“खचितच, मी लगेच जातो आणि स्वतः शोध घेतो!”

म्हणून वातानाबे लगेच जायला तयार झाला—त्याने कमरेला त्याची पल्लेदार तलवार खोचली, चिलखत घातले आणि डोक्याला मोठे शिरस्त्राण घट्ट बांधले. जेव्हा तो जायला तयार झाला तेव्हा तो इतरांना म्हणाला,

“मला काहीतरी द्या म्हणजे मी तेथे जाऊन आलो हे त्यामुळे मी सिद्ध करेन!”

त्या माणसांपैकी एकाने लिहिण्याच्या कागदाची गुंडाळी आणि भारतीय शाई व कुंचल्याची पेटी दिली आणि चार सहचरांनी कागदाच्या एका तुकड्यावर त्यांची नावे लिहिली.

“मी घेईन हे,” वातानाबे म्हणाला, “आणि ते राशोमॉनच्या प्रवेशद्वारावर ठेवा म्हणजे उद्या सकाळी तुम्ही सर्वजण जाल आणि ते पहाल. मी त्या नरमांस भक्षकांपैकी एकाला किंवा दोघांना पकडू शकेन मग!” आणि तो घोड्यावर स्वार झाला आणि शूरपणे प्रवासास निघाला.

ती अतिशय अंधारी रात्र होती, आणि तेथे वातानाबेचा मार्ग उजळायला चंद्रही नव्हता आणि ताराही नव्हता. त्या अंधःकाराला आणखी भयंकर बनविण्यासाठी वादळ आले, मुसळधार पाऊस पडू लागला, वारा पर्वतांमध्ये लांडग्यासारखा आक्रंदू लागला. सर्वसामान्य माणूस बाहेर पडण्याच्या भीतीने थरथर

कापू लागला असता, पण वातानाबे हा शूर आणि निर्भीड योद्धा होता. आणि आता त्याचा सन्मान आणि शब्द पणाला लागले होते, म्हणून तो त्या रात्रीत भरधाव जात होता. त्यावेळी त्याच्या सहचरांना घोड्याच्या टापांचा आवाज दूर लांब अंतरावर जात कमी कमी होऊ लागलेला ऐकू येत होता. नंतर त्यांनी सरकदरवाजे बंद केले आणि कोळशाच्या शेगडीभोवती गोळा होऊन आश्चर्य करीत होते की आता काय होईल—आणि त्यांच्या सहचराचा त्यापैकी एका भयंकर नरमांस भक्षकाशी सामना होईल की नाही.

शेवटी वातानाबे राशोमॉनच्या प्रवेशद्वारावर आला, पण अंधारात जेवढे निरखून पाहता येईल तेवढे निरखून पाहिल्यावरही नरमांस भक्षकाचा सुगावा त्याला लागला नाही.

“मी विचार केल्याप्रमाणेच आहे,” वातानाबे स्वतःशीच म्हणाला, “तेथे नक्कीच नरमांस भक्षक राक्षस नसावेत, ही केवळ म्हातारीची गोष्ट आहे. मी हा कागद प्रवेशद्वारावर चिटकवीन म्हणजे ते उद्या येथे आल्यावर बघतील म्हणजे त्यांना कळेल की मी येथे आलो होते आणि नंतर मी माझ्या घरी जाईन आणि त्या सर्वांना हसेन.”

त्याच्या सहचरांनी सह्या केलेला कागद त्याने प्रवेशद्वारावर चिटकविला आणि त्याच्या घोड्याला घराकडे जाण्यासाठी वळविले.

आणि जसं त्याने तसं केलं तेव्हा त्याला अशी जाणीव झाली की त्याच्या पाठीमागे कोणीतरी आहे आणि त्याचवेळी त्याला थांबविण्यासाठी आवाज आला. नंतर त्याचे शिरस्त्राण पाठीमागून घट्ट पकडले गेले.

“कोण आहेस तू?” वातानाबे निर्भीडपणे म्हणाला. नंतर त्याने हात बाहेर काढून त्याला कोणी पकडले हे शोधण्यासाठी चाचपडले. जसा त्याने स्पर्श केला तसे त्याला हातासारखे काहीतरी असल्याचे जाणवले—ते केसांनी पूर्णपणे आच्छादलेले होते आणि झाडाच्या खोडाएवढे मोठे होते.

वातानाबेला तात्काळ कळले की हा बाहू नरभक्षक राक्षसाचा आहे, म्हणून त्याने त्याची तलवार उपसली आणि क्रोधाने त्याला छाटून टाकले.

मोठी दुःखार्त किंचाळी ऐकू आली आणि मग नरभक्षकाने योद्ध्याच्या पुढ्यात उसळी मारली.

वातानाबेचे डोळे आश्चर्याने विस्फारले गेले, कारण त्याने पाहिले की त्या मोठ्या प्रवेशद्वारापेक्षाही तो नरभक्षक उंच होता. त्याचे डोळे सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या आरशाप्रमाणे चमकले आणि त्याचा प्रचंड जबडा विस्तृतपणे वासला गेला होता. आणि जसा तो राक्षस श्वासोच्छवास घेऊ लागला तशा त्याच्या जबड्यातून अग्नीच्या ज्वाळा बाहेर उफाळल्या गेल्या.

नरभक्षकाला वाटले की तो त्याच्या शत्रूला घाबरवून सोडेल पण वातानाबे कदापिही कचरला नाही. त्याने त्याची सारी शक्ती एकवटून त्या नरभक्षकावर हल्ला केला आणि अशा रितीने ते समोरासमोर खूप काळ लढले. शेवटी त्या नरभक्षक राक्षसाला कळून चुकले की तो वातानाबेला ना घाबरवून सोडू शकतो ना त्याचा पराभव करूशकतो. त्याचा स्वतःचाच पराभव होणार अशी त्याची खात्री पटल्याने त्याने पलायनाचा पवित्रा घेतला पण त्या राक्षसाला सोडायचे नाही असे पक्के ठरवून वातानाबेने घोड्याला टाच मारली आणि त्याचा पाठलाग केला.

पण सरदार जरी खूप जलद स्वार झाला तरी नरभक्षक राक्षस अधिक वेगाने पळाला. त्या सैतानाच्या पुढे जाण्यात तो अयशस्वी ठरला. तो सैतान हळूहळू अदृश्य झाल्याने तो निराश झाला.

जेथे भयंकर युद्ध झाले होते त्या प्रवेशद्वाराकडे वातानाबे परत आला आणि घोड्यावरून खाली उतरला. तसे केल्याबरोबर तो जमिनीवर असलेल्या काहीतरी वस्तूवर अडखळून पडला.

ते उचलण्यासाठी खाली वाकल्याबरोबर त्याला आढळून आले की तो नरभक्षक राक्षसाचा बाहू होता जो त्याने युद्धामध्ये सपासप वार करून कापून टाकला होता. नरभक्षक राक्षसाशी झुंज देताना केलेल्या साहसाचे बक्षिस म्हणून पुरावा सापडल्याने त्याला खूपच आनंद झाला होता. म्हणून त्याने ते काळजीपूर्वक उचलून विजयाचे चिन्ह म्हणून घरी आणले.

जेव्हा तो परतला तेव्हा त्याने त्याच्या सहचऱ्यांना तो बाहू दाखविला जे त्याला त्यांच्या टोळीचा नायक म्हणून संबोधित होते आणि त्यांनी त्याला मोठी मेजवानी दिली. त्याचे अद्भूत शौर्य क्योतोच्या दूरवरच्या प्रदेशात प्रसृत झाले आणि दूरवरचे आणि जवळचे लोक नरभक्षक राक्षसाचा बाहू पाहण्यासाठी आले.

तो बाहू सुरक्षित कसा ठेवावा ह्याबद्दल वातानाबेची अस्वस्थता वाढत होती, कारण त्याला ठाऊक होते की ज्या नरभक्षक राक्षसाचा तो हात होता तो अजूनही जिवंत होता. त्याला खात्रीने असे वाटू लागले की जेव्हा त्या नरभक्षकाची भीती नाहीशी होईल तेव्हा तो त्याचा बाहू परत मिळविण्याचा प्रयत्न करण्यासाठी पुन्हा येईल. म्हणून वातानाबेने भक्कम लाकडापासून एक पेटी तयार केली आणि तिच्या भोवती लोखंडी पट्ट्या ठोकल्या. ह्या पेटीत त्याने तो बाहू ठेवला आणि अवजड झाकणाने ती बंद करून कोणालाही ती उघडण्यास मनाई केली. त्याने ती पेटी त्याच्या खोलीत आणि त्याच्या स्वतःच्या नियंत्रणात ठेवली आणि त्याच्या नजरेसमोरून ती हलू न देण्याची दक्षता घेतली.

आता एके रात्री द्वारमंडपावर आत येण्यासाठी परवानगी मागत ठोठावण्याचा आवाज ऐकू आला. जेव्हा नोकराने कोण आहे म्हणून दाराजवळ जाऊन पाहिले तेव्हा त्याला फक्त एक म्हातारी दिसली, पेहरावावरून ती खूपच प्रतिष्ठित दिसत होती. जेव्हा तिला ती कोण आहे व काय काम आहे म्हणून विचारण्यात आले तेव्हा तिने मंद स्मित करीत उत्तर दिले की त्या घराचा मालक जेव्हा लहान मूल होता तेव्हा ती त्याची परिचारिका होती. जर घरमालक घरी असतील तर ती त्यांना भेटण्याची परवानगी मागत होती.

त्या नोकराने म्हातारीला दाराजवळ सोडले आणि त्याच्या मालकाला सांगायला गेला की त्याची जुनी परिचारिका त्याला भेटायला आली होती. रात्रीच्या वेळी त्याला तिने भेटायला यावे हे वातानाबेला विचित्र वाटले, पण जुन्या परिचारिकेचा विचार करता जी त्याला मातृकेसमान होती, आणि जिला त्याने बऱ्याच दिवसांपासून पाहिले नव्हते तेव्हा त्याच्या हृदयातून नाजूक भावना उसळून आल्या. त्याने त्याच्या नोकराला तिला आत आणण्याची आज्ञा केली.

त्या म्हातारीला आत खोलीत नेण्यात आले, आणि रितीरिवाजानुसार नमस्कार आगतस्वागत झाल्यावर ती म्हणालीः

“महाराज राशोमॉनच्या प्रवेशद्वाराकडे नरमांस भक्षकाशी झालेल्या तुमच्या धाडसी युद्धाबद्दलची वार्ता सर्वत्र पसरली, इतकी की तुमच्या गरीब परिचारिकेनेही ती ऐकली. प्रत्येकजण काय म्हणतो की तुम्ही त्या नरभक्षकाचा एक बाहू कापून टाकला हे खरोखर सत्य आहे? जर तुम्ही ते केले असेल तर तुमचे हे कृत्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे.”

“मी खूपच निराश झालो,” वातानाबे म्हणाला, “माझी इच्छा होती की त्या राक्षसाला कैद करून आणावे, पण त्या ऐवजी मी फक्त त्याचा बाहूच तोडून आणू शकलो !”

“हा विचार करताना मला खूप अभिमान वाटतो,” म्हातारीने उत्तर दिले, “की माझा मालक इतका शूर होता की त्याने नरभक्षक राक्षसाचा बाहू तोडण्याचे धाडस केले. तुझ्या ह्या धाडसाची तुलना कशाशीच होऊ शकणार नाही. मृत्यूपूर्वी माझी अशी मोठी इच्छा होती की तो बाहू पहावा.” ती पुन्हा पुन्हा विनंती करीत म्हणाली.

"नाही," वातानाबे म्हणाला. "मला माफ करा पण मी तुमची विनंती मान्य करू शकत नाही."

"पण का?" त्या म्हातारीने विचारले.

"कारण, नरभक्षक राक्षस सूडबुद्धी असलेले प्राणी असतात, आणि जर मी ती पेटी उघडली तर काही सांगता येत नाही अचानक केव्हा तो नरभक्षक राक्षस प्रकट होईल आणि त्याचा बाहू घेऊन जाईल ते. माझ्याजवळ ही जी पेटी आहे तिचे झाकण मी ह्याच हेतूने अतिशय भक्कम बनवून घेतले आहे, आणि ह्या पेटीत नरभक्षक राक्षसाचा बाहू सुरक्षित ठेवला आहे. काहीही झाले तरी मी तो बाहू कुणालाही कधीही दाखविणार नाही."

"तुमची पूर्वदक्षता खूपच संयुक्तिक आहे," म्हातारी म्हणाली. "पण मी तुमची जुनी परिचारिका आहे, म्हणून तुम्ही खात्रीने मला तो बाहू दाखविण्यास नकार देणार नाही. मी तुमच्या शूर कृत्याबद्दल नुकतेच ऐकले आहे, आणि सकाळपर्यंत मी थांबू शकत नाही. म्हणून मी लगेचच आले तुम्ही मला तो दाखवावा ही विनंती करण्यासाठी."

म्हातारीने केलेल्या विनंती मुळे वातानाबे उद्विग्न झाला खरा, परंतु तो अजूनही त्याचा हट्ट सोडीत नव्हता. मग म्हातारी म्हणालीः

"त्या नरभक्षक राक्षसाने मला गुप्तहेर बनवून तुमच्याकडे पाठविले आहे असा तुम्हाला संशय येत आहे का?"

"नाही, तुम्ही नरभक्षक राक्षसाचे हेर आहात असा मला मुळीच संशय येत नाही कारण तुम्ही माझ्या जुन्या परिचारिका आहात," वातानाबे म्हणाला.

“मग तुम्ही मला तो बाहू दाखविण्यासाठी फार काळ नकार देऊ शकणार नाही.” म्हातारीने विनवणी केली. “कारण आयुष्यात माझी एकदा तरी नरभक्षक राक्षसाचा बाहू बघण्याची खूप मोठी इच्छा आहे!”

वातानाबे फार काळ नकार आवरू शकला नाही, म्हणून तो त्याचा आग्रह सोडीत म्हणाला, “मग मी तुम्हाला त्या नरभक्षक राक्षसाचा बाहू दाखवीन कारण तो बघण्यासाठी तुम्हीच कळकळीची विनंती करीत आहात. या, माझ्या मागे!” आणि त्याने तिला त्याच्या खोलीकडे नेले, ती म्हातारी त्याच्या मागे गेली.

जेव्हा ते दोघे खोलीत होते तेव्हा वातानाबेने खोलीचे दार काळजीपूर्वक बंद केले, आणि नंतर तो कोपऱ्यात ठेवलेल्या पेटीकडे जाऊन उभा राहिला आणि त्याने पेटीचे झाकण उघडले. त्यानंतर त्याने म्हातारीला आत पाहण्यासाठी जवळ बोलाविले, कारण त्याला तो बाहू पेटीतून कधीच बाहेर काढायचा नव्हता.

“कसा दिसतो तो? मला नीटसं पाहू द्या त्याच्याकडे,” ती म्हातारी परिचारिका आनंदपूर्ण मुद्रेने म्हणाली. ती जवळ आणि जवळ आली, जणू काही ती पेटीसमोर येऊन उभी राहीपर्यंत खूप घाबरली होती. अकस्मात तिने तिचे हात पेटीत खुपसले, भयंकर आवाजात किंचाळत बाहूला पकडले, तिच्या किंचाळण्याने खोली हादरली!

“ओ काय आनंद! मला माझा बाहू परत मिळाला!”

आणि तात्काळ त्या म्हातारीचे रूपांतर एका मोठ्या उत्तुंग भयंकर नरभक्षक राक्षसात झाले!

वातानाबेने मागे उसळी मारली आणि क्षणभर तो हलूही शकत नव्हता इतका तो विस्मयचकित झाला. परंतु राशोमॉनच्या प्रवेशद्वाराजवळ त्याच्यावर

हल्ला चढविणारा तो नरभक्षक राक्षस आहे हे ओळखल्याबरोबर त्याच्या नेहमीच्या धाडसाने त्याने त्याला त्यावेळी तेथेच ठार मारून टाकण्याचे ठरविले. त्याने त्याची तलवार घट्ट पकडली आणि म्यानातून वीजेसारखी बाहेर उपसून त्याने त्या नरभक्षक राक्षसाला कापून काढायचा प्रयत्न केला.

वातानाबेने इतकी जलद हालचाल केली की तो प्राणी थोडक्यात बचावला. त्या नरभक्षक राक्षसाने छताकडे उसळी मारली, आणि छप्पर फाडून तो धुक्यात आणि ढगात नाहीसा झाला.

अशा रितीने तो नरभक्षक राक्षस त्याच्या बाहूसह निसटून पळून गेला. त्या सरदाराने निराशेने दात ओठ खाल्ले, पण एवढेच काय तो करू शकत होता. त्याने नरभक्षक राक्षसाला संपविण्याच्या दुसऱ्या संधीची सबुरीने वाट बघितली. पण वातानाबेच्या अफाट शक्ती आणि धाडसाला तो राक्षस घाबरला, आणि क्योतोला त्याने पुन्हा कधीच त्रास दिला नाही. म्हणून शहरातील लोक पुन्हा एकदा रात्रीच्या वेळी सुद्धा शहरातून निर्भीडपणे फिरू लागले आणि वातानाबेचे साहसी कृत्य कधीही विसरले गेले नाही!

* * * * *

# म्हाताऱ्याचे गलंड कसे नाहीसे झाले



फार फार वर्षांपूर्वी एक सुशील म्हातारा राहत होता, ज्याच्या उजव्या गालावर टेनिसच्या चेंडूसारखे एक गलंड वाढत होते. ह्या मोठ्या गाठीने त्या म्हाताऱ्याला विरूप बनविले होते आणि त्याने त्याला इतके क्लेश दिले होते की त्याने अनेक वर्षांपासून वेळ आणि पैसा खर्च करून त्यापासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला होता. वाटेल तो प्रत्येक प्रयत्न त्याने करून पाहिला. जवळपासच्या आणि दूरवरच्या अनेक डॉक्टरांचा सल्ला त्याने घेतला होता आणि सर्व प्रकारच्या औषधांचा आतून आणि बाहेरून वापर करून पाहिला होता. पण त्या सर्वांचा काहीच उपयोग झाला नव्हता. ती मोठी गाठ अधिक मोठी, त्याच्या चेहऱ्याएवढी होत गेली आणि निराशेने त्याने सर्व आशा सोडून नाइलाजास्तव आयुष्यभर ते टेंगुळ सहन करायचे ठरविले.

एके दिवशी त्याच्या घरातील सरपण संपले. त्याच्या बायकोला ते लगेच हवे होते म्हणून तो म्हातारा लाकडे तोडून आणण्यासाठी कुऱ्हाड घेऊन टेकड्यांमध्ये गेला जे त्याच्या घरापासून फारसे लांब नव्हते. शरद्ऋतूच्या प्रारंभातील तो सुंदर दिवस होता आणि म्हातारा ताज्या हवेची मौज लुटत होता आणि त्याला घरी जायची

घाई नव्हती. म्हणून तो लाकडे तोडीत असताना दुपार शीघ्रतेने संपली आणि त्याने त्याच्या बायकोकडे नेण्यासाठी लाकडांचा मोठा भारा पाठीवर ठेवला. जेव्हा दिवस मावळायला लागला तेव्हा तो घराकडे जायला वळला.

तो म्हातारा पर्वतावरून फारसा खाली उतरला नाही तोच आभाळ ढगांनी भरून आले आणि मुसळधार वृष्टीला सुरुवात झाली. त्याने आजूबाजूला कोठे आसरा मिळतो का पाहिले पण त्याला जळती शेगडी असलेली झोपडीही दिसली नाही. शेवटी त्याला झाडाच्या पोकळ खोडात मोठी ढोली दिसली. ती ढोली जमिनीलगत असल्याने तो सहजपणे सरपटत आत गेला, आणि आत ह्या आशेने जाऊन बसला की तो केवळ पर्वताच्या पावसात भिजला होता आणि लवकरच ते वातावरण निवळेल.

पण म्हाताऱ्याच्या नैराश्यतेत भर म्हणून वातावरण निवळायच्या ऐवजी पाऊस अधिकाधिक जोरदार कोसळू लागला आणि अखेरीस पर्वतावर मेघगर्जनेसह वादळ सुरू झाले. गडगडाट भयंकर रितीने सुरू झाला, आकाश जणू विजांनी पेटले होते आणि म्हाताऱ्याला आपण जिवंत राहू यावर विश्वासच बसत नव्हता. त्याने विचार केला की भीतीने त्याला मृत्यू येईल. तथापि शेवटी आकाश निरभ्र झाले आणि सबंध प्रदेश सूर्यास्ताच्या प्रकाशकिरणांनी तळपू लागला. त्या सुंदर संधिप्रकाशामुळे म्हाताऱ्याला पुन्हा चैतन्य प्राप्त झाले, आणि आतून पोकळ असलेल्या झाडातील लपण्याच्या त्या विचित्र जागेतून तो बाहेर पडणार इतक्यात जवळ येत असलेल्या अनेक लोकांच्या पावलांचा आवाज त्याच्या कानावर आला. त्याने लगेचच असा विचार केला की त्याचे मित्रच त्याला शोधीत तेथे आले असावेत, आणि आता घरापर्यंत चालत जायला सोबत म्हणून खूप आनंदी मित्रांचा सहवास लाभेल ह्या कल्पनेने त्याला खूप हर्ष झाला. पण काय आश्चर्य की झाडाच्या बाहेर पाहिल्यावर त्याला दिसले की, ते त्याचे मित्र नव्हे, तर शेकडो राक्षस त्या ठिकाणाकडे येताहेत. जसजसा तो अधिकाधिक बघू लागला तसा तसा त्याला मोठा चमत्कार दिसू लागला. त्यापैकी काही भीमकाय दैत्या सारखे विशाल होते, इतरांचे डोळे त्यांच्या शरीराच्या

प्रमाणाबाहेर भले मोठे होते, इतरांना हास्यास्पद लांब नाके होती, आणि काहींचे जबडे ह्या कानापासून त्या कानापर्यंत उघडणारे भासत होते. सर्वांच्या कपाळावर शिंगे उगवलेली होती. म्हाताऱ्याला ते पाहिल्याबरोबर इतके आश्चर्य वाटले की त्याचा तोल जाऊन तो झाडाच्या ढोलीबाहेर पडला. सुदैवाने राक्षसांनी त्याला पाहिले नाही कारण ते झाड मागच्या बाजूला होते. म्हणून त्याने स्वतःला सावरले आणि तो सरपटत मागे जाऊन पुन्हा झाडात बसला.

जेव्हा तो तेथे आश्चर्य करीत बसून तो घरी कधी जाईल म्हणून अधीरतेने वाट बघत होता तेव्हा त्याला आनंदोत्सवाच्या संगीताचा आवाज ऐकू आला, आणि नंतर काही राक्षसांनी गायला सुरूवात केली.

“काय करत आहेत हे प्राणी?” म्हातारा स्वतःशीच म्हणाला, “मी बाहेर पाहीन, ते काहीतरी गमतीशीर आहे खरे.”

म्हाताऱ्याने बाहेर डोकावून पाहिल्याबरोबर त्याला दिसले की ज्या झाडाचा त्याने आश्रय घेतला होता, त्याच झाडाला पाठ टेकून त्या राक्षसांचा प्रमुख बसला होता, आणि बाकीचे राक्षस त्याच्या भोवती बसले होते, काही पीत होते तर काही नाचत होते. अन्नपदार्थ आणि मद्य जमिनीवर विखुरलेले होते आणि ते राक्षस उघडपणे मनोरंजन करीत होते आणि स्वतः अतिशय मौज लुटत होते.

त्यांच्या त्या विचित्र चाळयांमुळे म्हाताऱ्याला हसू फुटले.

“किती गमतीदार आहे हे!” म्हातारा स्वतःशीच हसला, “मी आता पूर्णतया म्हातारा झालो आहे, पण असे काहीतरी विलक्षण मी माझ्या संपूर्ण आयुष्यात बघितले नाही.”

ते राक्षस जे काही करीत होते ते पाहण्यात तो इतका तन्मय व धुंद झाला होता की त्याचे त्यालाच भान उरले नाही आणि त्याने झाडातून बाहेर पावले टाकली आणि त्यांच्याकडे बघत उभा राहिला.

राक्षसांचा प्रमुख नुकताच एक साकेचा मोठा कप हातात घेत होता आणि नाचणाऱ्या राक्षसांपैकी एकाकडे बघत होता. थोड्याच वेळात तो कंटाळवाणे पणाने म्हणाला,

“तुझे नृत्य काहीसे रटाळ आहे. ते पाहण्याचा मला कंटाळा आला आहे. ह्याच्यापेक्षा छान नाचेल असा तुमच्यात कोणी एक नाही का?”

आता त्या म्हाताऱ्याला आयुष्यभर नृत्य आवडत होते. तो पूर्णपणे त्या कलेत निपुण होता. आणि त्याला ठाऊक होते की त्या राक्षसांपेक्षा तो नक्कीच चांगला नाचू शकेल.

“त्या राक्षसांसमोर जाऊन मी नाचावे का? आणि त्यांना पाहू द्यावे की मनुष्यप्राणी काय करू शकतात ते? कदाचित हे धोकादायक असेल कारण मी त्यांना खूष केले नाही तर ते मला ठार मारतील!” असे तो म्हातारा स्वतःशीच म्हणाला.

तथापि नृत्यावरील प्रेमाने त्याची भीती मावळली. थोड्यावेळानंतर तो स्वतःवर ताबा ठेऊ शकला नाही. त्या राक्षसांच्या सबंध मेजवानीसमोर तो आला आणि त्याने लगेच नृत्य करायला सुरुवात केली. आपण त्यांना खूष करू शकू की नाही ह्यावर आपले जीवन मृत्यू अवलंबून आहे ह्याची जाणीव होऊन त्या म्हाताऱ्याने त्या विचित्र प्राण्यांसमोर त्याचे नृत्यातील कौशल्य पणाला लावण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न केले.

"किती विचित्र!" शिंग असलेला तो राक्षसांचा प्रमुख म्हणाला. "मी असा कुशल नर्तक कधीही पूर्वी पाहिला नाही! तो कौतुकास्पद नाचला!"

जेव्हा त्या म्हाताऱ्याने त्याचे नृत्य संपविले तेव्हा तो मोठा राक्षस म्हणाला, "तुझ्या गमतीशीर नृत्याबद्दल खूप आभारी आहे. आता आमच्याबरोबर दारूचा प्याला पिऊन आम्हाला संतुष्ट कर." आणि ह्या शब्दाबरोबर त्याने त्याच्या हातात सर्वात मोठा दारूचा पेला दिला.

म्हाताऱ्याने नम्रपणे त्यांचे आभार मानले आणि म्हणाला,

"मला तुमच्यासारख्या सन्माननीय व्यक्तीकडून अशा दयाळूपणाची अपेक्षा नव्हती. मला भीती वाटली की माझ्या अकुशल नृत्याने मी तुमच्या आनंदी मेजवानीत व्यत्यय आणला."

"नाही, नाही." मोठ्या राक्षसाने उत्तर दिले. "तुम्ही आमच्यासाठी नृत्य करण्यासाठी येथे वारंवार यायलाच हवे. तुमच्या कौशल्याने आम्हाला खूप आनंद दिलेला आहे."

म्हाताऱ्याने पुन्हा आभार मानून तसे करण्याचे वचन दिले.

"मग तुम्ही पुन्हा याल का बाबा?"राक्षसाने विचारले.

"निश्चितच येईन मी," म्हाताऱ्याने उत्तर दिले.

"मग तुला तुझा शब्द राखण्यासाठी काहीतरी तारण ठेवून जायला हवे." राक्षस म्हणाला.

"तुम्हाला जे काय आवडेल ते," म्हातारा म्हणाला.

“आता तारण म्हणून सगळयात उत्तम अशी कोणती वस्तू तुम्ही आमच्याकडे ठेवून जाऊ शकता?” सभोवती बघत राक्षस म्हणाला.

नंतर प्रमुखाच्या मागे गुडघे टेकून त्या राक्षसाचा सेवक म्हणाला,

“खूण म्हणून ठेवून घ्यायची वस्तू त्यांच्या मालकीची व अत्यंत महत्त्वाची असली पाहिजे. मला त्या म्हाताऱ्याच्या उजव्या गालावर गलंड दिसत आहे. आता मर्त्य माणसे अशा प्रकारचे गलंड अतिशय शुभ मानतात. महाराज मला म्हाताऱ्याच्या उजव्या गालावरची मोठी गाठ काढून घेऊ द्या, ते उद्या नक्की येतील ती परत घेण्यासाठी फक्त.”

“तू खूप हुशार आहेस.” प्रमुख राक्षस संमतीदर्शक शिंग हलवित म्हणाला. नंतर त्याने त्याचा केसाळ बाहू बाहेर काढला आणि नखांच्या पंजासारख्या दिसणाऱ्या हाताने त्या म्हाताऱ्याच्या उजव्या गालावरील मोठी गाठ काढून घेतली. चमत्कार सांगायचा म्हणजे त्या राक्षसाच्या स्पर्शाने ती मोठी गाठ पिकलेल्या आलुबुखाऱ्याचे फळ झाडावरून अलगद हातात यावे तशी आली आणि नंतर तो राक्षसांचा आनंदी कळप अकस्मात नाहीसा झाला.

जे काही घडले त्या संभ्रमात तो म्हातारा हरवून गेला. काही वेळ तो कोठे आहे हे त्याला कळलेच नाही. जे काही घडले ते त्याला पूर्णपणे समजले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील टेंगुळ नाहीसे झाल्याचे पाहून त्याला खूप आनंद झाला. जे बऱ्याच वर्षांपासून त्याच्या चेहऱ्याला विद्रूप बनवित होते ते खरोखर त्याला स्वतःला काहीही वेदना न होता काढले गेले होते. काही जखम उरली का म्हणून हात वर करून काही वाटते का म्हणून पाहिले पण त्याला आढळून आले की त्याचा उजवा गाल डाव्या गालासारखाच नितळ होता.

सूर्यास्त होऊन बराच वेळ झाला होता. आणि किशोर चंद्र आकाशात चंदेरी चंद्रकोरीप्रमाणे उगवलेला होता. म्हाताऱ्याला वाटले की त्याला खूप उशीर झाला म्हणून तो घाईघाईने घरी निघाला. तो संपूर्णवेळ त्या उजव्या गालाला थोपटून पाहत ते गलंड नाहीसे झाल्याच्या सुदैवाची खात्री करीत होता. त्याला इतका आनंद झाला होता की त्याला असे आढळून आले की शांतपणे चालणे त्याला अशक्य झाले होते—घराकडे जाताना तो संपूर्ण वेळ नाचत आणि पळत गेला.

त्याला असे दिसून आले की त्याची बायको खूपच चिंतातुर झालेली होती. काय घडले म्हणून इतका उशीर झाला ह्याचं तिला आश्चर्य वाटत होतं. त्यादिवशी दुपारी त्याने घर सोडल्यापासून काय काय घडले हे सारे तिला सांगितले. त्याच्या चेहऱ्यावरची विद्रूप मोठी गाठ नाहीशी झाल्यामुळे तिच्या नवऱ्याइतकाच तिलाही आनंद झाला होता, कारण तिच्या तारूण्यामध्ये त्याच्या सुंदरतेबद्दल तिला अभिमान वाटायचा आणि त्या गाठीची सतत भयंकर वाढ होत असल्याने तिचे ते रोजचे दुःख वाटत होते.

ह्या सुशील म्हाताऱ्या जोडप्याशेजारी एक दुष्ट आणि भांडखोर म्हातारा राहत होता. त्याला सुद्धा डाव्या गालावर गलंड होते आणि अनेक वर्षांपासून ते वाढत गेल्याने त्याला त्याचा त्रास होत होता. आणि त्याने सुद्धा त्यापासून सुटका करून घेण्यासाठी सर्व पद्धतीने प्रयत्न केले होते पण सर्व व्यर्थ.

त्याला नोकराकडून ताबडतोब कळले की त्याच्या शेजाऱ्याची मोठी गाठ त्याच्या चेहऱ्यावरून सुदैवाने नाहीशी झाली होती, म्हणून त्याने त्याच सायंकाळी त्याच्या मित्राला ती मोठी गाठ कशी नाहीशी झाली ह्या बद्दलची सर्व हकीकत विचारली. त्या सुशील म्हाताऱ्याने त्या भांडखोर शेजाऱ्याला त्याच्याबाबतीत जे काही घडले ते सर्व सांगितले. त्याने त्या जागेचे वर्णन करून सांगितले जेथे त्याला पोकळ झाडात लपण्यासाठी ठिकाण मिळाले होते. आणि दुपारी उशीरा सूर्यास्ताच्या वेळी त्याला तेथे उपस्थित राहण्याचा सल्ला दिला.

तो म्हातारा शेजारी लगेचच दुसऱ्या दिवशी निघाला आणि काही वेळ शोध घेतल्यावर त्याच्या मित्राने वर्णन केले त्या वृक्षाकडे आला. तेथे त्याने स्वतःला लपवून घेतले आणि तो संधिप्रकाशाची वाट पाहू लागला.

त्याने सांगितले होते त्याप्रमाणे त्या घटकेला राक्षसांची टोळी आली आणि त्यांनी नृत्य आणि संगीतासह मेजवानी सुरू केली. जेव्हा हे सारे काही चालले तेव्हा राक्षसांच्या प्रमुखाने सभोवती पाहिले आणि म्हटले,

“आता आपल्याला वचन दिल्याप्रमाणे त्या म्हाताऱ्याची यायची वेळ झाली आहे. का आला नाही तो?”

जेव्हा त्या दुसऱ्या म्हाताऱ्याने हे शब्द ऐकले तेव्हा लपलेल्या जागेतून तो धावतच बाहेर आला आणि त्या सैतानासमोर गुडघे टेकून म्हणाला,

“मी तुमच्याशी बोलण्याची कधीची वाट बघत आहे!”

“ओह, तू तो कालचा म्हातारा आहेस तर,” तो राक्षसांचा प्रमुख म्हणाला. “तू आल्याबद्दल तुझे आभार मानतो, आता तुला लवकरच आमच्यासाठी नृत्य करावे लागेल.”

तो म्हातारा उभा राहिला आणि त्याने त्याचा पंखा उघडला आणि नृत्य करायला सुरुवात केली. पण तो कधीच नृत्य शिकला नव्हता आणि आवश्यक हावभाव आणि निरनिराळ्या शारीरिक हालचाली त्याला ठाऊक नव्हत्या. त्याने विचार केला की तो काहीही करून राक्षसांना खूश करू शकेल म्हणून तो उड्या मारू लागला, पाय आपटू लागला आणि त्याने आजपर्यंत जी काही नृत्ये पाहिली होती त्यांचे अनुकरण करू लागला.

त्या राक्षसांना त्याच्या प्रदर्शनाने असंतोष झाला आणि ते सर्व मिळून बोलू लागले,

“किती वाईट नाचतोय तो आज!”

नंतर तो प्रमुख राक्षस त्या म्हाताऱ्याला म्हणाला,

“तुमचा आताचा नृत्याचा कार्यक्रम कालपेक्षा खूपच वेगळा झाला. आम्हाला अशा प्रकारचे नृत्य ह्यापुढे अजून बघायची मुळीच इच्छा नाही. तुम्ही आमच्याजवळ गहाण ठेवलेली वस्तू तुम्हाला परत करू. तुम्हाला आता तात्काळ जावे लागेल.”

ह्या शब्दाबरोबर त्याने त्याच्या पोषाखाच्या घडीत ठेवलेले टेंगुळ बाहेर काढले जे त्या म्हाताऱ्याने छान नृत्य केल्यामुळे त्यांनी आदल्या दिवशी ठेवून घेतले होते आणि जो म्हातारा त्यांच्या पुढ्यात उभा होता त्याच्या उजव्या गालावर फेकून मारले. ते टेंगुळ ताबडतोब त्याच्या गालाला घट्ट चिकटले. जणू काही निरंतरपणे तेथेच ते निर्माण झाले होते. आणि कितीही त्याला तेथून ओढून काढायचा प्रयत्न केला तरी तो निष्फळ होता. डाव्या गालावरचे टेंगुळ नष्ट व्हावे अशी इच्छा असलेल्या त्या दुष्ट म्हाताऱ्याला ते नष्ट होण्याऐवजी त्याच्या उजव्या गालावर अजून एक दुसरे टेंगुळ जडल्याने खूप धास्ती वाटली.

त्याने त्याच्या चेहऱ्यावर एक हात ठेवला नंतर दुसऱ्या बाजूला दुसरा हात ठेवला आणि तो खरोखर भयंकर स्वप्न तर नाही ना बघत ह्याची खात्री करू लागला. नाही, अगदी निश्चितपणे, अगदी खात्रीने त्याच्या डाव्या तसेच उजव्या बाजूच्या गालावरही टेंगुळ आलेले होते. सर्व राक्षस नाहीसे झालेले होते आणि आता घरी परत जाण्याशिवाय त्याच्यापुढे काहीच मार्ग नव्हता. अतिशय केविलवाणी अशी त्याची अवस्था झाली होती, कारण त्याचा चेहरा दोन्ही बाजूला एक-एक अशा मोठ्या टेंगुळांमुळे जपानी भोपळयासारखा दिसत होता.

* * * * *

# पाच रंगांची रत्ने आणि सम्राज्ञी जोकवा

# एक पुरातन चिनी कहाणी

फार फार वर्षांपूर्वी एक महान चिनी सम्राज्ञी राहत होती जी तिचा भाऊ सम्राट फुकी नंतर राजपदावर आली होती. ते महाकायचे (सत्य) युग होते, आणि ह्या कारणानेच तिचे नाव सम्राज्ञी जोकवा होते, ती तिच्या भावाइतकीच म्हणजे पंचवीस फूट उंच होती. ती अद्भूत आणि सामर्थ्यवान प्रशासक होती. राजा फुकीच्या प्रजेतील एकाने पुकारलेल्या बंडादरम्यान—आकाशाला ज्याने पेलून धरले होते तो आधारस्तंभ आकाशाचा भाग मोडला होता तो ह्या दोन्ही गोष्टींचे जे नुकसान झाले होते ते तिने कसे दुरूस्त केले होते ह्या बाबतीत तेथे एक मजेदार गोष्ट आहे.

त्या बंडखोराचे नाव होते कोकाई. तो सव्वीस फूट उंच होता. त्याचे शरीर पूर्णपणे केसांनी झाकलेले होते. आणि त्याचा चेहरा पोलादासारखा काळा होता. तो खरोखर भीषण आणि मायावी वल्ली होता. जेव्हा सम्राट फुकी मृत्यू पावला, तेव्हा कोकाईला चीनचा सम्राट होण्याची महत्वाकांक्षा होती पण त्याची योजना अयशस्वी झाली आणि जोकवा, मृत सम्राटाची बहिण राजसिंहासनावर बसली. त्याचा बेत उधळून लावला गेल्याने कोकाईला खूप संताप आला आणि त्याने बंड पुकारले. त्याचे पहिले कृत्य म्हणजे जलपिशाच्याचा उपयोग करून त्या प्रदेशावर त्याने मोठ्या पुराचे लोट आणले. ह्यामुळे गरीब लोक बेघर झाले आणि जेव्हा सम्राज्ञी जोकवाने तिच्या जनतेची ती कठीण अवस्था पाहिली आणि कोकाईचे हे निंद्य कृत्य आहे ह्याची जाणीव तिला झाली तेव्हा तिने त्याच्या विरूद्ध युद्ध पुकारले.

आता सम्राज्ञी जोकवाकडे हाको आणि येइको नावाचे दोन तरूण योद्धे होते, आणि पहिल्याला तिने आघाडीवरील सैन्याचा वरिष्ठ अधिकारी बनविले होते. सम्राज्ञीने त्याची निवड केल्याबद्दल हाकोला खूप आनंद झाला होता, आणि त्याने युद्धावर जायची तयारी केली. त्याला शोधता येईल तेवढी जास्तीत जास्त लांब बरची

शोधून काढली आणि तो लाल घोड्यावर स्वार झाला. तो बाहेर पडणार इतक्यात त्याच्या मागे वेगाने येणाऱ्या घोड्याच्या टापांचा आणि ओरडण्याचा आवाज आला.

"हाको! थांब! आघाडीवरच्या सैन्याच्या तुकडीचा आधिकारी मीच आहे!"

त्याने मागे पाहिले तो त्याचा सहचर येईको पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन म्यानातून तलवार उपसून त्यावर चाल करून येताना त्याला दिसला.

हाकोचा क्रोध पेटला, आणि तो त्याच्या प्रतिस्पर्ध्याशी तोंड देण्यासाठी वळत ओरडलाः

"उर्मट चांडाळा! मला आघाडीवरच्या सैन्याचे नेतृत्व करून युद्धासाठी सम्राज्ञीकडून माझी नेमणूक करण्यात आली आहे. तुझी हिम्मत आहे का मला थांबवायची?"

"होय," येइकोने उत्तर दिले. "मला सैन्याचे नेतृत्व करावे लागणार आहे आणि तेव्हा तू माझे अनुसरण करावे."

ह्या निर्भिड उत्तराने हाकेच्या क्रोधाच्या ठिणगीचा ज्वालेत स्फोट झाला.

"मला असे उत्तर देण्याचे धैर्य दाखविलेस? घे मग," आणि त्याने त्याच्या बरची सह त्याच्यावर हल्ला चढविला.

पण येईको पटकन बाजूला वळला, आणि अगदी त्याचवेळी त्याने तलवार उगारून वरिष्ठ अधिकाऱ्याच्या घोड्याच्या डोक्यावर प्रहार केला. घोड्यावरून खाली उतरायला त्याला भाग पाडले, हाको वैऱ्याला मुसंडी मारण्याच्या बेतात असतानाच येइकोने त्या सेनानीच्या छातीवरील मानचिन्ह विजेच्या गतीने फाडून टाकले आणि तो भरधाव वेगाने घोड्यावरून निघून गेला. ती क्रिया इतकी

झटपट घडली की हाको काय करावे ह्या भांबावलेल्या अवस्थेत उभा राहिला. ती सम्राज्ञी ह्या दृश्याची प्रेक्षक होती आणि महत्वाकांक्षी येइकोच्या चपळाईची प्रशंसा केल्याविना तिला रहावले गेले नाही. त्या प्रतिस्पर्ध्यांचे सांत्वन करण्याच्या उद्देशाने तिने त्या दोघांना आघाडीच्या सैन्याचे वरिष्ठ अधिकारी म्हणून नेमण्याचे निश्चित केले.

म्हणून हाकोला आघाडीच्या सैन्याच्या डाव्या बाजूचा वरिष्ठ अधिकारी आणि येइकोला उजव्या बाजूच्या सैन्याचा वरिष्ठ अधिकारी बनविला गेला. एक लाख सैनिकांनी त्यांच्या मागे कोकाईच्या बंडाचा बिमोड करण्यासाठी कूच केले.

थोड्याच अवधीत ते दोन्ही वरिष्ठ अधिकारी किल्ल्यावर जाऊन पोहोचले जेथे कोकाईने तटबंदी करून स्वतःला सुरक्षित ठेवले होते. त्यांच्या आगमनाचे कळताच तो मायावी राक्षस म्हणालाः

“एका श्वासाने मी ह्या दोन्ही तृणप्राय चिमुरड्यांना उडवून लावीन.” (त्यांच्याशी युद्ध करणे किती कठीण आहे ह्याचा त्याने फारच थोडा विचार केला होता.)

ह्या शब्दांबरोबर कोकाईने आवेशाने लोखंडी सळई पकडली आणि काळया घोड्यावर स्वार झाला, आणि त्याच्या दोन्ही शत्रूंवर संतापलेल्या वाघासारखी झडप घालण्यासाठी पुढे सरसावला.

जसे त्या तरूण योद्ध्यांनी पाहिले की तो त्यांच्यावर कोसळत आहे, ते एकमेकांना म्हणाले, “याला आपण जिवंत निसटू देता कामा नये.” आणि त्यांनी त्याच्यावर उजव्या बाजूने आणि डाव्या बाजूने समशेर आणि बरचीने हल्ला केला. पण सर्वशक्तीमान कोकाईने सहजासहजी हार मानली नाही—त्याने त्याची लोखंडी सळई मोठ्या रहाटगाडग्यासारखी गरगर फिरविली आणि खूप काळ त्यांचे युद्ध ना यश ना अपयश संपादन करीत चालले. शेवटी राक्षसाच्या लोखंडी सळईचा वार

चुकविण्यासाठी हाकोने त्याचा घोडा इतक्या वेगाने वळविला की त्या प्राण्याचे खूर मोठ्या पाषाणावर आपटले, आणि मालकाला जमिनीवर फेकीत भीतीने चौकटीसारखा मागच्या पायावर उभा राहिला.

परिणामी कोकाईने त्याची तीनधारी तलवार बाहेर काढली आणि चित पडलेल्या हाकोला तो ठार मारणार इतक्यात त्या मायावी राक्षसाची दुष्ट इच्छा पूर्ण होण्याआधीच शूर येइकोने घोड्याला फिरविले आणि त्याचेयासमोर येऊन ताकद आजमावली. आणि पडलेल्या माणसाला ठार मारू दिले नाही. पण कोकाई थकला होता, तरीही तो त्या निर्भीड आणि तरूण सैनिकांपुढे नतमस्तक व्हायला तयार नव्हता, म्हणून घोड्याला सभोवार वळवून त्याने युद्धातून पळ काढला. हाको जो थोडासा सुन्न झाला होता तरी तो त्या वेळी त्याच्या पायावर उभा राहिला होता. आणि तो व त्याचा सहचर माघार घेतलेल्या शत्रूमागे धावले, एक पायी आणि दुसरा घोड्याच्या पाठीवर.

कोकाईने पाहिले की त्याचा पाठलाग होत आहे, लगेचच तो हल्लेखोराकडे वळला, तो निश्चितच घोड्यावर बसलेला येइको होता, त्याने त्याच्या भात्यातून बाण काढला, तो त्याच्या धनुष्याला लावला आणि येइकोवर सोडला.

विजेच्या चपळाईने दक्षतेने येइकोने भाल्याचा दांडा चुकविला जो त्याच्या शिरस्त्राणाच्या दोरीला चाटून गेला होता, आणि निर्धोकपणे हाकोच्या चिलखतापुढे आदळून पडला.

त्या मायावी राक्षसाने पाहिले की त्याचे शत्रू सुरक्षित होते. त्याला हेही ठाऊक होते की त्यावर दुसरा बाण सोडण्याएवढा त्यांच्याजवळ वेळ नव्हता, म्हणून त्याने स्वतःला वाचविण्यासाठी जादूचा अवलंब केला. त्याने जादूची छडी पुढे केली आणि ताबडतोब मोठा पूर निर्माण झाला. जोकवाचे सैन्य आणि तिचे तरूण वरिष्ठ सैन्याधिकारी झऱ्यावर वाहणाऱ्या शरदातल्या पानांसारखे वाहत गेले.

हाको आणि येइको ह्यांना ते गळाभर पाण्यात धडपडत असल्याचे स्वतःला आढळून आले आणि सभोवार पाहिल्यावर त्यांना दिसले की संतप्त कोकाई लोखंडी सळई उंच उगारून पाण्यातून त्यांच्यावर चाल करून येत होता. त्यांनी प्रत्येक क्षणी विचार केला की त्यांचा शिरच्छेद होईल पण शौर्याने तो कोकाईच्या आटोक्यापासून लांब जाण्यासाठी सपासप हात मारीत पोहू लागले. अचानक त्यांना दिसून आले की पाण्याबाहेर सरळ आलेल्या एका बेटासमोर ते होते. त्यांनी वर पाहिले तो त्यांना बर्फासारख्या पांढऱ्या दाढीचा म्हातारा त्यांच्याकडे पाहून हसत असलेला दिसला. त्यांनी त्या म्हाताऱ्याकडे मदतीसाठी आरडाओरडा केला. म्हाताऱ्याने त्याची मान डोलविली आणि तो खाली किनाऱ्यावर आला. जेव्हा त्याने पुराच्या पाण्याला पदस्पर्श केला तेव्हा पूर विभागला गेला आणि छानपैकी रस्ता प्रगट झाला. त्या बुडणाऱ्या माणसांना ते स्वतः अगदी सुरक्षित होते असे आढळून आल्याने खूप आश्चर्य वाटले. चमत्कार होऊन पाण्याबाहेर आलेल्या बेटावर एव्हाना तो कोकाई पोहोचला होता, त्याचे शत्रू वाचले होते हे पाहून तो खूप संतापला होता. तो पाण्यामधून त्या म्हाताऱ्याकडे धावत गेला आणि असे वाटले की तो त्याला नक्कीच ठार मारणार. पण म्हाताऱ्याला त्याची यत्किंचितही भीती वाटली नाही आणि तो शांतपणे त्या मायावी राक्षसाच्या हल्ल्याची वाट पाहू लागला.

जसा कोकाई जवळ आला तसा म्हातारा मोठ्याने आणि आनंदाने हसू लागला आणि एका प्रचंड आणि सुंदर बगळयात त्याचे रूपांतर होऊन तो पंख फडफडवीत आकाशात उंच उडून गेला.

जेव्हा हाको आणि येइकोने हे पाहिले—त्यांनी ओळखले की त्यांचा तारक हा केवळ एक मनुष्य प्राणी नव्हता तर कदाचित तो रूप बदललेला देव होता आणि त्यांनी ती पूज्य व्यक्ती कोण होती हे नंतर शोधून काढण्याची आशा व्यक्त केली.

मध्यांतरीच्या काळात त्यांनी विश्रांती घेतली होती. आणि दिवस संपायला आल्याने सूर्य अस्तास जात होता. कोकाई आणि त्या तरूण योद्ध्यांनी त्या दिवशी अजून युद्ध करण्याची कल्पना सोडून दिली होती.

त्या रात्री हाको आणि येइकोने ठरविले की कोकाइशी युद्ध करण्यात काहीच अर्थ नाही कारण त्याच्याजवळ अलौकिक सामर्थ्य होते आणि ते त्याच्यापुढे केवळ मनुष्यप्राणी होते, म्हणून त्यांनी स्वतःला सम्राज्ञी जोकवाकडे हजर केले. दीर्घ विचार विमर्शानंतर सम्राज्ञीने अग्निसम्राट शिकुयूला मायावी बंडखोराविरूद्ध मदत करण्यासाठी आणि त्या राक्षसा विरूद्ध तिच्या सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी मदत मागितली.

आता शिकुयू, अग्निसम्राट दक्षिण ध्रुवाकडे राहत होता. ती त्याच्या वास्तव्यासाठीची जागा होती कारण तो कोठेही असो त्याच्या भोवतीची प्रत्येक वस्तू भस्म होई, पण बर्फ आणि हिमतुषार जाळून टाकणे शक्य नव्हते. तो दिसायला भीमकाय होता आणि त्याची उंची तीस फूट होती. त्याचा चेहरा संगमरवरासारखा होता आणि त्याचे केस आणि दाढी लांब व हिमतुषारासारखी पांढरी शुभ्र होती. त्याचे सामर्थ्य अफाट होते आणि कोकाई जसा पाण्याचा तसा तो अग्निचा स्वामी होता.

“निःसंशय,” सम्राज्ञीने विचार केला. “शिकूयू कोकाइचा पराभव करू शकेल.” म्हणून तिने येइकोला कोकाइ विरूद्ध युद्ध करून त्याचा अखेरचा पराभव करण्यासाठी यावे अशी विनंती करण्यासाठी दक्षिण ध्रुवाकडे असलेल्या शिकूयू कडे पाठविले.

सम्राज्ञीची विनंती ऐकून अग्निसम्राट हसला व म्हणालाः

“ती सोपी गोष्ट आहे, खात्रीने! कोकाइने निर्माण केलेल्या पुरामध्ये जेव्हा तुम्ही आणि तुमचा सेनानी बुडत होते तेव्हा दुसरा तिसरा कुणी नसून मीच तुम्हाला वाचविले होते!”

येइकोला हे कळून आश्चर्य वाटले. त्याने मोठ्या निकडीच्या वेळी त्यांची मदत केल्याबद्दल अग्निसम्राटाचे आभार मानले आणि त्या दुष्ट कोकाइशी युद्ध करून त्याचा पराभव करण्यासाठी नेतृत्व करण्यासाठी यावे म्हणून त्याची विनवणी केली.

त्याने विनवणी केल्याप्रमाणे शिकूयूने केले आणि तो येइको बरोबर सम्राज्ञीकडे आला. तिने अंतःकरणपूर्वक त्याचे स्वागत केले आणि त्याला का बोलाविले हे तात्काळ सांगितले- आणि तिच्या सैन्याचे आधिपत्य करण्याची त्याला विनंती केली. त्याचे उत्तर खूपच दिलासा देणारे होतेः

“काही चिंता करू नका. मी नक्कीच कोकाइला ठार मारीन.”

शिकूयूने नंतर स्वतःची तीस हजार सैन्याच्या प्रमुखपदी नेमणूक करून घेतली आणि हाको व येइकोने त्यला मार्ग दाखवित त्यांनी शत्रूच्या किल्ल्याकडे कूच केले. अग्निसम्राटाला कोकाइचे सामर्थ्य ठाऊक होते, म्हणून त्याने त्याच्या सैन्याला विशिष्ट झुडुपे गोळा करायला सांगितले. ते त्यांना मोठ्या प्रमाणावर जाळले आणि प्रत्येक सैनिकाला ती मिळवलेली राख पिशवीत भरायला सांगितली.

कोकाइ एकीकडे त्याच्या स्वतःच्या अहंकारात होता, त्याने विचार केला की शिकूयू त्याच्या पेक्षा कमी सामर्थ्यवान आहे, आणि तो रागाने गुरगुरत म्हणालाः

“जरी तू अग्निसम्राट असलास, तरी मी तुला लवकरच विझवू शकतो.”

नंतर त्याने मंत्रोच्चारांचा पुनरूच्चार केला, आणि पाण्याचा पूर ओसंडून वाहू लागला व डोंगराएवढ्या लाटा निर्माण झाल्या. शिकूयूने जराही न घाबरता त्याच्या सैन्याला त्यांच्याकडची राख पसरविण्याची आज्ञा केली जी त्याने त्यांना बनवायला सांगितली होती. त्याने आज्ञा केल्याप्रमाणे सर्व जणांनी केले. त्यांनी जाळलेल्या झुडुपाचे सामर्थ्य म्हणजे जेव्हा ती राख पाण्यात मिसळली गेली तेव्हा त्या पाण्याचे रूपांतर कडक चिखलात झाले आणि ते सर्व बुडण्यापासून वाचले.

आता जेव्हा तो मायावी कोकाइ अग्निसम्राटाचे बुद्धिचातुर्य पाहून धास्तावला, त्याचा क्रोध इतका मोठा झाला की तो उतावीळपणे शत्रूवर चालून गेला.

येइकोसुद्धा घोड्यावर चढून त्याच्याकडे गेला आणि काही काळ ते दोघे खूप लढले. त्या दोघांची जोडी युद्धात चांगलीच पारंगत होती. हाको जो त्यांचे युद्ध काळजीपूर्वक बघत होता, त्याच्या लक्षात आले की येइको आता थकायला लागला आहे. त्याचा सहकारी मारला जाईल की काय ह्या भीतीने त्याने येइकोची जागा घेतली.

पण आता कोकाइसुद्धा थकला होता आणि हाकोविरूद्ध जास्त वेळ टिकाव धरता येणार नव्हते. म्हणून तो कौशल्याने म्हणालाः

“तू खूप दिलदार आहेस, तू तुझ्या मित्राला ठार होण्यापासून वाचविण्यासाठी धोका पत्करलास, मी अशा चांगल्या माणसांना इजा करणार नाही.” आणि त्याने त्याचा घोडा वळवत माघार घेण्याचे ढोंग केले. हाकोला रक्षकापासून दूर फेकून त्याच्याभोवती वर्तुळाकार फिरून त्यावर विस्मयकारक हल्ला करण्याचा त्याचा हेतू होता.

पण शिकूयूला त्या मायावी राक्षसाचा धूर्तपणा कळला आणि तो तात्काळ म्हणालाः

“तू भेकड आहेस! तू मला फसवू शकत नाहीस!”

असे म्हणत अग्निसम्राटाने बेसावध हाकोला हल्ला करण्याविषयी खुणावले. कोकाइ आता संतापाने शिकूयूकडे वळला, पण तो थकला असल्याने चांगला लढू शकला नाही, आणि लगेच त्याच्या खांद्याला जखम झाली. त्याने ह्या धुमश्चक्रीतून निसटण्याचा निश्चयपूर्वक प्रयत्न केला.

जेव्हा ह्या दोन मोठ्या नेत्यांमध्ये युद्ध सुरू होते तेव्हा सैन्य त्यांच्या इशाऱ्याची वाट पाहत होते. शिकूयूने आता जोकवाच्या सैनिकांना तुटून पडण्याचा आदेश दिला, त्यांनी तसे केले आणि मोठी कत्तल करून त्यांना धूळ चारली, आणि तो मायावी राक्षस कसाबसा जीव वाचवित निसटला.

जलसैतानाला मदतीसाठी बोलाविणे कोकाइला निरर्थक वाटले कारण शिकूयूला चेटूकाविरूद्धची विद्या ठाऊक होती. त्या मायावी राक्षसाला आढळून आले की युद्ध त्याच्या विरोधात होते. वेदनेने तो वेडा झाला, कारण जखमेने त्याला खूप पीडा होत होती. निराशेने आणि भीतीने बेभान होऊन त्याचे डोके शूपर्वताच्या खडकांवर आपटले आणि तो तेथेच मृत्यूमुखी पडला.

हा त्या दुष्ट कोकाइचा अंत होता पण तुम्ही पहाल की जोकवाच्या साम्राज्यातील संकटांचा अंत झाला नव्हता. त्या मायावी राक्षसाने पर्वताला मारलेली धडक इतकी जोरदार होती की पर्वताचे फुटून तुकडे झाले आणि पृथ्वीमधून अग्नि बाहेर पडला आणि आकाशाला आधार देणाऱ्या स्तंभांपैकी एक तुटला आणि आकाशाचा एक कोपरा पृथ्वीवर पडून टेकला गेला.

शिकूयू, अग्निसम्राटाने त्या मायावी राक्षसाचे कलेवर सम्राज्ञी जोकवाकडे नेले, त्यांनी तिच्या शत्रूंचा पाडाव केल्याचा आणि प्रमुखांच्या विजयाचा आनंद व्यक्त केला. तिने शिकूयूवर भेटवस्तूंची आणि सन्मानाची बरसात केली.

पण कोकाइच्या कोसळण्यामुळे पर्वत तुटून त्याच्यातून सारख्या अग्निज्वाला बाहेर येत होत्या. संपूर्ण खेड्यांचा विध्वंस झाला, भाताची शेते भस्मसात झाली, नद्यांची पात्रे लाव्हारसाने तुडुंब भरली आणि बेघर लोक मोठ्या संकटात सापडले. म्हणून विजयी शिकूयूला पारितोषिके दिल्याबरोबर अतिशय वेगाने सम्राज्ञी त्या दुर्घटनाग्रस्त ठिकाणी पोहोचली. तिला आढळून आले की पृथ्वी आणि आकाशाच्या आधाराला हानी पोचली होती, आणि ते ठिकाण अंधाराने इतके व्यापले होते की तिला अनर्थाची परमावधी किती झाली हे तिच्याकडचा दिवा लावून तिला बघावे लागले.

ह्याची खातरजमा करून तिने दुरूस्ती करायला घेतली. ह्याच्या शेवटी तिने तिच्या प्रजेला पाच रंगांची रत्ने जमा करायला सांगितली- निळी, पिवळी, तांबडी, काळी आणि पांढरी. जेव्हा तिला ती प्राप्त झाली तेव्हा तिने ती एका विशिष्ट

चिनी मातीच्या मोठ्या भांड्यात उकळवली आणि त्या मिश्रणाचे रूपांतर द्रवरूप पीठात झाले. तिला ठाऊक होते की ह्यामुळे ती आकाशाला दुरूस्त करू शकत होती. आता सर्व काही तयार झालेले होते.

तिच्या डोक्यावर उंच जागी तरंगणाऱ्या ढगांना तिने बोलाविले, त्यावर ती बसली आणि आकाशाकडे स्वार झाली. पाच रत्नांच्या मिश्रणाने बनवलेली पातळ पीठ असलेली फुलदाणी तिच्या हातात होती. ती लवकरच आकाशाच्या तुटलेल्या कोपऱ्यापर्यंत पोहोचली आणि तिने तो लेप लावून तो कोपरा दुरूस्त केला. हे केल्यानंतर ती मोडलेल्या स्तंभाकडे वळली आणि प्रचंड कासवाच्या पायाने तोही दुरूस्त केला. हे सर्व झाल्यावर ती ढगांवर बसली आणि पृथ्वीवर उतरली, अशी आशा करीत की आता सर्व काही ठीक होईल, पण अजूनही पूर्णपणे असलेला अंधार पाहिल्यावर ती धास्तावली. ना दिवसा सूर्य चमकत होता ना रात्री चंद्र.

खूप गोंधळल्यावर शेवटी, तिच्या साम्राज्यातील सूज्ञ लोकांची तिने सभा बोलावली. अशा पेचप्रसंगात काय करावे ह्याचा सल्ला तिने त्यांना विचारला.

त्यांच्यापैकी दोन सूज्ञ म्हणाले:

“नुकत्याच झालेल्या अपघातामुळे आकाशाचा मार्ग खराब झालेला आहे म्हणून सूर्य आणि चंद्र यांना घरी राहणे भाग पडले आहे. म्हणून ना सूर्य त्याचे दैनंदिन मार्गक्रमण करू शकला ना चंद्र प्रति रात्री मार्गक्रमण करू शकला. केवळ वाईट मार्गांमुळे. सूर्याला आणि चंद्राला हे माहित नाही की महाराणी सम्राज्ञींनी जो रस्ता खराब झाला होता तो दुरूस्त केला आहे, म्हणून आपण तेथे जाऊन त्या दोघांना ह्या गोष्टीची माहिती द्यायला हवी की रस्ते दुरूस्त झालेले आहेत आणि सुरक्षित झालेले आहेत.”

त्या सूज्ञ माणसांनी जे काही सुचविले त्याला सम्राज्ञीने मान्यता दिली आणि त्यांना नेमून दिलेले कार्य करण्यास आरंभ करण्याची आज्ञा केली. पण हे एवढे

सोपे नव्हते कारण सूर्य आणि चंद्राचा राजवाडा लाखो मैल लांब पूर्वेला होता. जर त्यांनी पायी प्रवास केला असता तर ते कधीच त्या राजवाड्यात पोहचू शकले नसते आणि रस्त्यातच म्हातारे होऊन मेले असते. पण जोकवाने इंद्रजालाचा अवलंब केला. तिने तिच्या दोन राजदूतांना अद्भूत रथ दिले जे मंत्रशक्तीने हवेत फिरत आणि मिनिटाला हजारो मैल वेगाने फिरत. ते अतिशय उत्साहाने ढगांवर स्वार होऊन निघाले आणि अनेक दिवसांनंतर ते चंद्र आणि सूर्य जेथे आनंदाने राहत होते त्या देशात जाऊन पोहोचले.

त्या दोन्ही राजदूतांना त्यांच्या तेजाच्या राजांना भेटण्याची अनुमती मिळाली आणि अनेक दिवसांपासून आपण विश्वापासून एकांतवास का स्वीकारला? असे त्यांना विचारले. त्यांच्या अशा करण्याने जग आणि त्यातील लोकांना दिवसरात्र अतिशय गडद अंधारात घालवावे लागत होते.

सूर्य आणि चंद्राने उत्तर दिलेः

“तुम्हाला हे निश्चितच ठाऊक असेल, की शूपर्वत अचानक आगीसह फुटला आणि आकाशातला रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला. अशा ओबडधोबड रस्त्याने मी सूर्य, मला आढळून आले की अशा रस्त्याने दैनंदिन मार्गक्रमण करणे अशक्य होते- आणि निश्चितच चंद्रसुद्धा रात्री बाहेर पडला नाही! म्हणून आम्ही आमच्या खाजगी जीवनात काही काळ विश्रांती घेतली.”

नंतर त्या दोघां सूज्ञ माणसांनी खाली वाकून नमस्कार केला आणि म्हटलेः

“आमच्या सम्राज्ञी जोकवा ह्यांनी पाच रंगांच्या अद्भूत रत्नांनी रस्ता आधीच दुरूस्त केला आहे, म्हणून आम्ही आपणा दोघांस विनंती करतो की आता तो रस्ता अगदी ज्वालामुखी उफाळण्यापूर्वी होता तसाच आहे.”

पण अजूनही सूर्य आणि चंद्र काचकूच करीत म्हणत होते की आकाशाचे स्तंभ चांगलेच मोडले गेले असल्याचे त्यांनी ऐकले होते आणि जरी रस्ते पुन्हा दुरूस्त करण्यात आले असले तरी त्यांना अजूनही त्यांच्या नियमित मार्गक्रमणासाठी एकदम बाहेर पडण्यात भीती वाटत होती.

“तुम्हाला मोडलेल्या स्तंभांची चिंता करण्याची गरज नाही,” ते दोन्ही राजदूत म्हणाले. “आमच्या सम्राज्ञीने त्यांची प्रचंड कासवाच्या पायाबरोबर डागडुजी केलेली असून आता ते पूर्ववत पक्के झाले आहेत.”

नंतर ते चंद्र आणि सूर्य समाधानी दिसले आणि दोघेही त्या रस्त्याची तपासणी करण्यासाठी निघाले. त्यांना असे आढळून आले की सम्राज्ञीच्या प्रतिनिधींनी त्या दोघांना जे सांगितले होते ते अगदी बरोबर होते.



आकाशातील रस्त्यांचे परीक्षण केल्यानंतर सूर्य आणि चंद्राने पृथ्वीला पुन्हा प्रकाश द्यायला सुरूवात केली. सर्व लोकांना खूप आनंद झाला आणि चीनमध्ये सम्राज्ञी जोकवाच्या राज्यात ते शांती आणि सुबत्तेसह निश्चिंतपणे सुखाने नांदू लागले.

* * * * *

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान